पुणें भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ८१

# सेनापती दाभाडे दफ्तर

## भाग १ ला

( इ. स. १५१० ते इ. स. १८०६ )

संपादक
शंकर नारायण जोशी

प्रकाशक
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें २

शक १८७३ ] [ इ. स. १९५१

किंमत ३ रुपये

MR
954.026
J 78.I S

MR
954.026
J78.IS

# मंडळाचें प्रकाशन

## भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला

* ह्या खुणेचे ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर केले आहेत. † हें पुस्तक शैक्षणिक ( training ) संस्था व शिक्षकग्रंथालयें यांसाठीं मंजूर झालें आहे. त्रैमासिकाच्या फुटकळ अंकास रु. १॥

***मंडळ-त्रैमासिक** प्रत्येक पुस्तक रु. ५
- १ अहवाल ( शक १८३२ ) रु. ३
- २ „ ( शक १८३३ ) रु. ५
- ३ सुबंत विचार (कै. वि. का. राजवाडे) १०
- ४ वार्षिक इतिवृत्त ( शक १८३४ ) ५
- ५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (कै. वि. का. राजवाडे) रु. १
- *६ प्रथम संमेलन वृत्त (शक १८३५) ०१२
- *७ वार्षिक इतिवृत्त ( शक १८३५ ) ६
- *८ द्वितीय संमेलन वृत्त ( शक १८३६ ) ३
- *९ वार्षिक इतिवृत्त ( शक १८३६ ) ३
- *१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० ( शिवकालीन घराणीं ) ३
- *११ वार्षिक इतिवृत्त ( शक १८३७ ) ६
- *१२ तृतीय संमेलन-वृत्त (शक १८३७) ३
- *१३ मुकुंद–महाभाष्य ( संस्कृत ) ०८
- *१४ ग्रंथराज ( दासोपंत ) ०८
- *१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला ०१२
- *१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा ०१२
- *१७ वार्षिक इतिवृत्त ( शक १८३८ ) ३
- १८ चतुर्थ-संमेलन-वृत्त (शक १८३८) ३
- *१९ राजवाडे-खंड-स्थलसूचि ४
- *२० पंचम संमेलन-वृत्त (शक १८३९) ३
- २२ चंद्रचूड–दप्तर–कलम १ ३
- २३ महाराष्ट्र–सारस्वत आ. १ ली १०
- २४ षष्ठ संमेलन-वृत्त ( १८४० ) ४
- २५ सप्तम संमेलन-वृत्त ( १८४१ ) ३
- २६ संशोधकाची छोटी जंत्री ०४
- २७ प्रदर्शन परिचय ०४
- *२८ फारसी पत्रव्यवहार ५
- २९ फार्सी–मराठी कोश ( कै. प्रा. मा. त्र्यं. पटवर्धन ) ४
- ३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला १०८
- ३१ Historical Miscellany १
- ३२ पुरंदरे-दप्तर भाग १ ४
- ३३ शिवचरित्रसाहित्य खं. २ रा ४
- ३४ द. मध्ययु. इ. साधनें खं. १ २
- ३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खं. १, २
- ३६ राजाराम–चरितम् मूळ संस्कृत वा. सि. बेन्द्रे १०८
- ३७ मंडळांतील नाणीं १
- †३८ शिवचरित्रसाहित्य खंड ४ १०८
- ३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही रु. ४
- †४० ऐतिहासिक फारसी साहित्य रु. १०८
- †४१ द० मध्ययुगीन इ. सा. खंड २, २
- †४२ ऐतिहासिक संकीर्ण सा. खंड २ २०८
- ४३ मंडळ चित्र ग्रंथ चित्रें २० ०९
- ४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह खं. ३, २॥
- †४५ विजयनगर स्मारकग्रंथ ४
- †४६ ऐतिहासिक फारसी सा. खंड २, १०८
- ४७ शिवचरित्रसाहित्य खं. ६ १०८
- †४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (कै. शं. पु. जोशी) ०१२
- ४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह कानडी १
- ५० शिवचरित्रसाहित्य खंड ७ १०८
- †५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य ३ १०८
- ५२ शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड २ व ३
- †५३ फार्सी विभाग, प्रत्येकीं १०४

पुणें भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्रं. ८१

Senapati Dawade Dafhtar

# सेनापती दाभाडे दफ्तर

## भाग १ ला

Part 1

( इ. स. १५१० ते इ. स. १८०६ )

(1510-1806)

संपादक

edited by

शंकर नारायण जोशी

Shankar Narayan

प्रकाशक

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें २

Chitnis, Poona

1951

शक १८७३ ] [ इ. स. १९५१

किंमत ३ रुपये

मुद्रक
केशव गणेश शारंगपाणी,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणे ४

MR
954.026
J 78.I S

...E OF ADVANCED STUDY
...8991
19.3.66

Library IIAS, Shimla
MR 954.026 J 78.I S
00008991

प्रकाशक
श्री. चिं. ग. कर्वे,
चिटणीस भा. इ. सं. मं.
३१३ अ सदाशिव पुणे २

# निवेदन

मंडळ त्रैमासिकाचा प्रस्तुतचा अंक "सेनापति दाभाडे दफ्तर खंड पहिला" ह्या स्वरूपांत बाहेर पडत आहे. या ग्रंथाचें संपादन मंडळाकरवीं घडून येण्यास श्रीमंत वीरधवल यशवंतराव ऊर्फ आबासाहेब दाभाडे यांनीं आपल्या कागदापत्रांची मंडळाकडे पाठविलेली अनाहूत व मूल्यवान् देणगी, त्यांतील कागद कसोशीनें निवडून त्यांची वर्गवारी करण्यांत मंडळांतील संशोधकांचे परिश्रम आणि त्यांचें तत्परतेनें प्रकाशन व्हावें म्हणून प्राध्यापक नरहर रघुनाथ फाटक ह्यांचेकडून आलेली देणगी व ह्या कामाबद्दल त्यांनीं दाखविलेली आस्था ह्या गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत.

मंडळाकडे कागदपत्रें येऊन त्यांचें इतक्या त्वरित प्रकाशन व्हावें व त्या कामीं द्रव्य व परिश्रम यांची सांगड जुळून यावी हा मोठा सुयोग समजला पाहिजे.

सेनापति दाभाड्यांच्या ह्या दफ्तराचें महत्त्व किती आहे हें पुढें प्रस्तावनेंत आलेंच आहे. त्याचें जास्त विवेचन करण्याची जरूरी नाहीं. द्रव्यानुकूलतेप्रमाणें ह्याचे आणखी कांहीं खंड पुढें प्रसिद्ध करण्याची उमेद बाळगून आहों.

मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्य स्वतंत्रतेच्या काळांत जरी आतां पुष्कळ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊं शकत असलें, तरी त्याचा परिष्कार करण्यास हौशी, पोट बांधून व निष्ठेनें काम करणाऱ्यांची चणचण आतां मंडळास भासूं लागली आहे. संशोधकांच्या मागच्या व विद्यमान पिढीचा घडा गिरवून त्यांचे अनुभवाचा फायदा घ्यावा म्हणून, आर्थिक सुबत्तेची जोड असल्याशिवाय, कोणी तरुण मनुष्य ह्या कामांत लक्ष्य घालीत नाहीं, असाच अनुभव पदोपदीं येतो. सध्यां विद्यापीठाजवळही नवीन होतकरू तरुणांस उत्तेजन मिळून आणखी संशोधक पुढें येतील अशी योजना असल्याचें दिसत नाहीं. त्यामुळें इतिहासाभ्यासाकडे नवीन पिढीचें लक्ष्य कितपत आकर्षिलें जाईल ह्याबद्दल शंका वाटते. ह्या कामीं मंडळाच्या खटपटीसही आर्थिक

उंचाईमुळें फारसें यश येऊं शकलें नाहीं ही वस्तुस्थिति येथें दुःखपूर्वक नमूद करावीशी वाटते.

विद्यापीठानें नुकतीच देणगी दिल्यामुळें मंडळामार्फत मंडळाचे संशोधक श्री. ग. ह. खरे हे मराठ्यांची मोठी विस्तृत शकावली तयार करण्यास सिद्ध झाले आहेत, ही मोठी अभिमानास्पद गोष्ट आहे.

आषाढ वद्य ८ शके १८७३
दिनांक २६ जुलै १९५१

मो. गं. दीक्षित
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ.

# प्रस्तावना

हा ग्रंथ **सेनापती दाभाडे दफ्तराचा पहिला भाग** आहे. आतांपर्यंत मंडळाकरवीं चंद्रचूड दफ्तर, पुरंदरे दफ्तर, हिंगणें दफ्तर, पेठे दफ्तर म्हणून जे कांहीं ग्रंथ प्रसिद्ध झाले त्यासारखाच हाहि ग्रंथ आज मंडळाच्या एकेचाळिसाव्या वाढदिवसप्रसंगीं पण गुरुपौर्णिमेच्या दिवशीं प्रसिद्ध होत आहे. चंद्रचूड-दफ्तराप्रमाणें ह्याहि ग्रंथाचा थोडासा चांगला भाग असा कीं, ह्या दफ्तराच्या धन्यांनीं, तळेगांवकर दाभाडे सेनापती ह्यांनीं, आपला ऐतिहासिक कागदपत्राचा सबंच संग्रह मंडळाकडे गेल्या वर्षी सुपूर्द केला. त्यांतील पहिल्या निवडींत जे कागद हातीं आले त्यांमधील कांहीं कागद ह्या भागांत प्रसिद्ध होत आहेत. अर्थात् **श्रीमंत सरदार वीरधवल यशवंतराव ऊर्फ आबासाहेब दाभाडे** ह्यांचें, त्यांनीं, ऐ० पत्रसंग्रह ही केवळ अभ्यासयोग्य व सर्वोपयोगी ज्ञान देणारी वस्तु होय, ह्या जाणीव बुद्धीनें व उदार मनानें आपला संग्रह मंडळाकडे दिला ह्याबद्दल अभिनंदन करणें व आभार मानणें हें येथें पहिलें काम होय आणि तें आम्ही मोठ्या आनंदानें करतों.

ह्या भागांत एकंदर १४५ पत्रें आलीं आहेत. पैकीं लेखांकांनीं दिलेलीं १०५ पत्रें असून बाकीचीं ४० पत्रें त्या त्या लेखांकाच्या टीपेंत, मजकूर सारखा असला तर तसें किंवा जो थोडासा फरक असेल तो, दाखवून दिलेलीं आहेत. शेवटचीं ९४ ते १०५ हीं १२ पत्रें शेवटच्या बाजीरावाच्या वेळचीं बातमीपत्रें आहेत. ह्यापूर्वीचीं ९३ पत्रें बाळाजी बाजीरावांच्या कालापर्यंतचीं मुख्यतः आहेत. नाहीं म्हणावयास माधवराव बलाळ व माधवराव नारायण प्रधान ह्यांच्या राजवटींतील २ च निघतील. एकंदरींत शिवपूर्वकालीन १, शिव-व संभाजीच्या राजवटींतील एकेक, राजाराम कालीन ७, ताराबाई व शिवाजीच्या कारकीर्दींतील १२, शाहू म्हणजे बाळाजी विश्वनाथ कालीन १३, थोरले बाजीराव काळचीं ४३ व नानासाहेब पंतप्रधान ११, अशी ही ठोकळ व परिचित ज्या राजकारकीर्दी त्या कारकीर्दीवार पत्रगणना आहे. पण हें पत्रगणन येथें दाभाडे कुलव्यक्तिवार लक्षांत घेणें अधिक इष्ट आहे. आणि तशा दृष्टीनें पाहतां येसजी दाभाडे पाटील ले. २ ते १०, खंडेराव दाभाडे-सेनाखासखेल असतां पत्रें ले. ११ ते २२ व सेनापती असतां ले. २३ ते ७०; थोरले त्रिंबकराव दाभाडे सेनापती ले. ७१; पहिले यशवंतराव दाभाडे किंवा उमाबाई दाभाडे ले. ७२ ते ८१ व ८८ ते ९३; दुसरे त्र्यंबकराव- यशवंतराव-पुत्र ले. ८२ व ८६; शिवराव दाभाडे ले. ८३; दुसरे यशवंतराव ले. ८४, ८७ अशी दाभाडे-व्यक्तिवार पत्रसंख्या येते.

ह्या भागांतील पत्रांचें स्वरूप, वरील मोजणी आणि लेखांकवार अनुक्रमणिका पुढें दिली आहे ती पाहतां लक्ष्यांत येईल. कालदृष्ट्या जों जों मागील पत्र पाहण्यास जावें तों तों तें पत्र बहुंशीं वतनसंबंधींच सामान्यतः आढळतें. ह्या दाभाडे दप्तरांतहि जीं जुनीं पत्रें हातीं आलीं व जीं ह्या पहिल्या भागांत घेतलीं तीं तशींच आहेत. म्हणजे वतनी पत्रव्यवहाराचा हा भाग म्हणतां येईल. तथापि कांहीं पत्रें अशींहि आहेत कीं ज्यामुळें हा भाग निरनिराळ्या दृष्टीनें सार्थ झाला, असें म्हणतां येईल. ले. ६७ हें पत्र 'महजर' असलें तरी सर्व पत्रभर खंडेराव दाभाडे यांची संगमनेर कडील स्वारीचीच वार्ता आली आहे. ह्या महजराचाहि हा प्रकार लक्ष्यांत घेण्याजोगा नवाच आहे. ले. २३ ह्या पत्रांत **तुकाराम महाराज शिष्य गंगाराम बोवा मवाळ** ह्यांच्या घराण्याची अर्थात् त्यांच्या स्वतःसंबंधीं माहिती आली आहे ती नवीनच आहे. ले. ४४ मध्यें बाजारभाव व सण ह्यासंबंधी माहिती आहे. व ले. ७०, ७७, ८३, ८४, ८७, ८८ हीं सर्व राजकारणी पत्रें आहेत. ले. ८२ मध्यें शेटेपणासंबंधानें माहिती आली असून ले. ८५ हा सेनापतीकडील कचेरी–व्यवस्था कशी असे, पदरीं कोण कोण असत व त्यांजकडे काय काय काम असे ह्यासंबंधी मजकूर आला आहे. ह्या मजकुराबरोबर रा. सं. ३ ले १६७ मध्यें अशीच सेनापती व सेनाखासखेल ह्यांजकडील व्यवस्था व कामदार मंडळींची नोंद आली आहे. ती लक्ष्यांत घ्यावी. असो; ह्याप्रमाणें ह्या भागांत पत्रें आलीं असून प्रत्येक लेखांकाला पत्रांतील मुख्य विषय ध्यानांत येईल असें शीर्षक दिलें आहे. शिवाय, विषयसूचीहि स्वतंत्र जोडली आहे. त्यावरूनहि अभ्यासकांना पत्रांत आलेल्या इतर विषयांचे स्फुट उल्लेख कळून येतील. पैकीं कांहीं उल्लेखांचें विवेचन येथें करणें इष्ट होईल.

**नाणीं** – नाण्यांचे उल्लेख ले. २, ३, ६, २० व ७५ ह्या पांच पत्रांतून आलेले असून ले. २ व ७५ मध्यें 'मोहरा' आणि ले. ३ व २० मध्यें 'टके' हीं नाणीं आलीं आहेत. त्यांतहि लेखांक ६ ह्या पत्रामधील दोन नाणीं आधीं व अधिक लक्ष्यांत घेण्याजोगीं आहेत. त्यांचीं नांवें 'छत्रपती फलं' व 'छत्रपती चक्रें' हीं आहेत. आतांपर्यंत शिवाजीचा 'होन' व छत्रपती म्हणजे 'शिवराई' पैसा हीं नाणीं इतिहास–वाचकांच्या परिचयाचीं आहेत. ह्यांतील 'होन' हें सोन्याचें व 'शिवराई' हें तांब्याचें नाणें आहे. 'फलं' आणि 'चक्रें' ह्या छत्रपतीसंज्ञक नाण्यांचा असा उल्लेख येथें प्रथमच आला आहे. हीं दोन्ही नाणीं सोन्याचीं आहेत. ज्या पत्रांत ह्या नाण्यांचा उल्लेख आला आहे तें पत्र, छत्र० राजारामानीं जिंजीहून पाठविलेली पावती आहे. म्हणजे महाराष्ट्रांतून राज्यकारभार करीत असलेल्या राजमंडळाकडून निरनिराळ्या बाबतींत जो वसूल येई त्याचा भरणा जिंजी येथील 'भंडारगृहांत' केला जाई. तशाच एका भरण्याची ही पावती आहे. पावतीपत्रांत 'पत्र वासिल राजमंडळ बा–बरहुकूम–आयपत्र' असें आलें आहे. पुण्याजवळील कऱ्हेपठारांतील सासवड व भिवडी ह्या दोन गांवांत सीमेविषयीं तंटा उत्पन्न झाला होता. हा

तंटा तूर्त 'निवडून–निवाडा होऊन–मौजे मजकुरीची सीव मौजे मजकुराकडे लागली.' तूर्त म्हणण्याचें कारण असें कीं, हें सीमेचें भांडण पुनः इ. स. १७०२ मध्यें उद्भवलें आहे. (पुं. द. १ ले. २४). पण सध्यां हें भांडण मिटलें आणि ह्या वादांत भिवडीच्या पाटलानें हरकी म्हणजे सेरणी म्हणून शंभर पातशाही होन सरकारांत भरणा करण्याचें ठरलें. हे होन वीस दिवसांत तीन हप्त्यांनीं मिळून भरणा केले. तिसरा हप्ता फाल्गुन शुद्ध द्वादशीस भरला व ही पावती त्रयोदशीस दिली गेली (श. १६१६ इ.१६९५ फेब्रु.१६). ह्या वसूल भरणा ज्या नाण्यांत केला त्या नाण्यांची नोंद पावती देतांना केली व अशा प्रसंगानें छत्रपतीफलं व छत्रपतीचक्रें ह्या नाण्यांचा उल्लेख सहजच झाला.

'छत्रपती फलं' व 'छत्रपती चक्रें' ह्यांपैकीं फलम ह्या नाण्याचा उल्लेख, राजारामाच्याच राजवटींत लिहिल्या गेलेल्या 'सभासद बखरींत', शिवरायांच्या भंडारगृहांतील नाण्यांचा एकंदर संग्रह सांगतांना आला आहे. व तेथेंच पुरवणींत बारा प्रकारचे 'फलम' सांगितले आहेत. त्यांत 'चंद्रावरी' फलमचा निर्देश आहे. फलम हें सोन्याचें नाणें आहे हें वर सांगितलेंच आहे. मोहोर, पुतळ्या ह्याप्रमाणें फलमच्याहि माळा करून त्या दागिना म्हणून गळ्यांत घालीत. वैद्य दफ्तर खं. २ पृ. २२ वर दागिन्यांची यादी आली आहे (श. १६६१ = १७४० ). तींत फलमच्या माळेचा निर्देश आहे. फलं हें नाणें विजयनगरच्या राज्यांत चालूं होतें. मजुरांना सकाळीं भात देऊन कामाला लावीत आणि संध्याकाळीं एक फलम–फनम रोजमुरा म्हणून देऊन सुट्टी देत (वि. स्मा पृ. ८३). 'फलम' ह्याला 'पण' हें पर्यायनाम आहे असें राज्यव्यवहारकोशांत आलें आहे. दुसरें नाणें चक्रें. ह्या चक्रे–चा उल्लेख स्वतंत्र व जोडून असा दोन्ही प्रकारांनी आला आहे. 'गद्याण' हें जें नाणें त्याचा 'चक्रेगद्याण' हा प्रकार विजयनगर–कालीन नाणकसंग्रहांत पठित आहे. सभासद बखरींतहि एकुणांत सांगतांना पृ. ९७ वर 'चंद्रमे संख्या पंचवीस लक्ष' असें जें आलें आहे तें, मोडी लिपींतील 'चक्रें' हें नाण्याचें नांव नेमकें न उमगल्यामुळें चक्रें–चें चंद्रमें हें चुकीचें वाचन झाल्यामुळें आलें असावें असें वाटतें. फलम म्हणजे पण आणि पण व चक्रें ह्या दोन्ही नामांचा अर्थ संस्कृत कोशांत त्यांची किंमत दर्शवून दिला आहे. पण ती किंमत येथें जमत नाहीं ( ८० कवड्या व दीनार = ३२ गुंजा सोनें ). सारांश हीं दोन्ही नाणीं चांगलीं रूढ होतीं.

ह्या नाण्यांचें पातशाही होनाशीं प्रमाण काय तें प्रस्तुत पत्रांत तीनहि हप्त्यांची नोंद करून बेरीज दिली आहे त्यावरून कळून येतें. पातशाही १०० होन म्हणजे १६० छत्रपती चक्रें. १० फलं म्हणजे १ चक्र आणि १६ फलं म्हणजे १ होन. असें परिमाण येतें. पत्रांत 'दर होनास फलं छत्रपती १॥१' असें जें लिहिलें आहे त्याच उलगडा असा कीं, दहा दीडें पंधरा फलं अधिक एक फलं मिळून १६ फलं म्हणजे १ होन. पण किती चक्रें म्हणजे एक होन. तर दीड व एक दशांश चक्र म्हणजे एक होन. हें प्रमाण १॥१ ह्या प्रकारानें लिखित केलें आहे. पत्रांतील दुसरी एक गोष्ट, ह्या नाण्यांची

मांडणी व बेरीज दिली आहे त्यावरून लक्ष्यांत घेतली पाहिजे कीं, फलं आणि चक्रे ह्यांची आंकड्यांत बेरजेसाठीं मांडणी करतांना चक्रेचा पोट भागांतील अडीच हा जो चतुर्थांश, तो रेघांत मांडावयाचा नाहीं, त्या ऐवजी फलंचे आंकडेच मांडावयाचे; आणि अर्धे चक्रे हें मात्र रेघांत ·॥· ह्या रूपांत दर्शित करावयाचें व त्याचा अर्थ ५ फलं हा समजावयाचा. असें समजलें तरच पत्रांतील चक्रांची बेरीज १६० ही करतां येईल. २४ + ५ + १३० म्हणजे १५९ चक्रें आणि उरलेल्या एका चक्राचे १० फलम ·॥४ + ०१ असे मांडले आहेत. म्ह० ५ + ४ + १ = १० फलं म्ह. १ चक्रें.

दुसरी एक गोष्ट ध्यानांत घ्यावयाची कीं, पातशाही होनाचे छत्रपती–चक्रांत रूपांतर करूनच हा भरणा 'भांडारगृहांत' समाविष्ट करण्यायोग्य झाला आहे; त्याचेंहि कारण हें कीं कर्नाटकांत हीं नाणीं रूढ होतीं व छत्रपती ह्या त्यांच्या जोड नांवावरून छत्रपतींनी तीं पाडविलीं होतीं असें म्हणणें प्राप्त वाटतें. ह्या नाण्यांची किंमत आजच्या मापेंत रु. २०ऽ म्ह. १ चक्रें व ०ऽ॥ आणे म्ह. १ फलम् अशी सांगतां येईल.

## खंडेराव दाभाडे ह्यांचें सेनापती पद

ह्या भागांत आलेल्या पत्रांचा विचार करतांना दाभाडे घराण्याचें राजकीय दृष्ट्या मुख्य नांव जें 'सेनापती' तें त्यास केव्हां मिळालें ह्याचा विचार करणें प्राप्त आहे. त्यामुळें ह्याच उल्लेखाची विसंगतता वाटते तिचा उलगडा होण्यास सहाय मिळेल, कांहीं पत्रांचा काल लक्ष्यांत येण्यास मदत होईल आणि खंडेराव व शाहू आणि कोल्हापूरकर छत्रपती यांचेहि संबंध लक्ष्यांत येतील. तळेगांवकर दाभाडे घराणें हें सेनापतींचें म्हणून इतिहास-कालापासून प्रसिद्ध आहे. हा सेनापतीपदाचा आधिकार ह्या घराण्यांत खंडेराव ह्या पुरुषापासून सुरू झाला. व त्यामुळेंच पुढें त्या घराण्यांतील पुरुष आणि तें घराणें, सेनापती ह्या अभिधानानें लोकविश्रुत झाले. पत्रांत उल्लेख येतो तेव्हांपासून धरलें तरी (१६९१-ते १७२९) ३८ वर्षे खंडेराव हिंडून बसून कामकाज करीत आहे. सेनापती खंडेराव हे – पाटील, सरपाटील, देशमूख, राज देशमूख = हें नांव ह्या भागांत नवीनच आलें आहे ले. १० = सरदेशमूख, सरदेशकुलकर्णी, अठरा कारखान्याचे हवालदार, अधिकारी म्ह० देसाई म्ह० देशमूख, इनामदार, मोकासदार, सेनाखासखेल असे आठनऊ अधिकार धारण करणारे होते तरी सेनापती ह्याच पदाधिकारानें ते व त्यांचें घराणें विख्यात झालें आहे. शिलालेखांत तर असें ध्वनित केलें आहे कीं, नुसतें 'सेनापती' म्हटलें म्हणजे खंडेराव दाभाडे हें नांव घेतल्याचाच कार्यभाग होतो. 'जेष्ठी जन्मला खंडेराव। रूढ 'सेनापती' नांव ।शांभव पूर्ण वैभव। असें जया कारणें' ॥३॥ (ले. ५०). खंडेरावाइतका अनेक व थोर थोर मोठीं वतनें मिळविलेला दुसरा पुरुष क्वचित्‌च आढळेल. खंडेरावास १३९५ गांवांची सरपाटिलकी मिळाली होती; तळेगांव, वांई, पौड, मोदडे, कटापूर, वाघोली = किरकटवाडी, चांदखेड ह्या गांवांची पाटिलकी

असून, कोल्हापूर हवेली व कोल्हापूर परगणा ह्याची राजदेशमुखीहि त्याजकडे होती. जुन्नरप्रांत, तुंगारतन तर्फ, नाणे मावळ, गिऱ्हेताम्हणखोरे, निंबगाव, इंदुरी, नारोडी, मलवंडी ह्या गांवांतहि देशमुखी, पाटिलकी, मोकासबाबती वगैरे उत्पन्न खंडेरावाला मिळालेलें आहे. व ही सर्व खंडेरावाची वतनी मिळकत आहे. ह्याशिवाय, सेनाखासखेल व सेनापती म्हणून सरंजामी गांवें होतीं तीं वेगळींच. खंडेरावास निरनिराळ्या घाटांतील व वाटांमधील जकातचौक्यावरील जकातीचेंहि उत्पन्न मिळत असे. सारांश, हा खंडेराव दाभाडे राजाराम छत्रपतींच्या वेळीं फार प्रतिष्ठेचा व नामवंत सरदार झाला होता. खंडेरावांच्या प्रतिष्ठेची व तोलदारीची लहान वाटणारी कौतुकाची गोष्ट अशी देण्याजोगी वाटते कीं, खंडेरावाचे पिते येस पाटील हे विद्यमान असतां येस पाटलांची पत्नी सौ० वाल्हाई हिला खंडेरावांची मातुश्री म्हणून, (येस पाटलांची पत्नी म्हणून नव्हे) धामणें व उरसें हीं दोन गांवें इनाम मिळालीं (ले. ८); आणि खंडेरावांची पत्नी म्हणून मात्र सौ० उमाबाई हिला बेहर्जे व कुरली हीं दोन गांवें छत्रपतींकडून देण्यांत आलीं (ले. २७). तात्पर्य, असा हा खंडेराव मोठ्या लौकिकाचा, संपन्न व कर्तृत्ववान असून दाभाडे घराण्यांत पहिला सेनापती झाला. पण हें सेनापती पद त्यास केव्हां मिळालें; तसेंच तें मिळण्यांत नांवापुरतें मिळणें आणि वस्त्रें व सरंजाम ह्यांसह मिळणें अशा गोष्टी कांहीं घडल्या आहेत कीं काय; त्याप्रमाणेंच सेनापती पद मिळाल्यानंतर तें मध्यंतरी कांहीं कारणानें काढून खंडेरावास सेनाखासखेल ह्या खालच्या पदावर नेमिले होते कीं काय, असे प्रश्न खंडेरावासंबंधीं ह्या पुस्तकांत व इतरत्र प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत आलेले कागदपत्र पाहात असतां मनांत येतात; त्यासंबंधानें येथें थोडासा विचार करणें आवश्यक आहे.

दाभाडे घराण्यासंबंधीं पत्रें हें, प्रमुख इतिहास–साधन प्रसिद्ध होऊं लागण्यापूर्वी त्या घराण्याचे संकलित इतिहास ग्रंथ तीन चार प्रकाशित झालेले आहेत. त्यामध्यें खंडेरावास सेनापतीपद मिळाल्याचें वर्ष वेगवेगळें आलेलें आहे. अष्टप्रधानांचे इतिहासांत (वि. गो. भिडे इ. १८६६) पृ. २३८ वर इ. १७१३ हें वर्ष आलें आहे; काव्ये सं. तील दाभाडे हकीकतींत (इ. १८८७ का. ना. साने) हा काल पृ. ७ वर बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाल्यानंतर असा मोघम सांगितला आहे; परांडेकर ह्यांच्या इतिहासांत (इ. १८८८) पृ. ५५ वर इ. १७१६ हें वर्ष वस्त्रें मिळाल्याचें दिलें आहे आणि धनुर्धारी विरचित दाभाडे इतिहास ग्रंथांत कालाचा निर्देशच नाहीं. येथें ही एक गोष्ट लक्ष्यांत घ्यावयाची कीं, ह्या तिन्ही ग्रंथांचें मूळ काव्ये० सं. त आलेली 'दाभाडे हकीकत' हें आहे. धनुर्धारींनीं तर तसें स्पष्टच शेवटीं पृ. ६५ वर सांगितलें आहे. आणि परांडेकर ह्यांनींहि प्रस्तावांत आपण 'दाभाडे यांचेजवळ जी एक लेखीप्रत लिहिलेली आहे तिच्या मुख्य आधारानें' हा इतिहास तयार केला, असें लिहिलें आहे. काव्ये०सं. त जी प्रत छापली ती 'पेशजी आम्हाकडील कारभारी याणीं कंपनी सरकारकरतां संकलित

चादी लिहून दिल्ही होती त्यावरून सविस्तर मजकूर लिहिला ' तीच आहे. (इ.१८१९-१८२७) म्हणजे मांडणीत बदल झालेला असला तरी हे तिन्ही ग्रंथ मिळून एकच आधार धरणें भाग आहे. परांडेकर सेनाखासखेली व सेनापतीपद हीं दोन्ही एकच समजले असें दिसतें. कारण, पृ.२८ ते ४२ पर्यंत खंडेरावांचा उल्लेख सेनाखासखेल म्हणून केला; पुढें पृ.४३ ते ४८ पर्यंत सेनापती असें त्यास संबोधिलें आणि पृ. ४९ वर पुनः सेनाखासखेलीचीं वस्त्रें इ. १७१४ मध्यें मिळालीं असें लिहिलें व पुनः पृ. ५५ वर इ. १७१६ मध्यें सेनापतीचीं वस्त्रें मिळण्याचीं राहिलीं होतीं तीं मिळालीं असें दिलें आणि इ. १७२० मध्यें खंडेराव निवृत्त झाले असें सांगितलें ( पृ ६० ). ' स्थिरबुद्धि राजाराम ' ह्या ग्रंथांत पृ. ४४ वर ' सेना धुरंधर ' हें पद इ. १६९१ मध्यें खंडेरावास मिळालें असें आलें आहे. सारांश, (इ. १६९१) इ. १७१३, १७१४ व १७१६ असे चार निरनिराळे वर्ष-काल सेनापतिपद मिळाल्याचे आले आहेत. अष्टप्रधानेतिहासांत सेनापती ही संज्ञा सर्नोबत ह्या मुख्य शब्दाचा पर्याय म्हणून कंसांत दिली आहे. सेनानी, सर्नोबत ( हें फारसी नांव ), सेनाधुरंधर, सेनापती, सेनानायक ह्यापैकीं कोणचेंहि विशेषण घेतलें तरी अर्थ एकच आहे. पण पदवी व व्यवस्था म्हटली म्हणजे एकच कोणचें तरी विशेषण असलें पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहतां सेना-धुरंधर हीं पदवीं नागपूरकर भोसल्यांना आहे. दाभाडे हे ' सेनापती 'च आहेत. सेनाखासखेल ही हि पदवी आहे व तीहि खंडेरावास होती. पण त्यांच्या मुद्रेंत सेनापती ह्याच अधिकारनामाचा निर्देश आहे. आणि गायकवाडांच्या मुद्रेंत मात्र सेनाखासखेल हें नांव आहे. सेनाधुरंधर हें विशेषण, 'समस्तराजकार्य-धुरंधर' ह्या पत्राच्या मायन्यांत येणाऱ्या शब्दाप्रमाणें, खंडेरावाच्या स्वतः-च्याच पत्रांत तो योजतो ( ले. ५२ ). पण ती त्याची तेव्हां पदवी नव्हे. त्याच पत्रांत सेनापती हाहि शब्द आलेला आहे ती मात्र पदवी होय व त्याच पत्रावरील मुद्रेंत तशी ती आलेलीहि आहे.

खंडेरावांस सेनापतीपद मिळाल्याची नोंद पाहतांना प्रथम हे ध्यानांत घेतलें पाहिजे कीं आधीं तो सेनाखासखेल होता व नंतर सेनापती झाला. सेनापती पदाधिकार खंडेरावास मिळाला तेव्हां त्याच्या थोरल्या मुलाला -त्रिंबकरावास-सेनाखासखेली मिळाली. भाऊ असल्यास थोरल्या भावाकडे सेनापती पद व धाकट्याला सेनाखासखेली पद मिळावयाचें; बापलेक असल्यास बाप सेनापती व मुलगा सेनाखासखेल हाच क्रम ह्यापुढें हि चालला आहे.

संकलित व जुन्या इतिहासग्रंथांतील विविधतेचे उल्लेख वर दिले. आतां इतिहास साधन ग्रंथ व त्या आधारें लिहिलेले इतिहास ग्रंथ पाहतां खंडेरावास सेनापतीपद इ. १७१७ जाने. ११ ला मिळाल्याचें दिलें आहे. बाजीराव रियासत पृ. १७७ व बाळाजी विश्वनाथ रि. पृ. ९९. पण पे. द. भाग ३० पृ. २३९ वर जाने. ७ लाच खंडेरावांचा सेनापती म्हणून उल्लेख आहे. ह्याहि पूर्वी म्हणजे इ. १७१६ डिसेंबर ३० चाहि सेनापती म्हणून खंडेरावांचा निर्देश पृ. २३७ वर आला

आहे. तसेंच पे. द. १२ ले. ५ व शा. रो. पृ. ७८ कलम १५७ ह्या दोन पत्रांमधील मजकुराचाहि ह्या कालनिश्चितीसाठीं विचार व्हावयास पाहिजे. पे. द. १२ ले. ५ मध्यें खंडेराव स्वतः छत्र० शाहूस सांगतात कीं, 'सेवकास हे (सेनापती) पद यथास्थित देऊन गौरविले, यथाशक्ति सेवाहि करून दाखविली. (अशांत) जैसे तैसे सा महिने होते. पुढें उपनाव सेनापती (फक्त) सेवकास आणि सरंजाम (मात्र) फत्तेसिंग भोसले यांस. त्याजउपर थोडासा सरंजाम सेवकास दिल्हा तो फत्तेसिंगाच्याच अमलांत. तोहि लक्षाचे जागां मानिला पण तोहि मागतां मागता आठ वर्षें अतिक्रमली. परंतु रुपयास संबंध नाहीं. अगदी ऐवज फत्तेसिंगबावा यांजकडेच गेला.' ह्या मजकुरावरून दोन गोष्टी निदर्शनास येतात. एक, शाहूच्या ठिकाणीं खंडेरावाविषयीं तितका बरवेपणा नसल्यामुळें सेनापतीपदाचा अधिकार नुसता नांवाला दिला खंडेरावाला आणि त्याच्या अधिकाराच्या खर्चासाठीं जो प्रांत द्यावयाचा तो दिला फत्तेसिंगाला. दुसरी गोष्ट कीं, जो थोडासा उत्पन्नाचा गांव पुढें दिला तोहि फत्तेसिंगाचाच अधिकार असलेल्या प्रांतांत; ह्यामुळें आठ वर्षें त्याचेंहि उत्पन्न नाहीं. प्रस्तुता पुरती दुसरी गोष्ट येथें लक्ष्य आहे. सेनापतीपद दिल्याला वरील मजकुराचें पत्र लिहिलें त्यावेळीं आठ नऊ वर्षें झालीं होतीं. आतां ह्या पत्राचा काल कळला म्हणजे त्यापूर्वीं नऊ वर्षें खंडेरावास सेनापतीपद मिळालें असें म्हणतां येईल. ह्या पत्रांत भाद्र. शु. ७ भृगुवासर एवढेच कालनिदर्शक शब्द आहेत, वर्ष नाहीं. पत्रावर पे. द. त इ. १७२१ आगष्ट ८ हा काल दिला आहे. अर्थात् हा चूक आहे. कारण, ह्या पूर्वीं आठ नऊ वर्षें सेनापतीपद खंडेरावास मिळालें असें मानिलें तर इ. १७१२–१३ हाच सेनापतीपद–प्राप्तीचा काळ मानावा लागेल व तें तर शक्य नाहीं. कारण इ. स. १७१५ पर्यंत खंडेराव सेनाखासखेल आहे आणि सेनापती मानसिंग मोरे आहे.( पे. द. ३० पृ. २३१, शा. रो. इ.सं. ऐ. सं., सा. सं. ३ इ. इ. ). सेनाखासखेली नंतर सेनापतीपद हें अनेक आधारें निश्चित आहे. (प्रस्तुत ग्रंथ ले. २६, शा. रो. कलम १५६ इ.इ.) तेव्हां इ. १७१५ पर्यंत खंडेराव हा सेनाखासखेल आहे. व त्यानंतर त्यास सेनापतीपद मिळालें आहे. आतां अशाच मजकुराचें आणि वर्ष तारीख दिलेलें शाहूरोजनिशींतील पत्र लक्ष्यांत घेतां पे. द.तील पत्राचाही काल कळेल व ह्या दोन्ही पत्रांवरून सेनापतीपद मिळाल्याचें वर्षहि अंदाजितां येईल. शा.रो. तील पत्र शाहूनें खंडेरावास त्याच्या पत्राचें उत्तर म्हणून लिहिलें आहे. आणि त्या वेळच्या पत्रलेखनपद्धतीप्रमाणें ह्या उत्तरांत खंडेरावाच्या पत्रांतील 'सेवकाकडील सरंजाम येथपूर्वक देविला पाहिजे' हें वाक्य उध्दृत केलें आहे. ह्या पत्राचा काल शक १६४७ भाद्र. वद्य १ (इ. १७२५ सप्टं. १२) हा आहे. म्हणजे पे. द. तील खंडेरावाच्या पत्रानंतर शाहूनें खंडेरावास त्याचा सरंजाम देण्याचें योजिलें व 'दाक्षिणप्रांते मसलतीस जाण्याचा प्रसंगहि प्राप्त झाला होता तिकडे फौजेचा गाहा करून विजयादशमीस निघण्याचीहि शाहूनें त्यास आज्ञा केली व सरंजामाचे ताकीद रोखेहि पाठविले. अर्थात् पे. द. तील पत्राचें वर्ष, ह्या पत्रापूर्वीं ज्या वर्षी भाद्र-

शु. ७ स भृगवार येईल तें आणि इ. १७१५ नंतरचें पाहिजे. एकंदरींत पे. द. तील पत्राचें शक वर्ष श. १६४६ हें येतें. ह्या वर्षी भाद्र. शु. सप्तमी ९ घटकानंतर शुक्रवारीं लागतें. म्हणून इ. १७२४ आगष्ट १४ हा पे. द. १२ ले. ५ ह्या पत्राचा काल येतो व त्यापूर्वी आठ वर्षे म्हणजे श. १६३८ = इ. १७१६ मध्यें खंडेरावास सेनापतीपद मिळालें असें म्हणतां येतें.

इ. १७१७ जाने. ११ काय किंवा इ. १७१६ नोवें. डिसें. (३०) काय दीड–दोन महिन्यांचाच फरक. त्यासाठीं इतका बारकावा पाहण्यानें तीन गोष्टी ध्यानांत आल्या-११ तारखेस मिळालेल्या पदवीचा ७ तारखेसच उल्लेख येणें हा जो विरोध ( वा. वि. रि. पृ. ९९ व टीप ) त्याचा परिहार झाला. तसेंच कांहीं पत्रांची संगती लागली व कांहीं पत्राचा आंतील मजकुराशीं व इतर उल्लेखाशीं जमणारा काळ कळला शा. रो. पृ. ७८ कलम [ १५६ ] मध्यें जें इतकें खुलाशानें खंडेरावास सेनापतीपद मिळाल्याचें सांगितलें त्यांतील 'हल्ली' ह्या शब्दानें नुकतेच हा अर्थ घ्यावयाचा, 'आज' हा अर्थ घ्यावयाचा नाहीं ( कित्ता ).

ह्या विवेचनांत शाहू छत्रपती व खंडेराव दाभाडे ह्यांचे संबंध कसे होते हें दर्शित झालें आहे. वेगळें स्पष्टीकरण नको. पुढेंहि, कारणें असतलिच पण, असें घडलें कीं खंडेराव सेनापतीचा सेनाखासखेल झाला आहे. ले. ४३, ५७ पहा. वर दिलेल्या संकलित इतिहासांत व रा. खं. ३ ले. १६७ पृ. १७३ वर सेनाखासखेली व सेनापतीपद एकाच वेळीं एकाकडे असल्याचें दिलें आहे. पण पत्रांत तसा आढळ होत नाहीं. उलट सेनापती-पद मिळतें तेव्हां सेनाखासखेली मुलाला अथवा धाकट्या भावाला दिली जाते. व पुढें तर सेनाखासखेल हें पद गायकवाडांनाही दिलें आहे. असो. ह्या संबंधानें व सेनापतीत्व म्हणजे महाराष्ट्रराज्यांतील सर्व सेनांवरील अधिकारी ह्या नात्यानें तें पद होतें कीं काय ह्यासंबंधानें वेगळेंच लिहावयास पाहिजे. कारण एकाच कालीं आणखी सरनोबत म्ह० सेनापती आहे ( खं. ६ पृ. १ ). असो.

**मुद्राविचार**— ह्या भागांत राज्यकारभारापैकीं राज्यांतील निरनिराळ्या कचेऱ्यां-तील व्यवस्था ह्या दृष्टीनें कांहीं सांगण्याजोगें आलें आहे. उदा० राजकुटुंबांतील राजस्त्रिया राजकाजांत लक्ष्य घालीत व पत्रें लिहीत. त्या पत्रांवर त्यांची म्हणून कांहीं मुद्रा उठवीत. पण ती ' नाममुद्रा ' नाहीं ' मर्यादा मुद्रा ' आहे. हें मुद्राप्रकरण अशा पद्धतीनें कोठेंच सांगितलेलें नाहीं. मागें श्री. भा. वा. भट ह्यांनीं ऐतिहासिक मुद्रा म्हणून सुमारें शंभर पानांचा एक विस्तृत लेख विवेचनपूर्ण लिहिला आहे. त्यांत मुद्रांतील दैवतोल्लेखां-संबंधानें मुख्यतः पाहणी केली आहे. मुद्राधिकार, मुद्रास्थान, मुद्राभेद, मुद्रामुद्रण, मुद्रा-संगोपन, मुद्रामुद्रणद्रव्य इत्यादि बद्दल साधार स्पष्टता व्हावयास पाहिजे व त्यासाठीं अशा पुस्तकांची व स्वतंत्र विवेचनाची आवश्यकता आहे. प्रस्तुत भागांत आलेल्या मुद्रांना

अनुलक्षून एकदोन गोष्टींची किंचित् स्पष्टता करतों. ले. ८९ हें पत्र करवीरकर जिजाबाईंनी उमाबाई दाभाडे यांस लिहिलें आहे. ह्या पत्रांत त्यांची म्हणून वर म्हटल्याप्रमाणें ' मर्यादा मुद्रा ' आली आहे. मर्यादा मुद्रा म्हणजे, पत्र येथें संपलें, हा पत्राचा शेवट झाला, हें सांगून आतां तें पत्र व्यवहार्य झालें, हें सूचित करणारी मुद्रा. अशा मुद्रांतून—अगदीं थोडे अपवाद सोडून—व्यक्तिनामनिर्देश अथवा अधिकारनिर्देश आलेला नाहीं, यावयाचें कारणही नाहीं. ह्या मर्यादा—मुद्रा वेगळ्या वेगळ्या अधिकाऱ्यांच्या वेगवेगळ्या आहेत. व त्यावरून हें पत्र कोणाचें तें ओळखतां येतें. उदा० ' मर्यादेयं विराजते ' असें जर मर्यादा—मुद्रेंत असेल तर समजावें कीं हें पत्र शाहू येण्यापूर्वीचें तरी आहे किंवा कोल्हापुरकर छत्रपतींकडील तरी आहे. आणि ' मर्यादेयं राजते ' असें असेल तर तें पत्र सातारकर छत्रपतींकडील आहे. 'विराजते' आणि 'राजते' ह्या फरकावरून ही गोष्ट सूचित होते. प्रस्तुतची मर्यादामुद्रा करवीरकर छत्रपतीकडील राजस्त्रियांची आहे. छत्रपती घराण्यांतील राजस्त्रियांचा त्या वेळीं निराळ्या संकेतानें उल्लेख करीत. ' महाल पहिला ' किंवा ' वाडा पहिला ', ' महाल थोरला, ' थोरली धनीण ', धाकटी देवडी, थोरली देवडी इत्यादि लक्षणा करून राणीवशांतील स्त्रियांचा निर्देश करीत. इचलकरंजी इति० त ले. १८० मध्यें ' वाडा ४ यांस भाद्र. शु. १२ गुरुवारीं पुत्रोत्सव जाहला ' असा उल्लेख पुत्रजन्माची शर्करा पाठवितांना केला आहे. 'दरुनी महाल वाडा पहिला यानीं पत्रें करुन इनाम देविलें ' असा उल्लेख डोमगांव मठाचे कागदांत ले. ४४९ ह्या पत्रांत आला आहे. ह्याच प्रमाणें ह्या पुस्तकांतील जिजाबाईच्या पत्रावर ' चवथा वाडा मोर्तब सूद ' असा मजकूर आला आहे ( ले. ८९ ). रामदास भा.१ पृ. २१३ मधील येसूबाईच्या पत्रावर ' श्रीसखी राज्ञी जयती ' ही जी मुद्रा आली आहे तीहि मर्यादा मुद्रा असावी.

ह्या ग्रंथांत वा अन्यत्र रायगडकर, करवीरकर व सातारकर छत्रपतींच्या मुद्रा आल्या आहेत. त्या सर्व संस्कृतांत आहेत. प्रधानांच्या मुद्रा मराठींत आहेत. छत्रपतींपैकीं—करवीरकर संभाजी छत्रपती सोडून—एकाहि छत्रपतींनीं आपल्या मुद्रेंत स्वतःला नरपति, छत्रपती, भूपती, असलें एखादें राजपददर्शक पद लाविलेलें नाहीं, राजा एवढेंहि म्हणून घेतलेलें नाहीं. फक्त आपल्या मुद्रेचा गौरव मात्र गाइला आहे. दाशरथी राम, श्रीविष्णु आणि जगाचे मातापिता जे गौरीशंभु त्यांचा कृपाप्रसाद असलेली, शुक्लपक्षीय चंद्राप्रमाणें सर्वांना सुखदा व वर्धिष्णु असणारी, तेजस्वी, विश्ववंद्य आणि धर्मानें चालणाऱ्या सर्व वर्णांची संग्राहक इत्यादि प्रकारें मुद्रेचेंच स्तवन सर्व छत्रपतींच्या मुद्रांतून आलें आहे. स्वतःविषयीं कांहींहि न लिहितां धारण केलेल्या मुद्रेसंबंधानेंच केवल गुणागौरवात्मक लिहिणें ही खरोखर कौतुकाची व उच्च ध्येय—विचाराची गोष्ट आहे. तसेंच राजाचे प्रधानादिक मंत्री मात्र आपापल्या मुद्रांतून आपल्या राजाचा उल्लेख नरपती, छत्रपती, भूमींद्र, भूपाल असा करतात. रामचंद्र पंत अमात्यांच्या मुद्रेंत छत्रपतींचा उल्लेख नाहीं. असो. खंडेराव सेनापतींची मुद्रा

ह्या पुस्तकांत ले. ३७, ३८ व ५२ ह्या तीन पत्रांवर आली आहे. पहिल्या दोन पत्रांत ती शेवटीं आहे आणि तिसऱ्या पत्रांत प्रारंभींच आहे. पत्रांत विशिष्ट स्थलींच ह्या मुद्रा उठवीत असत. व त्या विशेषावरून पत्रलेखक व पत्र ज्याला पाठविलें तो ह्या उभयतांचे परस्पर अधिकारसंबंध कसे ते कळून येतात. खंडेरावांनीं आपल्या बरोबरीचे जे देशमूख त्यांना पाठविलेल्या पत्रावर शेवटीं मुद्रा उठविली आणि आपल्या हाताखालच्या म्हणतां येईल अशा पाटिलांना पाठविलेल्या पत्रावर आरंभीं उठविली आहे. खंडेरावांची देशमुखीची एक मुद्रा आहे ( रा. खं. १५ ले. पृ. १०३ ).

पत्राचे विशिष्ट मायने हे जसे एकमेकांचे वय, ज्ञाती, श्रेष्ठकनिष्ठसंबंध दर्शवितात त्याप्रमाणें कोणाची मुद्रा कोठें उठविली ह्यावरूनहि कारभारपद्धतींतील विशिष्ट व्यवस्था दिसून येते. असो; असें मुद्रा-प्रकरण स्वतंत्रच मांडण्याजोगें आहे. भाषेनंतर जसें व्याकरण तसा हा अभ्यासाचा भाग विचारार्थ येथें थोडा ह्या प्रसंगानें अभ्यासकांच्या पुढें ठेविला आहे. ऐतिहासिक पत्रें वाचतांना म्हणण्यापेक्षां त्या पत्रांच्या नकला करतांना ह्या गोष्टी अधिक लक्ष्यांत आल्या. ह्यामुळें येथें एक गोष्ट सांगणें अवश्य आहे कीं पत्रें जशींच्या तशीं छापलीं जाणें हें ह्या अभ्यासास मुख्य उपकारक आहे. मायने, शिक्के, पत्रांत ओळींतच जागा सोडलेली असते ती, रकान्यांतील लेखन, निशाण्या इ. जसेच्या तसे छापलें जाण्यानें जागा अडते व तें निरर्थक आहे असे जे कित्येक केव्हां म्हणतात तें बरोबर नाहीं. असा अभ्यास होऊन त्यांतील तो भाग नियमरूपानें निर्णीत स्वरूपात आल्यानंतर हें म्हणणें एका अर्थी कदाचित् चालेल.

इनामतीचीं गांवें व इसाफतीचीं गांवें पत्रांत आलेलीं आहेत. ह्यांतील भेद असा कीं, इनाम—गांवांतील सरकारी सारा जरी इनामदारास मिळावयाचा असला तरी त्यावर इनामतिजाई, देशमुखदेशपांड्याचे हक्क हे आकारले जातच. तसेहि कांहीं ज्यावर देणें आकारलें जावयाचें नाहीं ती देणगी ' इसाफत ' होय. ह्याविषयीं स्पष्टता वतनपत्रें निवाडपत्रें ले. ६ मध्यें पृ. २७ व ३२ वर आली आहे. तेथें म्हटलें आहे ' मातुश्री जिजाबाईसाहेबांचा सरदेशमुखीचा मौजे कामथडी तर्फ खेडेबारें हा इसाफतीचा गांव, तेथे देशमूख देशपांडे यांचा हक्क नाहीं.'

**दुरुस्ती** व **भर**—ह्या भागांत आलेल्या कागदांमुळें ह्यापूर्वी अन्यत्र छापलेल्या कागदांत कोठें काय दुरुस्ती, भर व पाठपुरवणी होते तेंहि सांगणें अवश्य आहे.

**ले.** ८ नें पे. द. ३१ ले. ८० ची पूर्तता व स्पष्टता होत आहे. पे. द. तील पत्र श. १६२३ (१७०१) मधील असून त्यांत गंगाजल निर्मल बारहाईस, ( सरकारी नियमा-प्रमाणें फुल्या दर्शवून म्हणजे ग्रामनामें ) न छापतां तीं इनाम दिलीं आहेत. हीं गांवें कोणचीं तें ले. ८ मध्यें आलें आहे आणि पे. द. तील पत्रांत ज्या मुख्य सनदेचा उल्लेख वर्ष ( सु. ११९७ ) सांगून केला ती मुख्य सनद ले. ८ हीच असून शिवाय पत्राचा

अर्थ कसा घ्यावयाचा तेंहि ह्या दोन्ही सनदांमुळें कळणार आहे. पे.द. तील पत्रांत वाल्हाई 'गंगाजळ निर्मल' आहे आणि ह्या भागांतील ले. ८ च्या पत्रांत ती 'सौभाग्यवती' आहे.

रा. सं.३ पृ. १७४ वर तेळगांवच्या प्रथम ५ चावर मिळालेल्या इनाम जमीनीचा चकनामा म्हणून दिला असून त्यांत राजशक १७ मधील त्याच जमिनीचें आज्ञापत्र आलें आहे तें अपुरें दिसतें. त्यांतील पुरता मजकूर त्यासंबंधीच्या अभयपत्रांत आहे व तें अभयपत्र प्रस्तुत भागांत ले. ४ हें आहे.

'स्थिरबुद्धि राजाराम' ह्या पुस्तकांत पृ. ४४ वर खंडेरावाचे आईस-वाल्हाई-तळेगांव मिळालें असें आलें आहे तेथें धामणें व उरसें असें पाहिजे ले. ८ व टीप.

काव्ये. सं. दाभाडे हकिकतींत पृ. ३ वर तळेगांव, धामणें व उरसें खंडेरावास व वाल्हाईस मिळालें असें जें म्हटलें त्याच्या सनदा ह्या ग्रंथांत ले. ७, ८ व टीप यांत आल्या आहेत. तसेंच तेथेंच सरपाटिलकीचें व देशकुलकर्णाचें दर शेकडां उत्पन्न देण्यांत चूक झाली आहे ती ले. ७ वरून दुरुस्त होईल.

ले. १८ ह्यांत इंदुरी ह्या नांवाची जागा फाटण्यांत गेली तेथील हें ग्रामनाम काव्ये. सं पृ. ७ वरून कळत आहे.

ले. १४ मधील केदारजी बोत्रे सेनाखासखेल हा, पे. द. ३० ले. १७ प्रमाणें त्रिंबकराव दाभाडे सेनाखासखेल ह्याच्या हाताखालीं आहे.

ले. ९० हें पत्र काव्ये. सं. त पृ. १८, परांडेकर इति० त पृ. १३१ आणि धनुर्धारी इति० त.पृ. ४६ वर आलें आहे. काव्ये. तील पत्रांत दुरुस्ती पाहिजे ती कोणची हें हें ह्या भागांतील ले. ९० वरून कळेल.

ले. ५९-काव्ये. सं. पृ. ७ वर सरदेशमुखी म्हणजे दर सदे 'दोहोत्रा' असें आलें आहे. पण 'दाहोत्रा' असें या ह्या पत्रांत आहे.

ले. ३७, ३८, (४३), ५२ वरून पे. द. १२ ले. ३ (१०), १३, २० (२३) वर आलेली खंडेरावाची मुद्रा दुरुस्त होईल.

येणेंप्रमाणें ह्या भागांत आलेल्या पत्रांसंबंधीं कांहीं विवेचन केलें. पत्रांना आवश्यक तो खुलासा टीपांतून दिला आहे. हा खुलासा पत्रांतील मुद्रांचो व भिन्नाक्षरांत आलेल्या लिखाणाची माहिती सांगणारा तपशील आहे. ह्या तपशिलामुळें वर म्हटल्याप्रमाणें त्या कालच्या राज्यकारभारपद्धतींतील राजकचेरीमधील लेखनव्यवस्थेचे काय नियम होते तें कळून येतात. म्हणून पत्र जसेंच्या तसेंच प्रतिमारूपानें देण्याच्या अभावीं अशा टीपा अवश्यच होत. खंडेराव दाभाड्यांच्याच मुद्रेचें उदाहरण घेऊन ह्या तपशिलावरून मुद्राविषयक एक नियम निघतो तो सांगतो. खंडेराव सेनापती झाल्यानंतर त्यांची

ती मुद्रा पत्रावर येऊं लागली. पण खंडेरावांनीं छत्रपतींना पत्र लिहिलें, बाजीराव प्रधानांना पत्र लिहिलें आणि देशमुख व पाटील ह्यांनाहि पत्र लिहिलें तर ह्या चारहि पत्रांवर खंडेरावाची नाममुद्रा नसणें, पाठीमागें असणें, शेवटीं व पत्रारंभीं असणें असे अनुक्रमें चार प्रकार आहेत. ह्यामध्यें स्वामींविषयीं पूज्यभाव, आदर, स्नेह आणि आज्ञा हे चार भाव दिसून येतात. ह्याप्रमाणेंच पेशवे प्रतिनिधी व सुभेदार इत्यादि राजमुद्राधिकाऱ्यांच्या मुद्रांसंबंधानें सांगतां येईल. गोतमुद्राधिकाऱ्यांच्या विषया पत्रांतून 'शिक्का नांगर निशाण्या करून पत्र करून देऊं' असें वाक्य येतें. म्हणजे गोत–कचेरी किंवा गांव कचेरीचें स्वरूप वेगळें आणि दिवाण किंवा राज्यकचेरीचें स्वरूप वेगळें. हें सर्व ह्या प्रस्तावांत सांगणें अशक्य. पण त्यासाठीं अवश्य असलेला तपशील पत्राला जोडून सांगितलेला असणें इष्ट, म्हणून तो टीपांतून देण्याचा यत्न केला आहे.

सेनापती दाभाडे यांची वंशावळ दिली आहे. त्यावरून आतांपर्यंत आलेल्या वंशावळींत कितीबरी नवीन माहितीची भर पडेल व दुरुस्तीहि होईल. दाभाडे व्यक्तींच्या संबंधानें येथें करावयाची ती स्पष्टता व चर्चा वंशावळीला जोडलेल्या टिपणीमध्यें केली आहे.

असो. झालें हेंच लिहिणें मंडळाच्या आर्थिक दृष्टीनें अधिक झालें; तेव्हां थांबणें प्राप्त आहे. प्रारंभीं श्रीमंत सरदार आबासाहेब दाभाडे ह्यांचे आभार मानले आहेत. पुनः एकदां आभार मानून व ह्या कामीं श्री. भा. नी. भिडे वकील तळेगांव, श्री. गो. नी. दांडेकर, श्री. चनुभाई मारवाडी, श्री. अंबादास डावरे, श्री. ग. ह. खरे, प्रा. ओतुरकर, श्री. रु. वा. पुरंदरे, श्री. ब. द. आपटे, श्री. ब. मो. पुरंदरे, श्री. स. रा. खरे ह्या सर्वांचे साहाय्य झालें त्याबद्दल त्यांचेहि आभार मानून व मुद्रणाधिकारी श्री. वि. अ. पटवर्धन ह्यांचे त्यांच्या मदतनीस खिळारी मंडळीसह आभार व्यक्त करून हा प्रस्ताव पुरा करतों.

आषाढ शु. ११।१८७३ }
दि. १५।७।१९५१ }

शंकर नारायण वत्स जोशी
भा. इ. सं. मं. पुणें.

# वंशावळीवरील टिपणी

* ह्या आठहि दाभाडेव्यक्तींचा उल्लेख शिलालेखांत आला आहे. ले. ५० व इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २ पृ. ८३–८४.

१ ह्याचा उल्लेख बज, बाज अथवा बाजी पाटील असा बखरी व पत्रें यांमधून येतो. काव्ये. सं. हकीकत पृ. १; प्रस्तुतग्रंथ ले. ५. ह्या बाजीच्या वेळेस तळेगांवच्या पाटिलकींत वांटण्या झाल्या. ले. ५ व रा. खं. ३ ले. १६७.

२ येसजी पन्हाळा येथें मृत्यु पावले. काव्ये. सं. हकी. पृ. ३; परांडेकर इति० पृ. २८; प्रस्तुत ग्रंथ ले. ८ टीप.


३ छत्र० राजारामांचा कबिला = बायकामुलें वेषांतर करवून जिंजी किल्याबाहेर काढण्याच्या गडबडींत, स्वतःचा म्हणजे येसजी खंडोजीचा 'कबिला म्ह० वाल्हाई वगैरे किल्याबाहेर निघो न पावले. सबब तेथेंच मारून टाकिले' असें जें काव्ये. सं. तील हकीकतींत पृ. २ वर आलें आहे तें बरोबर नाहीं. कारण वाल्हाई इ. १७०१ पर्यंत जिवंत आहे. पे. द. ३१ ले. ८०; प्रस्तुत ग्रंथ ले. ८ व टीप पहा.

४ ह्या शिवाजीस जिंजीहून येतांना वाटचालींत रक्ताच्या गुळण्या येऊन, काळीज फाटून मृत्यु आला असें काव्ये. सं. हकी. पृ. ३ वर आहे तेहि बदललें पाहिजे. हा वऱ्हाडांत युद्धांत मरण पावला असें खं. ३ पृ. १७३ वर आलें आहे.

५ खंडेराव. प्रस्तावना पृ. ४–५ पहा. खंडेरावांचा कागदोपत्रीं उल्लेख इ. १६९१ पासून आढळतो. म्हणजे हे ३८ वर्षे प्रत्यक्ष कामकाजांत आहे. ह्यांचा मृत्युसन इ. १७२९ सप्टें. २७ श. १६५१ आश्विन वद्य १ रियासत; १७३० जाने. ८ हिंगणे द. १ पृ १६०; १७२९ मे १५ लेखनालंकार पृ. ८६; इ. १७२१ परांडेकर इति. पृ. ६०–६१. असा भिन्नाभिन्न आढळतो त्याचा विचार झाला पाहिजे. पण येथें स्थलकालाभावीं शक्य नाहीं. ह्यास तीन बायका होत्या. वडील उदाबाई–पिंपळवडीची. मधली पार्वतीबाई–मचाले येथील ( ले. ४४ ) व तिसरी उमाबाई. उदाबाईला सुंदरा व हंसा अशा दोन मुली. त्या सेरेकर ढमाले (यशवंतराव) व मलवडीकर घाटगे यांजकडे दिल्या.

६ उमाबाई ही अभोणकर देवराव ठोके यांची कन्या. मृ. श. १६७५ मार्ग. शु. ४ बुधवार = १७५३ नवं. २८. रा. खं. ६ पृ. ९९ पुणें येथें नडगेमोडी जवळ डेऱ्यांत मृत्यु. उमाबाईंना त्र्यंबकराव, शाहाबाई ( कुलाबकर आंग्रे ), दुर्गाबाई ( पाटणकर – पाटण ), यशवंतराव, आनंदीबाई ( अकलूजचे निंबाळकर ) व बाबुराव असे तीन मुलगे व तीन मुली झाल्या.

७ त्रिंबकराव दाभाडे, डभई नजीक थवाई येथें लढाईत मृत्यु. श. १६५३ चैत्र शु. ६ गुरुवार = १७३१ एप्रील १ ( पे. द. १२ ले. ४६ व इ. सं. ऐ. टि. ३ पृ. ४० ले. २४ दोन्ही ठिकाणीं एकच पत्र आहे.) ह्यांस दोन बायका. थोरली लक्ष्मीबाई (मोहनसिंग व ×देऊबाई खानदेशकर रजपूत कन्या) व धाकटी गिरजाबाई (खोलाडकर घाटगे घराण्यांतील). पे. द. १२ ले. १०९. ही १७६३ डिसें. ८ मृत्यु पावली. त्र्यंबकरावास संतान नाहीं.




( सेनापती दाभाडे दफ्तर भाग पहिला )

( १६, १७ सर्व विद्यमान )

# तळेगांव–सेनापति दाभाडे वंश

* सोमाजी ( चऱ्होलीकर घराणें )

* कृष्णाजी

* बाबूराव × *सगुणाबाई

* सवाई बाळ

८यशवंतराव
मृ.इ. १७५४ मे १८
× आंबिका व × सगुणा

आनंदीबाई
(निंबाळकर)

९ बाबूराव × ताराबाई

नरसिंगराव–धर्मपुत्र

१० त्र्यंबकराव
मृ. इ. १७९९
× मैना व × लक्ष्मी

मुक्ताबाई पुतळाबाई ? )
निंबाळकर

कुशाबाई
(शेळके देशमुख)

शिवराव
मृ.श. १७००

११ यशवंतराव × लाडोजी देशमुखकन्या
द. आले. मृ. इ. १८३२

१२ त्र्यंबकराव × मैनाबाई मृ. श. १७७०
मृ. इ. १८३७

१३ बाबुराव × चिमा व × आनंदीबाई

१४ खंडेराव ( आबासाहेब ) × राजसबाई

यशवंतराव × वत्सलाबाई (माहेरचें नांव राधाबाई कदम)

१६ वीरधवल × मंगलादेवी

विजयासिंह × मृणालिनीदेवी

१७ संग्रामसिंह

अजितसिंह

पद्मसेन

८ यशवंतराव खंडेराव. सेनापती इ. १७३१ ते १७५४ मृ. श. १६७६ वैशाख वद्य १२ शनिवार (१७५४ मे १८) खं. ६ पृ. १०६. यांस दोन बायका. वडील अंबिकाबाई मलोजी पवार वाघाले नाशिककर यांची कन्या. हिचीच मुलें त्रिंबकराव (दुसरे) व मुक्ताबाई (साबाजी नाईक अकलूजकर निंबाळकर यांस दिली). दुसरी बायको गोविंदराव अडबोजी नाईक शितोळे देशमुख पुणें यांची कन्या सगुणाबाई. लग्न [illegible]गांवीं. वय ११. श. १७६४ ज्येष्ठ शु. ११ मंगळवारीं झालें—खं. ६ पृ. ७७.

९ बाबुराव खंडेराव सेनाखासखेल मृ. श. १६५८ मार्ग. शु. १३ शनिवार इ. १७३६ डिसें. ४ पे. द. १२ ले. ९३ व पे. द. २२ ले. ३४३. त्यांची बायको ताराबाई (हरिसिंग बळवंत ठोके यांची बहीण). त्यांस नरसिंगराव म्हणून धर्मपुत्र आहे. पे. द. ४० ले. ६६.

१० त्र्यंबकराव यशवंतराव. वेरुळाजवळ घृष्णेश्वरीं मृत्यु इ. १७९९. त्यांची वडील स्त्री मैनाबाई (धारराव पाटणकर यांची कन्या.) हिची मुलगी कुशाबाई (गुणाजी संक्राजी देशमुख शेळके यांस दिली). धाकटी स्त्री लक्ष्मीबाई (हरसिंगराव ठोके आभोणकर यांची कन्या) हिला शिवराव हा मुलगा झाला पण तो लहान असतांच ८ वे वर्षी मृत्यु पावला. श. १७००. मग यशवंतराव दत्तक घेतला.

११ यशवंतराव त्रिंबकराव. २ रे. हे शेवटीं मुलगा त्र्यंबकरावावर कारभार सोपवून आपण मथुरेस गोपाळकृष्णाचें मंदिर व स्वतःकरतां वाडा बांधून राहिले. त्यांची उपस्त्री भागिरथी, त्यांनींहि धर्मशाळा तेथेंच बांधिली. मथुरेंत एक बागहि आहे. यशवंतराव मृत्यु श. १७५५ वै. शु. १०

१२ त्र्यंबकराव यशवंतराव. त्यांची पहिली पत्नी ग्वाल्हेरकर अलिजाबहाद्दर दौलतराव शिंदे यांची कन्या. लग्न ग्वाल्हेर येथेंच. दुसरी पत्नी कोल्हापूरकर गायकवाड घराण्यांतील. त्यांचेच पुत्र बाबुराव होत.

१३ बाबुराव त्र्यंबकराव. यांस दोन बायका. संगमनेरकर गुंजाळ घराण्यांतील वडील व तिच्या पश्चात् धारकर महिपतराव पवार यांची कन्या. आनंदीबाई धाकटी. मृ. इ. १८५५ ऑगस्ट १६. बाबूरावांस शिकारीचा नाद फार होता. मृ. श. १७७५ कार्तिक शु. ५ उज्जयिनी येथें.

१४ खंडेराव उर्फ आबासाहेब बाबूराव. त्यांचे जनकघर धारकर पवारांचें व जन्मनांव अमृतराव. दाभाडे घराण्यांत आनंदीबाईनीं दत्तक घेतल्यावरचें नांव खंडेराव ठेविलें. इ. १८७० अधिकारप्राप्ति. त्यांस शिकारीचा नाद फार असे. त्यांच्या पत्नी राजसबाई.

१६ वीरधवल ऊर्फ आबासाहेब हे वडील बंधु व विजयसिंह हे धाकटे बंधु. उभयतांच्या पत्नी सौ. मंगलादेवी व मृणालिनीदेवी ह्या कोल्हापूरकडील घोरपडे घराण्यांतील. हेंहि घराणें कापशीकर घोरपडे सेनापती यांचे आप्त होय. वडीलबंधूंना रजनी, संग्रामसिंह, अजितसिंह व अजितवीरा अशा दोन मुली व दोन मुलगे असून धाकटे बंधूंना एक मुलगा आहे तो पद्मसेन.

# सेनापती दाभाडे दफ्तर भाग १

## विषयसूची

विषयनामें अकारादि क्रमानें दिलीं असून नामा पुढील आंकडा लेखांक होय.


अदिकारीपण = देशमुखी वतन १२
अधिकारी २०
अभयपत्र ४ व टीप पृ. ४,१६,२२ टीप,
आयपत्र ६
आज्ञापत्र ४ टीप, ५१, ५२
आज्ञाप्रमाण २०, २१
इनाम तिजाई ३३, पत्र ४९, ६१ — पत्र ६१
इसाफत ४९ व टीप, ५५,५६
कर्ज ५४, — व फेड ५७
कमाविसदार २०, ४३, ७४
क़रिणा २३
कुलकर्णं १
कुसूं ३८
गनीम ९
गोत ५१, ५३
गोष्टी २९, ३०, ४०, ५३, ५४
घाट २०
घुमट ५०
चोरी १ व ती करणाराचे धन्यास पकडणें १
चौगुला ३६
जकात ३, १०, १७, २०, ६०
जमान ३०
जहागीर २३
जाणिजे २, ३, ४, ९, १३, १४,३५, ३६
जलूस सन ६७
टक्कर — हेले १०३
ता। तर्फ ६, ८, १२, १५, १६, १९, २१, २७, २९, ३०, ३१, ३५, ३६, ३९, ४१, ४२
तलब येणें १५
ता। तपे ३९, ५१
दुतरफा ६६
देवालय—शुक्रेश्वर, कचेश्वर १०१
देशकुलकर्णी १६, २८
देशपांडे सरकार जुनर व परगणे पारनेर १५,—वाई २५,२८,२९,३२,३४,३६
देशमूख १ देशमुखी = अदिकारी पत्र १२,२३, २८, २९, ३०, ३२, ३४, ३६, ३७, ३८, ३९ देसाई, ४८, ४९—ची पदवी ५१
दंगा चंद्रसेन जाधव ६३
नजर ७५
नाईकी—जकात चौऱ्याची ३, सावकारी १४, = महाजनकी २३, २९
नाणीं २, ३, ६, १२, १४, १६, २३, २४, ३०, ७५, ८६, ८७, ९६, ९९, १००—टके ३, २०, २९
नामजाद ३, ११, ३६, ४३, ६४, ६५,
निगावन अधिकारी जकात चौत्रे ३, २०
निदेशसमक्ष ४, ८, १७
निसिंदे पथकी २०
पट्टी ३८
परगणे—पुणे २, ६, २९—चाकण ४,७,२९, ३२—पारनेर १५,—भामेर २८—पौन मावल ३०,—कौतूल ३४

पाटिलकीची खरेदी पृ. ५३ व चौथी तकसीम लावणी पृ. ५४
पाटिलकी बद्दलचा खर्च ६३
पाटिलकीचे मान उत्पन्न ५, १९–त्या धन्यांत बदल ९–ची खरेदी १६,२४, २९–व काली पांढरी २५–निमे ३५, ५१
पानसरे २०
पोता महाल ६०
पंचायत ६२
पांढरीची वांटणी ६६
प्रांत–जुनर ४, ३१–पुणे ८, १६ –मावल ८, १६, ३५–कल्याण १२–बागलाण २७ – त्रिंबक ३२ –हरिश्चंद्र ३४
फौजांचें आगमन ७०
बटीक ५३
बंद धरून नेणें ६७
भाव ४४
भाषा २९, ३०
भिकणें निा वाणी ३
भ्रष्ट पृ. ५४
मजमदार दिा सेनाखासखेल ७२
महजर ६४
महाजनकी २३
महार १५
मिती तारीख २ टीप
मुकासा १८, २८, ३१, ३२ निमे ३४, ४२, ७२
मर्यादा मुद्रा १३–विराजते राजारामाची ४, ५–लेखन सीमास मुल्खती १२, १९–म. राजते २०, २१–देशमुखी ५१–प्रतिनिधी ६, ८,१८, २२, २७, टीप २८, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३९, ४१, ४२, ४६, ४७, टीप, ४८, टीप ९, ५५,
मुद्रा – केदारजी बोत्रे सेनाखासखेल १४ – खंडेराव दाभाडे ३७, ३८, ४३, ५२ धारे देशमुख ५१, ७, नारो राम मंत्री ४५ –पंताजी शिवदेव नामजाद –प्रधान बा. वि. २७, २८,३१, ३२, ३३,३४,३५,बाव.३९,४१,४२,४६, ४७४८, ४९, ५५, ५८, ५९ प्रधान बा. ब. २७ टीप, निळो मोरेश्वर ४, ६, ८, १०, १३, २२–सुभेदार नारो दामोदर २७ बहिरो मोरेश्वर ११,१२,१७,१९,२०
मुलकी उत्पन्न हक १०
मुशाहिरा–दरमहा ३
मोर्तबसुद ७
राजदेशमुखी वतन १०
राजमंडल ६
रामराम १, ४, ३८, ४३, ५७, ६६, ७०
लूट ६७
लेखनालंकार १८, २२, २७, २८ ३१, ३२, ३४, ३५, ४८, ४९, ६१
वडीलपण ५१
वतन व त्याचें उत्पन्न १० पत्र ३५, ४८, ५१, ६८, ७३
वरातदार ६३
वर्खे देकार ६९
वाटेंतील माल पोच २
वापी ५०
विनंती ब्राह्मणास १५
वृत्तिपत्र म्ह० वतन १०, १६
व्याकरण १, २३, ५१, ५३, ६२

व्याज ४०, ४३, ५४
शेटे महाजन १५
शेताचें नांव २३
शेरणी ६८
सण ४४
सती जाणें १०१
सदर—सुभेदार व देशमुख देशपांडे हे हजर असलेली सभा पृ. ५३, ५४
सरकार— संगमनेर १ –, जुनर ३, ७ १५,१७,१९,२०,२९,३०,३२,७३
सरदेशकुलकर्ण वतन १०
सरदेमुखी ५८,५९ सरदेश० दाहोत्रा, ७१
सर पाटिलकी व त्याचें उत्पन्न ११, १९, –मोकदमी १७, २० व टीप, ४३, ७१,७२ टीप ७३, ७४
सवादपत्र ५१
सुभेदार ३, सुभा ७, ४०, ५९, ६४
सेनाखासखेली २३, २६, ३२, ३४, ५७
सेनापती २३, २६, ३०, ३१, ३३, ३७, ३८
सेरणी (हर्की पहा) ६, १६, ३५
संख्या लेखन ५१
संमत पृ. ६३
हडोला १५ टीप
हरकारा ६२ पृ. ५१
हर्की १२, २४, ३५ (सेरणी पहा)
हवालदार २१
हवेली—पुर्णे २, ८, कोल्हापूर २२,
हशम २१

## शिवचरित्र साहित्य खंड

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | किं. रु. |
| खंड १ | स्वी. ग्रं. मा. क्र. ३० | पुरंदरे व द. वि. आपटे | पृ. १५४ | (श. १८४८) | १॥ |
| २ | " " " ३३ | मंडळ चिटणीस | पृ. ४२६ | (श. १८५१) | ४ |
| ३ | पुरस्कृत ग्रं. मा. क्र. २४ | शं. ना. जोशी व ग. ह. खरे | पृ. २७८ | (श. १८५२) | ३ |
| ४ | स्वीय ग्रं. मा. क्र. ३८ | मंडळ चिटणीस | पृ. १२६ | (श. १८५६) | १॥ |
| ५ | " " ५५ | शं. ना. जोशी | पृ. ३६३ | (श. १८६४) | ३॥ |
| ६ | " " ४७ | ग. ह. खरे | पृ. १५० | (श. १८५९) | १॥ |
| ७ | " " ५० | रु. बा. पुरंदरे व ब. द. आपटे | पृ. १६४ | (श. १८६०) | १॥ |
| ८ | " " ५५ | शं. ना. जोशी | पृ. १३२ | (श. १८६४) | १॥ |
| ९ | " " ६२ | शां. वि. अवळसकर | पृ. १२८ | (श. १८६६) | १॥ |

## ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | किं. रु. |
| खंड १ | स्वीय ग्रं. क्र. ३५ | मंडळ चिटणीस | पृ. २०२ | (श. १८५३) | २ |
| २ | " क्र. ४२ | मंडळ चिटणीस | पृ. १०० | (श. १८५६) | १॥ |
| ३ | " क्र. ५४ | शं. ना. जोशी | पृ. ३३२ | (श. १८६३) | ३ |
| ४ | " क्र. ५६ | मंडळ चिटणीस | पृ. १८६ | (श. १८६४) | १॥ |
| ५ | " क्र. ६१ | मंडळ चिटणीस | पृ. ९५ | (श. १८६६) | १॥ |
| ६ | " क्र. ६४ | शं. ना. जोशी | पृ. १०६ | (श. १८६७) | २ |
| ७ | " क्र. ६८ | मंडळ चिटणीस | पृ. ७२ | (श. १८६९) | २ |

| | | |
|---|---|---|
| **ऐतिहासिक संकीर्ण निबंध** | खंड १ (श. १८६५) पृ. ११२ | किं. रु. १॥ |
| " " " | खंड २ (श. १८६९) | किं. रु. ३ |
| " " " | खंड ३ (श. १८६८) पृ. ७७ | किं. रु. २ |
| " " " | खंड ४ (श. १८७०) | किं. रु. २॥ |
| **पुणे नगर संशोधन वृत्त** | खंड १ (श. १८६४) पृ. ८६ | किं. रु. १ |
| " " | खंड २ (श. १८६५) पृ. ७५–१७६ | किं. रु. १॥ |
| " " | खंड ३ (श. १८६८) पृ. १८७–२६९ | किं. रु. २ |

## ॲबट ( महाराष्ट्र संतकवि ) ग्रंथमाला

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ भानुदास डॉ. ॲबटकृत | रु. १ | ७ तुकाराम | " | रु. १॥ |
| २ एकनाथ " | रु. १॥ | ८ रामदास | " | रु. २ |
| ३ भिक्षुगीत " | रु. १॥ | ९ भक्तविजय भाग | १ ला | रु. ३ |
| ४ दासोपंत " | रु. १॥ | १० भक्तविजय भाग | २ रा. | रु. ३ |
| ५ बहिणाबाई " | रु. १ | ११ भक्तिलीलामृत | " | रु. ३ |
| ६ स्तोत्रमाला " | रु. १ | १२ ज्ञानेश्वर | " | रु. ३ |

कापडी बांधणीस ८ आणे जादा.

# सेनापती दाभाडे दफ्तर भाग १ ला

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| निवेदन | पृ. १—२ |
| प्रस्तावना | १–१२ |
| सेनापती दाभाडे वंशावळ टिपणीसह | १३–१६ |
| विषयसूची | १७–१९ |

| लेखांक | लेखविषय | शक वर्ष |
|---|---|---|
| १ | अपन सिसोदे नहो बरोडे दाभाडे अहो | १४३२ |
| २ | वाटचालीच्या मुकामामधील मालपोच | १५९५ |
| ३ | जकात–चौत्र्याची नाईकी | १६०८ |
| ४ | छत्र० राजारामाबरोबर खंडेराव कर्नाटकास आले | १६१३ |
| ५ | दाभाडे व तळेगांव पाटिलकी | १६१३ |
| ६ | छत्रपती–चर्के व–फलं–वसूलपत्रक | १६१६ |
| ७ | पुत्रोत्सवार्थं दाभाडे यांस इनाम | १६१८ |
| ८ | सौ० वाल्हाई आऊस इनाम | १६१८ |
| ९ | मुसलमानाकडील वाईची पाटीलकी दाभाडे यांजकडे | १६१९ |
| १० | राज–देशमुखी व सरदेशकुलकर्ण–बीड | १६२० |
| ११ | प्रांत जुन्नरची सर–पाटीलकी | १६२३ |
| १२ | निवारसी देशमुखी वतन दाभाड्यांना | १६२३ |
| १३ | परगणे कोल्हापूरची देशमुखी व बीड इनाम | १६२४ |
| १४ | सेनाधारासहस्त्री केदारजी बोत्रे | १६२५ |
| १५ | सातहीं तरफांची महारांना माफी | १६२५ |
| १६ | खंडेराव व कृष्णाजी दाभाडे यांस पाटीलक्या | १६२८ |
| १७ | शाहू छत्रपतींकडून खंडेरावांस सर–मोकदमी | १६३० |
| १८ | पुरंदर तनख्याकडील गांव दाभाड्यांकडे | १६३१ |
| १९ | नाणे–व पौन–मावळची सरमोकदमी खंडेरावांकडे | १६३१ |
| २० | पानसरे, जकातदार, पथकदार यांस दाभाड्यांबद्दल पत्र | १६३१ |
| २१ | पौन मावळच्या हवालदारास पत्र | १६३१ |
| २२ | कोल्हापूर हवेलीची देशमुखी | १६३६ |
| २३ | तुकोबा–शिष्य गंगाजीबावा मवाळ महाजन | १६३८ |
| २४ | बाळाजी विश्वनाथाचें पत्र | १६३८ |

| लेखांक | लेखविषय | शक वर्ष |
| --- | --- | --- |
| २५ | कठापूरची वांटणी | १६३९ |
| २६ | सेनाखासखेलीवरून सेनापती-पदावर | १६३९ |
| २७ | सौ. उमाबाईकडे चेहेज इनाम चालविणें | १६३९ |
| २८ | काळोजी भोसले यास परगणे मामेरचा मोकासा | १६३९ |
| २९ | खंडेरावास ( घोटी ) वाघोली ऐवजी किरकटवाडीची पाटीलकी | १६४० |
| ३० | सावंत दे० यांचा घारे दे०सांस वायदे रोखा | १६४० |
| ३१ | खंडेरावांकडे निंबगांवचा मोकासा | १६४८ |
| ३२ | प्रांत-त्रिंबकचा मोकासा सेनाखासखेल त्रिंबकरावाकडे | १६४० |
| ३३ | इंदुरी खंडेरावास इनाम | १६४१ |
| ३४ | त्रिंबकराव सेनाखासखेल यांस परगणे कोतूल निमे | १६४१ |
| ३५ | चांदखेड पाटिलकींत दाभाडे हिस्सा | १६४१ |
| ३६ | चांदखेड पाटीलकी पुनः | १६४२ |
| ३७ | खंडेरावांचे घारे देशमुखांस पत्र | १६४२ |
| ३८ | पटी करून गांवकुसूं-खंडेराव पत्र | १६४२ |
| ३९ | दाभाडे-देसाई व त्याबद्दल चिंचवड इसाफत | १६४३ |
| ४० | हवाला खत रोखा-सावकारी पत्र | १६४३ |
| ४१ | दामाजी खंडेराव | १६४३ |
| ४२ | साल उंबरे कृष्णाजी दाभाड्यांस मोकासा | १६४३ |
| ४३ | कमाविसदार सावकार | १६४३ |
| ४४ | बाजारभाव, सण | १६४४ |
| ४५ | नारो राम मंत्री यांचें पत्र | १६४४ |
| ४६ | बेचिराख गार-ची पुनर्वसाहत | १६४५ |
| ४७ | देसाईपणाबद्दल चिंचवड इसाफत | १६४५ |
| ४८ | कृष्णाजी सोमाजी दाभाडे-देशमुख व इनाम | १६४५ |
| ४९ | देशमुखीच्या वतनास इनाम इसाफत गांव | १६४५ |
| ५० | विहीर व घुमट-लेख | १६४५ |
| ५१ | घारे व दाभाडे देशमुख-सलोखा | १६४६ |
| ५२ | खंडेरावांचें ढमाले-पाटलास निमंत्रण | १६४६ |
| ५३ | बटकोंच्या खुनाची कबुली | १६४६ |
| ५४ | ऐ० कागद गहाण ठेऊन कर्ज | १६४६ |
| ५५ | इनाम व इसाफत गांवावरील जिल्हेकडील निजाई | १६४६ |
| ५६ | करूंज-चा मोबदला मलवंडी | १६४७ |

| लेखांक | लेखविषय | शक वर्ष |
|---|---|---|
| ५७ | कर्ज व त्याची फेड | १६४८ |
| ५८ | सातगांव, कान्हूर इत्यादी सात तर्फांची सरदेशमुखी | १६४८ |
| ५९ | बाजीरावांचे जुन्नर सुभेदारांना पत्र | १६४८ |
| ६० | स्वारीस जातेवेळची तरतद यादी | १६४९ |
| ६१ | बाजी संभाजी दाभाडे हे स्वामीच्या राज्यांतील एकनिष्ठ सेवक | १६४२ |
| ६२ | तंटा तोडण्यासाठीं दिल्लीची स्वारी | १६४५ |
| ६३ | एक यादी | १६४५ |
| ६४ | बुध-कटापूरकडे मोगली धामधूम व दाभाडे कटापूरच्या पाटिलकीचा अंश खरीदतात | १६४६ |
| ६५ | दाभाड्यांच्या इनाम गांवास वसुलाचा तगादा | १६४७ |
| ६६ | काळी-पांढरीची वाटणी कटापूर | १६४७ |
| ६७ | कुवर बहादुर व शाहूचे सरदार यांची चकमक | १६४९ |
| ६८ | वडगाव बुद्रुकच्या पाटिलकीचें वतनपत्र | १६५० |
| ६९ | दाभाड्यांचें इनाम व मावळांतील वतनदारांस वर्षे | १६५० |
| ७० | खानदेश-वऱ्हाडच्या फौजा व सरदार आले | १६५१ पूर्वी |
| ७१ | खंडेरावाचें देहावसान, त्र्यंबकरावास देशमुखी, सरमोकद्मी इ० | १६५१ |
| ७२ | मल्हार कोन्हेर मजमदार-तेरखेड | १६५३ |
| ७३ | यशवंतराव दाभाडे सरमोकदम | १६५३ |
| ७४ | नारो राम मंत्र्यांची दाभाड्यांच्या कमाविसदारास ताकीद | १६६० |
| ७५ | कडूसचा पाटील बाजीरावास हजर रुपये नजर देतो | १६६० |
| ७६ | यशवंतराव दाभाड्यांची मानसिंग दाभाड्यास ताकीद | १६६२ |
| ७७ | कर्नाटकच्या नबाबाचा देवस्थानांस त्रास | १६६५ |
| ७८ | कोल्हापूरच्या संभाजीस दाभाड्यांचें अगत्य | १६६६ |
| ७९ | बद्-अमलाच्या चौकशीचा दाभाड्यांच्या प्रतिष्ठेमुळें संकोच | ,, |
| ८० | कोल्हापूरच्या संभाजीचें दाभाड्यांस आश्वासन | १६६७ |
| ८१ | कोल्हापूरकर छत्रपतींविषयीं दाभाड्यांची पूर्वापार निष्ठा | ,, |
| ८२ | अंताजी माणकेश्वराचें शेटेपणाच्या हक्कासंबंधीं पत्र | १६७६ |
| ८३ | दाभाडे मोगलाईत जातात | १६८९ |
| ८४ | यशवंतराव दाभाडे खर्ड्यांच्या लढाईत हजर | १७१८ |
| ८५ | सेनापतीकडील अधिकारी-व लेखन-व्यवस्था | १७२२ |
| ८६ | त्रिंबकराव दाभाडे यांस शाहूनें दिलेली जरब | १७३१-४९ |
| ८७ | एक यादी | १७०६ |

| लेखांक | लेखविषय | शक वर्ष |
| --- | --- | --- |
| ८८ | गुजरातेतील परगणे राजश्रींनी हुजूर ठेवले | १७४० |
| ८९ | कोल्हापूरकर जिजाबाईचें उमाबाईस वतनाविषयीं आश्वासन | १७५३ पूर्वी |
| ९० | छत्रपतींची अंबिकाबाई दाभाडे हीस ताकीद | १७२६–४९ |
| ९१ | खंडेराव गायकवाडांची अंबिकाबाई विषयीं निष्ठा | |
| ९२ | दाभाड्यांच्या कोल्हापूरकडील इनामांचें संरक्षण | |
| ९३ | अहमदाबादकडील प्रांत व्यवस्था, हत्ती व काठेवाडांत स्वारी | |
| ९४ | दुसरे बाजीराव कालीन पुण्याचे अखबार क्र. १ | |
| ९५ | ” क्र. २ रमणा दक्षणा | १७२९ |
| ९६ | दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर आणि रजपूत व फिरंगी | १७१६ |
| ९७ | दौलतराव शिंदे व महिपतराम राजे व होळकर | |
| ९८ | राजे महिपतरावाचा नबाबाचे मुलखांत दंगा | |
| ९९ | दुसरे बाजीरावाची चिदंबरस्वामीस भेट | १७२९ |
| १०० | दु. बाजीराव कुरूंदवाड येथें | १७२९ |
| १०१ | दु. बाजीरावाचा कोपरगांवीं मुक्काम | १७२९ |
| १०२ | श्रीमंत चिमाजी रघुनाथ यांजकडील वार्तापत्र | १७२७ |
| १०३ | दु. बाजीराव पेशवे व गाड्या व रेंडक्याची टक्कर | |
| १०४ | पंतप्रतिनिधी सासरपाणी मात्र घेतात | |
| १०५ | श्रीमंत अप्पासाहेब व हुताशनी | १७२७ |
| | व्यक्तिस्थल–सूची | पृ. ८९–९९ |

# सेनापती दाभाडे दफ्तर

## भाग १ ला

### अपन सिसोदे नहो बरोडे दाभाडे अहो

ले. १ श्री नकल असल बमोजीब

दसखत बाो मुधाजीराव देशमुख व भोजराव भोसले मोकदम बेरोडे दाभाडे काा चाकर सरकार संगमनेर सुाा ¹सन १२० कारणे साहेबाचे बंदगीस कतबा लिहून दिधला ऐसा जे साहेबी हुजूर बोलाऊन रजा फरमाविली जे देवगिरीहून बारा कोसी धान्या बरुन्या मागाही वाट घेऊन चोरी केली ते आपण धरून देवगिरीस नेले तेही तुमचे नाव घेतले आहे की सिसोदे देसमुख मोकदम काा मार त्याचे अपण चाकर अहो बदल आपण तुम्हास धरावयास आलो तर साहेब मेहरबान अपन सिसोदे नहो बरोडे दामाडे अहो मागाही अपले नाव घेतले असेल ते तुफान ते अपले चाकर नाहीत हे साहेबाचे बंदगीस कतबा लिहिला सही निाा नागर असे चिाा अनाजी मुधाजी कुलकर्णी काा मार

तारीख १४ माहे साबान

---

### बारचालीच्या मुकामामधील मालशोध

ले. २ { श. १५९५ पौष वद्य ६
{ इ. १६७४ जाने. १६

राजश्री मोकदम मौजे मोसी ताा हवेली यासि मोकदम मौजे चिखली पाा पुणे

---

१ कागदांतील सन संशयित व कागद नकल. तथापि कागदांतील मुद्दा लक्षांत घेण्याजोगा आहे. कागदाच्या उजव्या बाजूस नुसती रेघ आडवी काढली आहे. ती पाटील वा देशमूख यांच्या सहीसाठीं असावी.

सुा [1]आर्बा लेहावया कारणे जे तर्गोनिधी गोसावी बावा तुम्ही पोहचविलें ते येथ येऊन पोहचले त्याची विशाद येणेप्रमाणे पावली

| | |
|---|---|
| ७४॥ मोहरा सुमार | नख्त रुपये |
| *४ सोनियाचे | ७६॥ |
| कडे १ | भार्डी |
| मोहरा ४ | १ चंबू |
| — | १ चरवी |
| | १ ताटया |
| | — |
| नाराल १ | ३ |

येणेप्रमाणे पोहचले असे गोसावीयांपास पुढे हाजिरा हजीर पोहचाऊन देऊन जर्माणजे छ १८ सवाल पौश वद्ये ६ हे विनंति

---

## जकात—चौऱ्याची नाईकी

ले. ३

{ श. १६०८ आषाढ शु० ७
{ इ. १६८६ जून १८

० ॥ द श्री

मसुहुरल अनाम राजमान्ये राजेश्री निगावन जकाती चउत्रे उबरे नवालासाचे यास राघो बलाल सुभेदार व कारकून नामजाद सा। जुनर माहालानिहाये विनंति सुा सबा समानी(न) अलफ हणमाजी विन सूर्याजी मोढवे नाईक चौत्रे मजकुरी याणे येउनु मालूम केले की चौत्रे मजकुरी अपली नाईकी १ चेक सालाबाद कारकीर्दी मलिकंबर पिढी दरपिढी मिरास आहे भोगवटा चालिला आहे तैनाती दरमाहे टके १० दाहा प्रमाणे मोईन आहे येणेप्रमाणे भोगवटा चालिला आहे त्यास दरम्याने गलबलियाकरिता भोगवटा तुटला आहे तरी साहेबी मेहरबान होऊन आपणास मिरासीस बैसउनु आपणास सनद करुनु सालाबाद प्रमाणे दिल्हा पाहिजे म्हणउनु हणमाजी मजकूर सुभा येउनु मालूम केले त्यावरुनु याची नाईकी यास सालाबादप्रमाणे करार करुनु याचा लेक दाऊ चाकरीस तुम्हापासी पाठविला असे तरी याजपासून तुम्ही नाईकीची चाकरी सालाबादप्रमाणे घेत जाणे अणी यास मुशाहिरा सालाबाद कारकीर्दी मलिकंबर दर माहे टके १०८ दाहा आहे

---

[1] ह्या पत्राचा कंसांत दिलेला काळ 'आर्बा सवाल १८ व पौष वद्य ६' ह्या उल्लेखावरून काढला, आर्बा म्ह. ४ हा वर्षांक दर दहा वर्षांनी आला तरी ज्या वर्षी सवाल ह्या मुसलमानी महिन्याला मराठी पौष आहे असें वर्ष पाहून व पत्रकागद, लेखन हें लक्षांत घेऊन काळ दिला आहे.

* यादींतील ४ चा आंकडा स्पष्ट असला तरी थोडा तेव्हांच गिरगटला आहे. मोहरा दोन प्रकारच्या आहेत.

तेणेप्रमाणे यास अदा करणे याज सेरीज याचा हकलाजीमा सालाबादप्रमाणे जो आहे तो याचा याचे दुमाला करणे याची ईज हुरमत राखत जाणे तालिक घेउनु असल कागद हणमाजी मजकुरापासी फिराउनु देणे छ ६ साबान याचे भिकणे निा वाणी चौत्रे मजकुरी आहे ते मागतील ते मागो देंगे *जाणिजे

---

## छत्र० राजारामाबरोबर खंडेराव कर्नाटकास आले

ले. ४

श्री { श. १६१३ चैत्र शु. १४ बुध
{ इ. १६९१ एप्रील १

( छत्रपती राजारामाची वर्तुली मुद्रा )

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १७ प्रजापतीनाम संवत्सरे चैत्र शुध्द चतुर्दसी सौम्यवासर क्षत्रिय कुलावतंस राजश्री राजाराम छत्रपती याणी खंडोजी बिन येसाजी दाभाडे पाटील मौजे तलेगाव पा चाकण प्रात जुनर यासी दिल्हे अभयेपत्र ऐसे जे तुम्ही स्वामीच्या पायासी येकनिस्टपण धरून सेवा बहुतच केली स्वामी रायगड प्रातहून कर्नाटक प्रातास आले त्या समई [1]तुम्ही बराबरी आलेत स्वामीची सेवा येक निस्टेने करीत आहा याकरिता स्वामी तुम्हावरी कृपालू होऊन मौजे मजकुरी इनाम जमीन चावर ५ पांच ×× ( दि ) ल्हे आहेत तुम्ही पत्रपौत्री पाच चावर ×× खाऊन सुखरूप राहावे ×× जमीन इनाम करून दिल्ही ×× चालेल यास जो कोण्ही खलेल ( की ह ) ×× तरी त्यास श्री—ची शपत असे स ×× ( इना ) म चालवायाचे विषी सनद निराली सादर आहे त्याप्रमाणे परंपरेने इनाम चालत जाईल जाणिजे अभय असे +निदेश समक्ष

( शिक्का: ० श्री ~ / श्री राजाराम / नरपति हर्षनिदान / मोरेश्वर सुतनील कं / ठ मुख्य प्रधान — दुवलयी लंबवर्तुली सिक्का )

( मर्या देयं विरा जते, गोल सिक्का )

( पाठीवर ) +रुजु

+सुरुसुद ××

---

* कागदावर मोर्तब वगैरे नसले तरी कागद, शाई, लिहिणें ह्यावरून तो समकालीन व विश्वास्य आहे.

\+ अक्षर वेगळें वेगळें.

१ हा निर्देश चिटणीस बखर, राजाराम–चरितम्, ह्या ग्रंथांत नाहीं. पराडेकर इतिहासांत पृ. २२ वर ( इ. १८८८ ) आहे. ह्याच देणगीबद्दलचें ह्याच मितीचें व ह्याच्या आधीं दोन दिवसांचें एक पत्र देशाधिकारी प्रांत जुन्नर ह्यांस लिहिलेलें आहे व दुसरें एक पत्र रामचंद्रपंत अमात्यांना लिहिलेलें आहे.

( पान ४ पहा )

# दाभाडे व तळेगांव–पाटिलकी

ले. ५ {श. १६१३ पौष शु. ४ / श्री / {इ. १६९१ डिसें. १३

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १८ प्रजापती नाम संवत्सरे पौष्य शुध चतुर्थी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती (या) णी समस्त राजकार्य (धुरं)-धर विश्वासनिधी (शंक) राजी पंडित सचीव × × × बिन चाजी दाभाडे पाटील मौजे तलेगाव (याणी हुजू) र येऊन विदित केले जे मौजे मजकूरची पाटिलगीची मिरास पूर्वी पासून चालत आहे आपले वडीलवडील वतन चालवीत आले आहेती त्यास आपला पूर्वज——होता त्याला दोघी स्त्रिया होत्या वडील स्त्रीचे संतान आपण व धाकटे स्त्रीचे संतान दकोजी बिन बकोजी दाभाडे आहेत ऐशास पहिलें कैलासवासी राजश्री——स्वामीचे वेलेस आपला बाप चाजी पाटील व देकोजीचा बाप बकाजी पाटील दोघांस मिरासीचा कथला होऊ लागला तो वेव्हार हुजूर राजश्री——स्वामीपासी गेला × राजश्री——स्वामीने निवाडा करउनु निमे वतन आपल्या बापास देविलें व निमे वतन देकोजीचे बापास देविले पत्रें करून दिल्ही त्याप्रमाणें कितेक दिवस वतनाचा मामला बिलाकुसूर चालिला त्याउपरी धामधुमेमध्यें निवाडियाची पत्रें होतीं तें गेलीं याकरितां मागती मिरासीचा कथला होऊं लागला आपला बाप चाजी दाभाडे वृध जाले आहेती बकाजी दाभाडे निवर्तले आतां बकाजीचा लेक देकोजी आहे तो आपणा(सी) कथला करितो वतनास खलेल होते तरी स्वामीने (कृपालू होऊन) × ×××× × × × × × × × × × × × × होये ते करून देविले पाहिजे म्हणोन × × × त्यावरून कलों आलें तरी याचा निवाडा कैलासवासी——स्वामीने करून पत्रे दिल्हीं तें बरहक मनास आणून दिल्ही ऐसें असतां देकोजी बिन बकाजी दाभाडा पाटील याणे येसाजी दाभाडे पाटील मौजे मजकूर यासिं कथला करावया व वतनास खलेल करावया गरज काये याचे निवाडियाची पत्रे होतीं ते गेलीं यानिमित्य हालीं स्वामीने पत्रें करून दिल्हीं

---

[ पान ३ वरून पुढें चालू ]

अमात्यांचें नांव पत्र फाटलें त्यांत गेलें. पण तें रामचंद्रपंतांचेंच असावें. दोनही पत्रें राज्याभिषेक शकाचीं व छत्र. राजारामांच्याच नांवें सुटलीं असून संडेरावांस लिहिलेलें पत्र ‘ अभय पत्र ’ आहे. आणि अमात्यांना लिहिलेलें पत्र ‘ आज्ञापत्र ’ आहे. दोन्ही पत्रांवरील मोर्तब एकच आहे. अमात्यांच्या पत्रावर ‘बहुत लिहिणें तर तुम्ही सुज्ञ असा ’ असा वेगळ्या हस्ताक्षराचा मोर्तबापूर्वी शेरा आहे. अभयपत्रांत संडेरावाची कामगिरी सांगितली तशी आज्ञापत्रांत नाहीं. ह्या कामगिरीचाहि निर्देश ‘ स्वामी रायगडाहून कर्नाटकप्रांतास आले ’ असा आहे ‘ गेले ’ असा नाहीं, हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे दोन्ही पत्रें चंजीच्या कचेरींतून सुटलीं आहेत हें ध्यानीं येतें.

असेतो तरी तुम्ही देकोजी बिन चकाजी दाभाडे यास ताकीद करून कैलासवासी स्वामींचे वेळेस निमे पाटिलगी येसाजी दाभाडीयास व निमे पाटिलगी देकोजी दाभाडीयास चालिली असेल त्याप्रमाणे चिलाकुसूर चालवणे येसाजी दाभाडे वडील स्त्रीकडील संतान आहे यांस पाटिलगीचें वडीलपण मानपानसंगर हे चालवणें देकोजी दाभाडे धाकटे स्त्रीकडील संतान आहे त्यांचे धाकुटपणाचे मर्यादेने चालवणे पाटिलगीचा हक लाजिमा पटीपासोडी जें कावे असेल तें निमेप्रमाणे यांचे यास व त्यांचे त्यास देवणे याउपरी त्याचे वतनास खलेल होऊं न देणें जाणिजे +बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा मर्या[1] देयं विरा जते ( शिक्का )

---

## छत्रपती–चक्रें व–फलं–वसूलपत्रक

ले. ६

{ शक १६१६ फाल्गुन शुद्ध १३
{ इ. १६९५ फेब्रु. १६

श्री ता।

( छत्र० राजारामाची सहा ओळींची वर्तुळी मुद्रा )

पत्र वासील राज मडील स्वस्ती श्री राज्याभिशेक शके २१ भाव नाम संवछरे फालगुण शुध त्रयोदसी मंदवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री—स्वामि याणि आज्ञा केली

| | | |
|---|---|---|
| श्रीराजाराम | श्रीलक्ष्मि | ऐसी जे आज तुम्ही रामजी पाटील |
| नरपति हर्षनिदान | नृहरि प्रीते | गायेकवाड मौजे भिवडी ता। |
| मोरेश्वर सुत नीळकंठ | मुद्रा निराजी | कन्हेपठार पा। पुणे मौजे मजकुरीचा |
| मुख्य प्रधान | जन्मनाः॥ राजा | व कसबे रासवडचा सीवेचा कथला |
| | राम प्रतिनिधे | होता तो निवडून मौजे मजकुरीची सीव |
| | प्रल्हादस्य विराजिते | मोजे मजकुराकडे दिल्ही यायदल |

---

१ कागदास दोन जोड असून जोडगिरीवर हीच मुद्रा दोन ठिकाणीं उठविली आहे. ही मुद्रा व श. १६१३ चैत्र शु. १४ च्या पत्रावरील असलीच 'समाप्तिमुद्रा' ह्यांत अंतर आहे. त्या मुद्रेंतील राजते-मधील रा मोडी ना आहे. आणि प्रस्तुतच्या पत्रांतील तोच रा बालबोध आहे. ह्यावरून समाप्ति–मुद्रा दोन वेगवेगळ्या असत हें निश्चित. असेंच दुसरें पत्र पण अती जीर्ण व फाटून लकतऱ्या झालेलें आहे, तें लावून वाचलें तों तें ह्याच मजकुराचें व मितीचें असल्याचें आढळलें. त्या पत्रावर निळो मोरेश्वर व प्रल्हाद निराजी ह्या प्रधान–प्रतिनिधींच्या मुद्रा प्रारंभीच्या तीन ओळीनंतर उठविलेल्या आहेत. पत्राच्या शेवटीं ' निदेश समक्ष ' असा वेगळ्या अक्षरांत शेरा असून ' मर्यादेयं विराजते ' हीच मुद्रा असून त्यांतील रा मोडी नाहीं. आणि पत्राच्या पाठीवर ' सुरुसुद बार ' हे शेरे आहेत.

पाटील मजकुराने सेरणी कबूल केली होन पा। १०० संभरी होन रास यासि जमा मंहारमेह बा- आयव्रत्र माहाल मजकूर हीा छ २१ जमादिलाखर ता। छ १ रजब दर होनास फलम छत्रपति १॥१ येकून चेकरे छत्रपति[1]

१६०

+समत +रुजू +रुजू +येकूण येकसे साठी

+मंत्री +सुमंत चो। १६०

| | |
|---|---|
| २४॥४ | छ २१ जमादिलाखर ( माघ व. ७ जाने. २७ ) |
| ५०१ | छ २९ जमादिलाखर ( फा. शु. १ फे. ४ ) |
| १३० | छ ११ रजबु ( फा. शु. १२ फे. १५ ) |
| १६० | |

(पत्राच्या मागें)

+तेरीख ११

+रजबु +सुा समस तिसेन

+बारसुद +सुरुसुद +बार +बार +बार

---

## पुत्रोत्सवार्थ दाभाडे यांस इनाम

ले. ७

शक १६१८-पौष वद्य ११
इ. १६९७ जाने. ८

० श्री ०

दामोदरा

त्मज नाराय

ण स्येषा

मुद्रा (आकार वाटोळा ओळी पांच)

अज सुा राजश्री नारो दामोदर सुभेदार व कारकून मा। जुनर ता मोकदमानी मौजे तलेगाव पा। चाकण सुा सबा तिसैन अलफ राजश्री-——

---

१ ह्या पत्रावर १४ निरनिराळ्या हस्ताक्षरांचे शेरे आले आहेत. तसेंच ह्या पत्रांतील मजकूर वाचला म्हणजे ह्या पत्राचा मायना, पत्रांतील वृत्तांत, पत्रांतील नवीन शब्द हें सर्व नवीन आहे. 'चक्रें' व 'फलं' हे नाण्यांचे उल्लेखही लक्ष्यांत घेण्याजोगे आहेत. वासील = वसुलीचा हिशेब. 'फलम' नाण्याबद्दल 'वाच्या रजतवर्ती तु लाहरी फलमः पणः ४१' असा राजव्यवहार-कोशांत प्रतिशब्द दिला आहे. ह्याविषयीं विशेष विवेचन प्रस्तावनेंत पहावें. ह्या पत्रांतील मुसलमानी तारीखेचा मराठी मितीचा आंकडा ११ आहे. पण जंत्रींत १२ आहे. ह्यावरून सायंकाळीं चंद्रदर्शनानंतर १२ हा आंकडा धरावयाचा किंवा रजबच्या मागील महिन्याचे २९ ऐवजी ३० दिवस असतील.

स्वामींचे आज्ञापत्र [1] छ १२ जिल्हेजीचे पौ जाले तेथे आज्ञा की येसजी थिन बजार्जी दाभाडे मोकदम मौजे मार याणी स्वामीस जेष्ठ बहुळ पंचमी भोमवासरी [2] पुत्रोछव जाला ते समई चंजींचे मुकामी विनति केली की मौजे मार आपला पाटीलकीचा आहे तो ईनाम देविला पाहिजे. त्यावरून मनास आणिता याणी स्वामीसे (वा) बहुत येकनिष्ठपणे केली आ(णि पुढे) ही करीतच आहेत. यांचे चालवणें अगत्य वास्तव मौजे तलेगाव नजिक इंदोरी हा गाव नूतन ईनाम देह १ येक रास कुलबाव

---

१ हेंच पत्र सनदापत्रें पृ. १७६ वर (ले. २१) आलें आहे. त्यांत वरील पुत्रजन्ममिती आली आहे. आणि मुसलमानी महिना, तारीख व सन पत्राच्या शेवटीं हाच दिला आहे. जन्मानंतर हें पत्र आषाढ शुा १३ गुरुवारीं (इ. १६९५ जुलै २) दिलें. प्रस्तुतच्या पत्राची मिती तारीख वर दिलीच आहे.

चिटणीसकृत राजाराम बखरी (काव्ये. प्र. पृ. ६५) मध्यें हें जन्मवर्ष १६९३ दिलें आहे, तें चूक आहे. 'दाभाडे सेनापती यांची हकीकत' म्हणून जें प्रकरण काव्ये. सं. आलें त्यांत पृ. २ वर टीपेंत राज-शक २३ मध्यें पुत्र झाला तो संभाजी, असें सुचविलें तेंहि बरोबर नाहीं.

२ जेधे श० त छत्र० राजारामाच्या ह्या पुत्रजन्माची आलेली नोंद वर पत्रांत आलेल्या नोंदीशी बरोबर जमते (शि० च० प्र. पृ. ३८). जे० श० त तिथी चतुर्थी आहे व वर पत्रांत पंचमी आहे. पण वार मंगळवार दोन्ही नोंदींत एकच आहे. श० त चतुर्थी मंगळवारीं घ. ४ प. ९ दिली आहे व पुत्र-जन्माचींहि घटकापळें १८।१० दिलेलीं आहेत. ह्यामुळें चतुर्थी-पंचमीचा उलगडा होऊन पुत्रजन्माचीहि नेमकी वेळ लक्षांत येते. चतुर्थी मंगळवारीं सकाळीं आठ वाजण्याचे आंतच संपते व पुढें पंचमी सुरू होते आणि रात्रीं ११ वाजतां शिवाजीचा जन्म झाला. खरे-जंत्रींत शकावलीप्रमाणेंच चतुर्थी घ. प. सह दर्शित केली आहे. पत्रांतील ह्या नोंदीनें जेधे शकावली किती अचूक आहे हें आणि जंत्रींतील गणिताची सूक्ष्मताहि कशी बरोबर आहे हें ध्यानांत घेतां येतें. सारांश, राजारामपुत्र शिवाजीचा जन्म इ. १६९६ जून ९ रात्रीं ११ वाजतां झाला. ह्या व सनदापत्रांतील पत्रांवरून पुढील गोष्टी कळून येतात. (१) 'सुभेदार व कारकून' हे मुसलमानी शब्द प्रस्तुतच्या पत्रांत आहेत व त्याचेच प्रतिशब्द देशाधिकारी व लेखक हे छत्रपतींच्या आज्ञापत्रांत आहेत. (२) सुभेदार ह्या वेळीं कोण होते तें आणि (३) सुभेदारास शिक्कामोर्तब आहे व तो कसा हें कळून येतें. (४) पाटिलकीचा गांव व इनामगांव ह्यांतील अंतर (५) येसाजी दाभाडे यांस ह्या वर्षापूर्वी तळेगांव हा नुसता पाटिलकीचा गांव आणि ह्यापुढें तोच गांव पाटिलकी बरोबर इनामीहि झाला. (६) पत्र, लेखकानें म्हणजे कारकुनानें लिहिलें, धन्यानें म्हणजे सुभेदारानें 'मोर्तब-सुद' हा शेरा केला असावा आणि 'बार' करणारा पत्रलेखकाहून वेगळा लेखक आहे.

कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी झाड झाडोरा पडिले पान सहित खेरीज हकदार इनामदार करून इनाम दिल्हा असे यांचे स्वाधीन करून यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुरक्षीत चालवणे म्हणून आज्ञा आज्ञेप्रमाणे मौजे मार कुलबाब कुलकानू हाली पटी पेस्तर पटी पडिले पानसहित खेरीज हकदार इनामदार इनाम दिल्हा आसे यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे नूतन पत्राचा प्रतिवर्षी आक्षेप न करणे तालीक लेहून घेऊन आसल परतोन देणे छ २४ जमादिलाकर मार्नंच सूद मोर्तब सूद

+बार

---

## सौ० वाल्हाई आऊस इनाम

ले. ८

शक १६१८ पौष वद्य १२
इ. १६९७ जाने. ९

श्री

[१]स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २३ धातूनाम सवत्सरे पौश्य बहुल द्वादसी मंदवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री देशाधिकारी व

निळो निमाजी रघु लेखक वर्तमान व भावी प्रांत पुणे यास आज्ञा केली
मोरेश्वर नाथ हणमंते यैसी जे सौभाग्यवती वाल्हाई आऊ हे राजश्री खंडोजी
मुख्य प्रधान प्रतिनिधी दाभाडे यांची मातुश्री यांचे चालवणे स्वामीस

अगत्य यास्तव याजवरी स्वामी कृपाळू होऊन यास नूतन इनाम मौजे धामणे सा। हवेली प्रा। मजकूर देह १ येक रास कुलबाब कुलकानू दो। हली पटी व पेस्तर पटी झाड झाडोर पडले पान सहित खेरीज हकदार व इनामदार करून गाव इनाम दिधला असे तरी गाव याचे स्वाधीन करून यास व याचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवरुशी नूतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रती लिहोन घेऊन मुख्य पत्र यास परतून देणे निदेश समक्ष मर्या

देयं विग

जते

---

१ असेंच आणखी एक पत्र केवळ 'प्रांत मावळ' मौजे उरसे ता। पौनमावळ' एवढाच बदल असलेलें ह्याच मितीचें आहे. पत्रांतील मुद्दा लक्ष्यांत घेण्याजोगा आहे. ह्या वेळीं खंडेराव दाभाडे यांचे बाप येस पाटील हे जिवंत आहेत असें 'सौ.' ह्या विशेषणावरून दिसून येतें. येस पाटील इ. १६९९ मध्यें पन्हाळा येथें मृत्यु ( पराडकर व्रति. पृ. २८ तेथें इ. १७१९ पडला आहे. )

(पाठीवर) +संमत +रुजू

+मंजूर

+सा। छ २३ रजब (माघ वद्य १० फेब्रुवारी ६)

+तेरीख +२५ माहे जमादिलाखर

+जमादिलाखर सा। मया तिसैन +बा। मुद्द +सुरु सुद +चार +संमतसुद

---

## मुसलमानाकडील वाईची पाटिलकी दाभाडे यांजकडे

ले. ९ { श. १६१९ आषाढ शु॥ ५ / इ. १६९७ जून १३ }

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २४ ईश्वर नाम संवत्सरे आषाढ शुध पंचमी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा यासि आज्ञा केली ऐसी जे राजश्री खंडोजी दाभाडे याणी स्वामीची सेवा येकनिष्टपणे केली आहे व सांप्रतहि करीत आहेती यांचे वंशपरंपरेने चालवणें स्वामीस अगत्य याकरिता कसबे वाई येथील पाटिलकी मुसलमान खान आहेती ते गनीमास मिलोन स्वामीच्या देशांत उपद्रव करितात यानिमित्य त्यांचे पाटिलकीचे वतन दूर करून हाली मारनिलेवरी कृपालु होऊन कसबे मजकूरचे पाटिलकीचे वतन अजरामऱ्हामत करून दिल्हे असे सनद देशाधिकारी याचे नांवे सादर केली आहे तरी तुम्ही कसबे मजकूरच्या पाटिलकीचे वतन याच्या स्वाधीन करून यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे *लागिजे *बहुत लिहिणे तर तुम्ही सुज्ञ असा मर्यादेयं विराजते

(पाठीवर) बार बार

---

\+ निरनिराळीं हीं चार हस्ताक्षरें आहेत.

* अक्षरें वेगवेगळीं. श. १६१३ पौष शु. ४ चे पत्रांतील (ले. ५) व या पत्रांतील हीं दोन्हीं लिहिणीं सारखींच आहेत.

# राज–देशमुखी व सरदेशकुलकर्ण

ले. १८ श्री {श. १६२० आश्विन वद्य १२ / इ. १६९८ आक्टो. २०}

( छत्रपती राजारामाचा शिक्का – वाटोळा )

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक २५ बहुधान्य संवत्सरे आश्विन बहुल द्वादशी गुरुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणी खंडोजी चिन येसाजी दाभाडे यांसि

( निळो मोरेश्वर मुख्यप्रधान यांची मुद्रा )

दिल्हे वृत्तीपत्र येसे जे तुम्हीं स्वामीच्या पायांशीं येकनिस्टा धरून बहुत दिवस सेवा केली आहे स्वामी कर्नाटक प्रांते असता शेवा करित होतेस यावरी स्वामी कर्नाटकातून देशास आले ते प्रसंगी तुम्हीं स्वामीच्या पायाशिं येकनिस्टा धरून समागमे येऊन शेवा करित आहां यास्तव तुमचे उतरोतर चालवणें हें स्वामीस अगत्य याकरितां प्रांत वीडदेश येथील राजदेशमुखीचे वतन राजश्री रामचंद्र प्रल्हाद यांस व सरदेशकुलकर्णांचे वतन राजश्री शामजी नाईक पुंडे यांसि दिल्हें होतें तीं वतनें पेशजी दूर केली[1] आहेत येसियास वतनाचा मामला दूर करितां येत नाहीं यास्तव तुम्हावेरी स्वामी कृपाळू होऊन नूतन दोनही वतने अजरामऱ्हामत करून दिल्हीं असे या वतनास हक रयेतनिसबतीने दरसदे राजदेशमुखीस चौरोत्रा व सरदेशकुलकर्ण दुहोत्रा याप्रमाणे पेशजी चालत होता त्याप्रमाणे तुम्हास उतरोतर चालवावयाची आज्ञा करून आला. हिंदा प्रांत मजकुरीच्या देशाधिकारीयास सनद सादर केली असे त्याप्रमाणें ते तुमचे दुमाला करून चालवितील तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनुभवुन सुखरूप राहाणें सदरहू वतनास हक × मुलकी व जकाती देखील मोईन करून दिल्ही असे याप्रमाणे चालेल सदरहू वतन तुम्हास दिल्हे आहे या वतनास हिंदु होऊन जो कोण्ही खलेल करील त्यास श्री वाराणसी × × ब्रह्महत्येचे पातक मुसलमान होऊन खले × × महजब्याचा शपथ × × ( अपूर्ण )

( पाठीमागे ) +तेरीख २५ +रबिलाखर सुा तिसा तिसैन

+चार +सुरु सुद +बार

---

+ पांच हि अक्षरें निरनिराळीं. १ 'करून' होतें त्याचें 'केली' केलें आहे. हें पत्र इकडे महाराष्ट्रांत आल्यावर लिहिलेलें आहे. ह्या पत्रावर प्रधानांच्या शेजारी प्रतिनिधींची मुद्रा श. १६१३ चैत्र शु. १४ च्या पत्राप्रमाणें नाहीं. ह्या पत्राच्या आदल्याच दिवशींचें पत्र चै. व. ८ अं. ३ पृ. १२३ वर आलें आहे. त्यांत खंडेरावांना ३६ तर्फांतील मिळून १३९५ गांवांचें सर–पाटिलकीचें वतन दिलें आहे. त्या पत्रावर छत्रपती व प्रधान अशा दोघांच्या 'सीमामुद्रा' आल्या आहेत हें विशेष लक्ष्य आहे.

## प्रांत जुन्नरची सर-पाटिलकी

ले. ११

{ श. १६२३ आषाढ वद्य २
{ इ १७०१ जुलै १०

श्री शंकर

राजश्री दामाजी नारायण नामजाद व कारकून व वर्तमान भावी मा। जुनर गोसावी यांस—

द अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य———सेवक बहिरो मोरेश्वर प्रधान नमस्कार सुा। ईसने मया अलफ मा। खडोजी बिन येसजी दाभाडे येही हुजूर विदित केले की आपणास राजश्री———छत्रपति कैलासवासी स्वामींनी कृपालु होऊन प्रांत मजकुरी सर पाटिलकीचें वतन आजरामऱ्हामत करून दिधले आहे त्यास हकलाजिमा प्रांत मजकुरी देशमुखास आहे त्याचेनिमित्तमाणे देविला आहे तेणे प्रमाणे चालत आहे स्वामींनी कृपालु होऊन भोगवटीयास आपले पत्र देऊन चालविले पाहिजे म्हणून विदित केले येसियास मानुलेनी आपल्या राज्यात बहुतच यकानिष्टेने सेवा केली याबद्दल सदरहू वतन सरपाटिलकी अजरामऱ्हामत करून दिधली आहे तेणे प्रमाणें दुमाले केली असे सदरहू वतन याउ व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने राजश्रीचे आज्ञापत्राप्रा। चालवीत जाणे हाकलाजिमा सदरहू प्रमाणे चालवीत जाणे या पत्राची नाकील लेहून घेऊन असल पत्र परतून दीजे छ १४ सफर +आज्ञाप्रमाण लेखन

~ श्री ० मोर्तब सुद
शिवनरपति हर्षनिदान मो रेश्वर सुत भै रव मुख्य प्रधान[1] ( आकार त्रिवलयी लंबवर्तुळ ओळी सहा )

+चार +सुरु सुद +चार

---

+ही अक्षरें निरनिराळीं आहेत. १ ही मुद्रा कागदाच्या पाठीमागें जी एक ओळ आली आहे त्या ओळीच्या समासांत डावीकडे उठविलेली आहे. मुद्रेच्या ह्या स्थानावरून प्रधान बहिरो मोरेश्वरांना दामाजी नारायण हा आपल्या बरोबरीचा अधिकारी असल्याचें दर्शित करावयाचें आहे. शिक्यांतील सर्व म्हणजे चारहि र मोडी काढलेले आहेत. पुढील ले. १२ च्या पत्रावरील आज्ञाप्रमाणा–प्रमाणेंच ह्या आज्ञा-प्रमाणाचें अक्षर आहे; कागद, शाई, लेखन व लिहिण्याची पद्धतिहि तशीच आहे.

## निवारसी देशमुखी वतन दाभाड्यांना

ले. १२ { शक १६२३ आश्विन शु.१४ 
श्री { इ. १७०१ आक्टो. ४ रवि

छ मशरुल अनाम खंडोजी बिन येसाजी दाभाडे अदिकारी ता तुगारतन प्रा कल्याण यासि चाहिंा मोरेस्वर प्रधान सुहुर सन इसने मया व अलफ तुम्ही हुजूर येऊन विदित केले की तर्फ तुगारतन सुभा कल्याण येथील वतन

~श्री० अधिकारीपण अज देह ३२ बतीस पैकी वजा बापजी
श्रीशिवनरपति खोरकर याचे वतन देह ८ आठ बाकी देह २४ चौवीस यास
हर्ष निधान येसजी अधिकारी बसवतराऊ-- होता तो कालगतीने मृत्य पावला
मोरेश्वर सुत त्याचे संतान कोण्ही खासा नाही येसियास ते वतन स्वामीने
भैरव मुख्य आपणास आजरामऱ्हामत वतन दिले या वतनावरी राहोन माहालीची
[३]प्रधान आबादानी करून म्हणुन विनती केली यावरून तुम्ही आपल्या

राजाचात बहुतच कस्ट मशागत केली आहे पुढेहि करावी हे उमेद धरिता तुमचे चालवणे × × × × ता मजकुरीचे अधिकारीपण वतन नूतन आजरामऱ्हामत करून दिले असे गाऊ वि ता———————— मौजे [१]कासपे, गुलसई, उराडे, योवजी, आचोली, वसोई, चारवली, शात, गाताडे, केर, जाबली, वागसेद (५१), देहु(बु)लोली, बामणोली, कडोली, कर्डेबुा, कर्डेखुर्द, चादव ी, चोलिवली, रीस, कावे, देहूखुर्द, सावले, पटखोर, असोलीखुा एकून चोवीस[२] गाऊ हे वतन तुम्हांस देशमुखीचे करार करून दिले असे हकलाजिमा सालाबाद चालिला असेल त्याप्रमाणे करार करून दिल्हा असे आणि तुम्हापासून दिवाणात हर्की रुपये १००० येक हजार घेतले असेती तुम्ही कोणे बाबे शक न धरिती बिला कुसूर देसमुखीचे वतन अणभऊन सुखे राहाणे छ १२ जमादिलोवल +आस्विन सुद चतुरदसी वृश मवकर सुद +आज्ञाप्रमाण (लेखन सीमासमुद्र सति) गोल सिक्का

(पाठीवर) +मुरु +सुद +चार

---

१ येथें मूळचें एक ग्रामनाम होतें. त्यावरच हें काढलें आहे.

+ निराळीं अक्षरें भिन्नभिन्न.

२ हीं गांवें २५ आहेत. प्रत्येक गांवामागें 'मौजे' असें म्हटलेलें आहे तें आणि ग्रामनामाखालीं १ हा अंक-। आहे तो, येथें गाळला आहे. गांवें २५ असून २४ च गृहीत धरावयाचीं; कारण तीच संख्या अक्षरी सांगितली आहे. आणि पंचविसावें नांव, त्या नांवाखालील एकाचा आंकडा खोडून त्याचें शून्य करून तें, रद्द केलें आहे.

३ प्रधान बहिरो मोरेश्वराची मुद्रा कागदावर डावीकडील समासांत ओळीबाहेर प्रारंभीच दोन ओळीनंतर उमटविली आहे. ह्या सनदेचा कागद एक फूट रुंद आहे.

# परगणे कोल्हापूरची देशमुखी व वीड इनाम

ले. १३

श्री { श. १६२४ कार्तीक शु. २
{ इ. १७०२ आक्टो. ११ रविवार

( राजारामपुत्र शिवाजी छत्रपतीची [1]मुद्रा—अष्टकोनी सहा ओळींची )

[2]स्वस्ति श्रीराज्याभिषक शके २९ चित्रभानु संवत्सरे कार्तिक शुध द्वितीया रविवासर क्षत्रियकुळावतंस श्रीराजा शिवछत्रपती यांणी राजश्री खंडेराऊ दाभाडे

| | | |
|---|---|---|
| श्री शि | श्री आई आ | देशमुख पा। कोल्हापूर यासि |
| व नरपति | दिपुरुष राजा | दिल्हें वतनपत्र ऐसें जे तुम्ही |
| हर्षनिधान मो | शिवछत्रपती स्वामि | राज्यांतील कदीम सेवक |
| रेश्वर सुत नीळ | कृपानिधि तस्य प | कैलासवासी स्वामीचे वेळेस |
| कंठ प्रधान | रघुराम त्र्यंबक | निष्ठेने सेवा केली याकरितां |
| | प्रतिनिधि | तुम्हावरी कृपाळू होऊन त्याणी |

पा। मारचे देशमुखीचें वतन अजरामऱ्हामत करून दिल्हें आहे व त्या वतनास मौजे वीड पा। मार हा गांव इनाम दिल्हा आहे तेणेप्रमाणे स्वामीने चालवावयाची आज्ञा करून देशाधिकारियाचे नावें आज्ञापत्र सादर केले आहे तरी तुम्ही हें वतन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन वतनाची सेवा निष्ठेने करून सुखरूप असणे तुम्हांस हक इनामतीची मोईन पेशजी कैलासवासी स्वामीने करून देऊन सनद सादर केली आहे तेणेप्रमाणे चालेल +जाणिजे +निदेश समक्ष ‿मर्यादेयंविराजते॰

( पत्राच्या पाठीमागे )

१ ( ॰ श्री ‿। प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्वि । श्ववंदिता रामसू । नोः शिवस्यैषा मुद्रा। भद्राय राजते )

+रुजू सुरु
निवीस +बार +सुरुसुद +बार

---

+सहाहि अक्षरें भिन्न. १ प्रधान–प्रतिनिधींच्या मुद्रा कोयरी व अष्टकोनी आहेत.

२ ह्या सनदेप्रमाणें देशाधिकारी प्रांत कोल्हापूर यांस लिहिलेलें मोगवटा पत्र ह्याच्या आदल्या मितीचें आहे तें ह्याच देणगीसंबंधीं असलेमुळें स्वतंत्रपणें येथें घेतलें नाही. त्या पत्रांतील विशेष म्हणजे त्यावर छत्रपतींची मुद्रा नाहीं. प्रधान प्रतिनिधींच्या मुद्रा आहेत; मजकुरांत 'स्वामीस संतोषी केलें, पा। कोल्हापूर महालची दे॰खी, वतनाचे कमाविसीस मारनिलेनी मुतालीक ठेविला आहे त्याचे हाते दंडकप्रमाणें वतनाची सेवा घेत जाणे' असा असून 'जाणिजे' 'निदेशसमक्ष' हें लिहिणारे अधिकारी एकच आहे व 'रुजु' आणि बार करणारे अधिकारीहि एकच आहेत. दोन्ही पत्रावरील 'मर्यादामुद्रा' लहान व एकच आहे.

## सेनाबारासहस्री केदारजी बोत्रे

ले. १४ { श. १६२५ चैत्र वद्य ९.
श्री { इ. १७०३ मार्च ३०

राजश्री चिमणाजी भा(नजी) व वेंकाजी भानजी
नाईक गोसावी यासी

द् अखंडित लक्षेमी अलकृत राजमान——श्रेहाकिन केदारजी बोत्रे सेना बारा सहश्री रामराम सुहुर सन सलास मया अलफ साल गुदस्ता राजश्री——पंत प्रधान याणी रा। गदाधरभट यासी कार्यभागा करिता हुजुर रवाना केले ते समई तुम्हास पत्र लेहून पाठविले की भट गोसावी हुजुर कार्यभागाकरिता पाठविले आहेती हुजूर टका-पैका द्यावया याहि(जे) त्यास तुम्हा जवल येवज कर्ज मागतील ते समई यांसी आपणा-कडोन कर्ज देवणे तो येवज तुम्हास आम्ही येथे देऊन त्यावरून गदाधरभटांनी तुम्हापासून कर्ज गुजारतां चिमणाजी नाईक मुकाम प्रतापगड रुपये ११०० आकरासे रुपये घेऊन हुजुर राजश्री —स्वामीकडे पा(ठ)विले तो येवज तुम्ही मागावया राजश्री प्रधानपंताकडे आले तेव्हा राजश्री—पंती जीवधणीचे येवज पैकी आकारासे रुपये सदरहू कर्जाबाबत दिल्हे ते चिमणाजी नाईक याणी घेतले हे वर्तमान हुजूर कोण्ही विदित केले त्यावरून तुम्हावरी अकरासे रुपयाचा रोखा करून वसुलास होऊजी चवाण आला त्याउपरी हे वर्तमान आम्ही मनास आणिता राजश्री——पंती तुम्हा पासून कर्ज घेविले पंतीच तुम्हास कर्जाचा येवज पा(ठ)विला यावेगले तुम्हाकडे काही सिलकेचा येवज राहिला नाही हुजुर कोण्ही काये सागितले असेल ते लटिके तुम्ही येविसी चिंता न करणे तुम्हास सदरहू आकरासे रुपयाचे त्वस्ट लागो देणार नाही कदाचित हुजरून तुम्हाकड त्वस्ट आले तरी आपण वारून जाणिजे छ २२ जिलकाद[+] हे विनंति
( अस्पष्ट गोल सिक्का ) हे विनंती

१ अस्पष्ट मराठी ( मोर्तब सुद असावे.) (श्री ' श्रीराजासित नरपती चरणी० ' ) ?

---

## मानहि तरफांची महारांना माफी

ले. १५ { श. १६२५
{ इ. १७०३

राजमान्य राजश्री मोकदमानी देहाये तर्फ पिंपल गाऊ × × × निघोज व × ~ (ता।) कान्हूर व तरफ वाखुंदे व तरफ धंडी व तरफ सातगाऊ व तरफ केडगाऊ पा। पारनेर सु॥ सन हजार १११३ प्रती गोमतीबाई व द्वारकाई व कृस्णाजी व त्रियक

(हरि) देशपांडिये सरकार जुनर व परगणे मजकूर क्षेम अनुक्रमें रामराम विनंती उपरी विनवाया कारणे यैसे जे राणा व धा (का) महार कसबे पारनेर व साता नरकाचे माहार येऊन माफीचा परवाना हजूरचा घेतला आहे त्या बमोजीब परगणे मज(कूर) अमल जाला असेल तरी वेहतर आहे परयानियाद बमोजीब तुम्ही हि माफ *करणे बरादिगार फिर्यादी हजूर येऊ न देणे हजूर तकरार फिर्यादी आलिया तुम्हास तलब गुरु बारदार व अहदी व न व ४ माहार घेऊन येतील यैसे न करणे माफीक परवाना (तुम्ही) हि माफ करणे दरी बाब ताकीद जाणिजे मोर्तबु (फा. मो.) (प्रारंभीं हि दोन फारसी शिक्के ह्याच्या समासांत आहेत.¹)

---

## खंडेराव व कृष्णाजी दाभाडे यांस पाटिलक्या

ले. १६

श. १६२८ पौष वद्य २
इ. १७०७ जाने. ९

श्री

नकल

सिका

अभयेपत्र समस्त राजकार्यधुरधर विश्वास निध्धी राजमान्य रा॥ शंकराजी पंडित सचीव ता॥ खडेराव बिन येसाजी दाभाडे व कृष्णाजी बिन सोमाजी दाभाडे मोकदमयाणी देहाये ता॥ पौडखोर मा॥ मावले सु॥ सबा मया व अलफ दिल्हे अभये-पत्र येसी जे तुम्ही खानवडी ता॥ कन्हेपठार प्रा॥ पुणे येथील मुकामी विनंति केली की आर्जोजीराव ढमाले देशमुख व देशकुळकर्णी ता॥ मा॥र याणी आपणास खुश खरीदीने गावगनाच्या पाटिलक्या दिल्या आहेत बी॥ ता॥

| खडेराव दाभाडे याकडे | कृष्णाजी दाभाडे याकडे |
|---|---|
| ॥। का॥ पौड येथील निमे मोकदमी | पाटीलक्या देह |
| | १ मौजे येलबेली |
| १ मौजे मोदडे येथील सारी मोकदमी | १ मौजे नींवखडे |
| लग | १ मौजे वडवाथर |
| १॥। | ३ |

* येथें ओळीवर मध्येंच तेव्हांच दोनतीन अक्षरांचा शब्द लिहिला आहे, पण तो नीट लागत नाहीं. १ असेंच दुसरें पत्र कसबे पारनेरच्या मोकदम–शेटे–महाजनांना लिहिलें असून त्यांत 'हडोळ्यासाठीं टके माफ केले आहेत' असा विशेष मजकूर आहे.

येणे प्रा साडे चऊ गावांच्या मोकदमीया देऊन त्याणे महजर करून दिल्हे अहे तो मनास अणून त्याप्रा स्वामीनी आपले पत्र करून देऊन वृत्तीसमध्यी सेरणी करार केली पाहिजे म्हणून * विनंति केली त्यावरून अजोजीराव ढमाले देशमुख ता। मा यासी अणून करीना पुसून महजर करून दिल्हे होते तो मनास अणून सदरहू गावांच्या मोकदमीया तुमचे हुमाला केल्या असे तर तुम्ही व तुमच्या पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने मुकदमीचे वतन अणभऊन सुखरूप राहणे वृती समधे तुमचे माथा सेरणी रुपये ५०० पाचसे रुो करार करून सदरहूचा वसूल हुजूर पोता बा स्वारी घेतला असे या उपरी सेरणीचा तगादा तुम्हास लागणार नाही अभये असे छ १५ लवाज परवानगी हुजूर मोर्तब

बार सुध बार

---

## शाहू छत्रपतींकडून खंडेरावांस सर–मोकदमी

ले. १७

श्री

{ श. १६३० चैत्र शुा ७ बुध
{ इ. १७०८ मार्च १०

स्वस्ति श्रीराज्याभिशेक सके ३४ सर्वधारी नामसंवछरे चैत्र सुध सप्तमी सौम्यवासरे

श्री ० शाहूनर पतिहर्ष नि धानमेरिश्वर सुत भैरव प्रधान

क्षत्रियेकुलावतस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी सुभेदारानी व कारकुनानी वर्तमान व भावी सरकार जुनर व माहोर्ये यासि आज्ञा केली येसी जे सरकार मजकूरचे सरमोकदमीचे वतन राजश्री कैलासवासी——याणी राजश्री खंडेराऊ दाभाडे यासि अजरामऱ्हामत करून दिल्हे देखील जकाती करून दिल्हे होते त्याप्रमाणे हाली स्वामी कृपाळू होऊन सरमोकदमीचे वतन करार करून दिल्हे असे तरी तुम्ही हे जाणऊन याचे सर मोकदमीचे वतनाचा अमल मुरलीत चालो देणे+ निदेशसमक्ष मर्या देयं रा जने (बहुकोनी)

( पाठीवर ) सुरु+ सुद्ध+

---

* येथपासूनचा मजकूर पत्राचे पाठीमागे लिहिलेला आहे.

+ तीनही अक्षरें भिन्नभिन्न.

## पुरंदर तनख्याकडील गांव दाभाड्यांकडे

ले. १८ {श. १६३१ पौष शु. २ गुरु
श्री {इ. १७०९ डि. २२

स्वस्ति श्रीराजाभिषेक शके ३६ विरोधी सवछर पौष्य शुध (द्वि)तीया *गुरुवासर क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू × × × × × चाकरा प्रात जुनर यासि आज्ञा × × (पे)
(पेशवे (¹प्रतिनिधी सजी राजश्री खंडेराऊ दाभाडे यासि इनाम होना ×
शिक्का) शिक्का) × × पुरंदरच्या तनखियास मुकासा दिल्हा होता हली किलेमाराकडून दूर करून मशारइलेस इनाम दिल्हा असे × × × यासि रुजू होउनु मौजे मारचा उसूल खेरीज हकदार व इनामदार माइलेकडे देणे +लेखनालंकार
(मर्या देयंरा जते)
(पाठीवर) +बार +सुद +सुरु +सुद +बार
+रुजू

---

## नाणे—व पौन—मावळची सरमोकदमी खंडेरावांकडे

ले. १९ {श. १६३१ माघ वद्य ९
श्रीशंकर {इ. १७१० फेब्रु. ११

राजाराम

द मा। अनाम देशमुख व देशपांडे ता। नाने मावल यांसि बहिरो मोरेश्वर प्रधान
~श्री ० सुहूर सन आसर मया अलफ राजश्री खंडेराऊ दाभाडे यांस सर-
शिवनरपति हर्ष मोकदमी राजश्री—छत्रपती स्वामीनी अजरामऱ्हामत करून सनदा
नीधान मोरेश्वर दिधल्या आहेती त्याप्रमाणे दतन दुमाले कराविले आहे बा। सनद
सुत भैरव मुख्य राजश्री—स्वामी पौष्य² सुध प्रतिपदा भौमवार सरकार जुनर व
+ प्रधान + महालहाये पैसे वतन पूर्वी कैलासवासी—यानी दिल्हे त्याप्रा हाली राजश्री शाहूराज छत्रपती स्वामीनी करार करून सनदा सादर केल्या आहेत तुमचा मा-(हाल) सरकार जुनरखाले वोढत आहे त्याप्रमाणे तुमच्या माहालीची सरमोकदमी वतन

---

* द्वितियेची वृद्धि आहे.

१ 'श्रीशंकर श्री। शाहूछत्रपती। कृपानिधी प्रल्हाद' एवढी अक्षरें तीन ओळींतील आणि पांचवी ओळ प्रतिनिधी एवढें स्पष्ट दिसत आहे. ४ थी ओळ व पेशव्यांचा कोयरी शिक्का फाटण्यांत गेला आहे. प्रतिनिधी मुद्रा अष्टकोनी त्रिवलयी आहे. + अक्षर वेगवेगळें. २ 'विरोधीसंवत्सर' श. १६३१ = इ. १७०९ डिसें. २०

करून दिल्ही असे तरी तुम्ही म(शार)निलेच्या स्वाधीन सरमो(कद्मी) ××× केचे प्रा करणे × × सरदेशमुखीचे निमे प्र (माणे) ×× येसा तह केला असे त्याप्रा हक × आणि वौशपरंपरेने वतन मशारनिलेच्या हवाले करणे ताजे सनदेचा उजूर न करणे प्रती लेहोन घेऊन असल सनद भोगवटियास देणे प्रति वर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे जाणिजे छ २२ जिल्हेज लेखन

+जाणिजे +आज्ञाप्रमाण सीमासमु

+सुरु सुद लसनि

---

## पानसरे, जकातदार, पथकदार यांस दाभाड्यांबद्दल पत्र

ले. २०

( श. १६३१ माघ वद्य १२
( इ. १७१० फेब्रु. १४

+ ˘ श्री ० + श्री

शिवनरपति ह छ मा। अनाम राजश्री कमावीसदार निगावन व निसिदे पथकी
र्ष नीधान मोरेश्वर व पानसरे जकाती माहालानीहाय व घाटानिहाये घाट कुरोंडा
सुत भैरव मुख्य व नाणा वगैरे सरकार जुनर व माहाय यासी बहिरो मोरेश्वर
+ प्रधान + प्रधान सुहूर सन आशर मया आलफ राजश्री खंडेराऊ दाभाडे

यासी राजश्री——छत्रपती स्वामींनी कृपालू होऊन सरकार जुनर माहावे येथील सरमोकद्मीचे वतन अजऱ्हा मऱ्हामत करून दिले असे ताज्या सनदा हुजूरून आल्या आहेत. बरहुकूम सनद राजश्री——स्वामी [1]पौष्य शुध प्रतिपदा भोमवार विरोधी संवत्सरे ××× दुमाले करविले असे (हर कोनाम सनद!) ××× न जकाती

+ तीन अक्षरें वेगवेगळीं.

१ असें दुसरें पत्र भैरव मोरेश्वरांचेंच पण पौन मावळच्या दे०ख–दे०डे यांस लिहिलेलें तीन दिवसानंतरचें म्हणजे माघ वद्य १२ = फेब्रुवारी १४ चें आहे. कारकून वेगळा आहे. प्रधानांची 'सीमामुद्रा' व 'मुख्य मुद्रा' सारखीच आहे. नाणे मावळाचा हवालदार ह्या वेळीं 'रामाजी माहाजी' हा आहे. त्यासही ह्याच मितीचें व प्रधान बहिरोपंतांचें पत्र ह्याच अर्थाचे आहे; त्यांतील कांहीं ओळी लक्ष्य आहेत त्या अशा 'अलाहिदा राजपत्रें दिल्हीं असत' 'त्या वतनाची कमाविस करतील. गडकरी याची शेते व हशम लोक व चाकरमाने यांची शेते खासा शेत सनदा आहेत त्यास सरदेशमुखी व सावोत्रा व सरमोकद्मी ह्याच्या नांवे बा मुा (बहुल मुशाहिरा) खर्च लिहिणें निवळ रयेतीचा सरमोकद्मीचा हक देवणे.'

मजकुरी हक घरटका × × × × ३ तीन द्यावयाची आज्ञा केली असे रयेत निसबतीने हक पावत जाणे हे वतन यासी वौशपरंपरेने चालवात जाणे ताजे सनदेचा उजूर न करणे या पत्राची प्रती लेहोन घेऊन असल पत्र भोगवटीयासी परतोन देणे नूतन पत्राची प्रतिवरसी प्रतीक्षा न करणे +छ २५ जिल्हेज +आज्ञा प्रमाण

( लेखन सीमा समुल्लसति ) ( वाटोळा त्रिवलयी शिक्का )

+सुरुसूद

---

## पौन मावळच्या हवालदारांस पत्र

ले. २१

(श्री) { श १६३१ माघ वद्य १२ / इ. १७१० फेब्रु. १५

१राजमान्य राजश्री भास्कर रंगो हवालदार व कारकून ता पौनमावल यासि बहिरो मोरेस्वर प्रधान सुहुर(सन) असर मया अलफ राजश्री खडेराऊ दाभाडे याजवरी राजश्री —छत्रपती स्वामी कृपालु होऊन सर मोकदमी वतन अजरामर करून सनदा सादर केले पौश शुध प्रतिपदा विरोधीनाम छवछरे पूर्वी राजश्री कैलासवासी स्वामीने वतन क × × × × × दिल्हे त्याप्रमाणे हाली करार करून ( सनद ) सादर केले आहे तरी × × × × × × × × × निम करून दिली असे तरी × करी व हशम लोकाची कोई × करून याचा हक लाजीमा स × × प्रमाणे कुलीनपणे देत जाणे वतन यास व त्याचे वौशपरंपरेने चालवीत जाणे प्रतिवर्सी नूतन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची नाखीक घेऊन हे पत्र मारनुलेचे कारभारी याजवली देणे छ २५ *जिल्हेज *आज्ञाप्रमाण लेखन सीमा समुल्लसति ( वाटोळा शिक्का )

*सुरुसुद

---

+ ले. १९ टीपेसह, ले. २०, ले. २१ टीपेसह ही पत्रें सामान्यत: एकच आहेत. १ ह्याच मिती–मजकुराचें पत्र ह्याच प्रधानाचें आहे. फक्त फरक 'वर घाट सावला व चौ उपरे' आणि 'सनदा तमाम चालिल्या आहेत' '× × मुर्सीचे निमेप्रमाणें' असा आहे. हेंहि पत्र फाटकेंच आहे. ह्या पत्रावर प्रधानांची मुद्रा प्रारंभीची ओळ सोडून डाव्या बाजूस थोडासा समास व ओळीस जागा सोडली आहे तेथे उठविली आहे. त्यावरून वरिष्ठाचें कनिष्ठास पत्र असल्याचें समजून येतें. मुद्रेंतील चौकुल्या, 'मुख्य' शब्द लक्ष्य आहे.

* अक्षरें वेगळालीं. २ ही सीमामुद्रा प्रधान बहिरो मोरेश्वर यांची आहे. ३ ह्या पत्रावरून पौनमावळचा हवालदार कळून येतो व सरपाटिलकींतील एक काम व दाभाडे यांजकडे कारभारी अधिकृत असत हें समजून येतें.

# कोल्हापूर हवेलीची देशमुखी

लें. २२　　　　　　　　　　　　　　　　　　{ श. १६३६ पौष शुद्ध ९
　　　　　　　　　　　　　श्री　　　　　{ इ. १७१५ जाने. २ रवि.

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४१ जयेनामसंवत्सरे पौष्य शुद्ध नवमी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी याणी मुकदमानी देहाये ता। हवेली

| | | |
|---|---|---|
| श्री शि | ^ श्री ० | कोल्हापूर यांसि आज्ञा |
| व नरपति | आई आदि पुरुष | केली येसी जे राजश्री |
| हर्षनिदान मो | श्री राजा शिवछत्रपाति | खंडेराव दाभाडे हे स्वामी- |
| रेश्वर सुत नील | स्वामीकृपानिधीत | च्या राज्यातील पुरातन |
| कंठ प्रधान | स्य परशरामत्र्यंब | सेवक तीर्थस्वरूप राजश्री |
| ( कोयरी ) | क प्रतिनिधी | ——कैलासवासी स्वा- |

मींची सेवा निस्टेने केली या करितां ता। हवेली मजकूरचे देशमुखीचे वतन यांस अजराम(राम)त केरून दिल्हे आहे त्या प्रमाणें चालवणें स्वामीसहि अगत्य आहे येशास हाली देशमुखीच्या मामलयावरी रा। बाजी दाभाडे यांस ठेविले आहेत हे दंडकप्रमाणें वतनाचा धंदा चालवितील तरी तुम्ही ता। मजकूरचे देशमुखीचे वतन रा। खंडेराव दाभाडे यांस सुरलीत चालवणें व या वतनास हकलाजिमा इनामत बाजे बाब पेसजी हुजरून मोईन करून दिल्याप्रमाणें ता। मजकुरी गांवगना चालऊन बाजी दाभाडे यांकडे वसूल देत जाणें खलेल कांहीं न करणें +लेखनालंकार ( मर्यादेयं विराजते )

+रुज

+सुरु +तुद्‌चार[१]

---

+चारहि अक्षरें भिन्नभिन्न. १ कोल्हापूरकर संभाजी छत्रपतीची 'मर्यादा मुद्रा' थोडी वेगळी आहे.

१ ह्याप्रमाणें 'पा। कोल्हापूर' असें लिहलेलें आणि शाहूछत्रपतींनीं पाठविलेलें 'अभयपत्र' श. १६३९ माघ वद्य ९ (१७१८ फेब्रु. १२) चें आहे. तें स्वतंत्र घेतलें नाहीं. त्यावर 'शिव' असा उलेख केलेली शाहूची अष्टकोनी मुद्रा प्रारंभी माथ्यावर आणि बाळाजी विश्वनाथ व श्रीनिवास परशराम यांची कोयरी व वर्तुली मुद्रा मध्यें उठविलेली आहे. मर्यादामुद्रा 'मर्या देयं राजते' अशा तीन ओळींची षट्कोनी आहे. अर्थात् कोल्हापूरकर संभाजी व सातारकर शाहू ह्या छत्रपतींच्या 'समाप्तिमुद्रा' वेगळ्या आहेत हे व त्या कशा तें समजून येतें. विशेषतः त्या अभय पत्रांतील 'पा। मार (कोल्हापूर) चें दे०खीचें वतन आपले स्वामींनीहि' दिल्हे आहे असें खंडेरावाचें म्हणणें दिलें आहे तें लक्ष्य आहे.

# तुकोबा शिष्य गंगाजीबावा मवाळ महाजन

ले. २३ { श. १६३८ / इ. १७१६

श्री

करिणा आपले आजे भानजी नाईक नाना त्यास पुसिले की आपली आऊदची माहाजनकी कैसी आहे त्यास त्याणी सागितले की काळभोर याची देसमुखी तेथे होती व आपली महाजनकीचा वाडा तेथे आहे तेव्हां काळभोर याजवर कसाला जाला ते तेथून निघाले ते वेळेस आपले वडील सिदावा नाईक याजला सागितले की तुम्ही तेथे राहू नका तेव्हा सिदावा नाईक तेथून तळेगावास आले दाभाडे भेगडे याची भेट घेतली यावर त्यास बोलिले की कालभोरावर कसाला जाला तेव्हा ते आवदाहून निघाले आणि आम्हास सागितले की येथे राहू नका त्यावरून आम्ही तुम्हाकडे आलो आहो आमचा आगीकार कराल तर आणी × × × × वाडा राहावयासी याल तर आम्ही × × × त्यास ते उभयता दाभाडे व भेगडे व का×(लयुकसंव)छरी मिळोन आम्हास निवारसी जागा दिल्ही यावर मुलेमाणसे घेऊन येथे आलो घर बाधले यावर कितेक दिवस नादलो त्याजवर हा गाव चाकणेच्या मोगलाची लेक बेगम होती तिला जाहागीर होता ते वेळस गावावर बाकी रुो १०० राहिली त्याकरिता पाटील कुलकर्णी व आपले वडील धरून नेले त्यास बाकीस जागा नाही पाटील कुळकर्णी व वडील यासी जाजती केली मग देशमुख देशपाडे मध्यवर्ती पडून आमच्या वडिलानी रुो नउसे देऊन आवघे सुटून आले त्याजवर रुपयासी जागा नाही तेव्हा कागदपत्र करून दिल्हा व आपलीयास सेत बल-मणटीक वाहून खावेयासी दिल्हे त्याजवर सिदाचा नाईक काही दिवसी शात जाले त्यास पुत्र गगाजीबावा येक होता ते माहापुरुश जाले त्याणी तुकोबाचे सेवा करु लागले सवसार आवघा टाकला मग त्याची बहीण दाइबाई होती तिणे आवघे मुलालेकराच साभाळ केला साभाळ केलियावर गगाजीबावा हि वारले त्यास पुत्र चवघे होते त्याची नावे विठावा नाो व भानजी नाईक व सिदावा नाईक व उभावा नाईक मवाल हेहि बहुत दिवस नादले तेव्हा या प्रातात उपद्रव जाला तेव्हा हे राजमाची खाले चोचखिाडपे येथे जाऊन दोन वरसे तेथे राहिले काल करमिला तेव्हा तेथ दुखणी × × × मग त्या मार्ग-करून नासिकासी × × नासिकातही वरील दोन वरसे नादले मग आकोल्या-जवळ आढलगाव याची टाकलीस जाऊन त्याची भेट घेतली तेव्हा त्याणी बोलाऊन येत घर राहावयासि दिल्हे तेथेहि कितीक दिवस राहिले तेव्हा श्रीमंत रायासी सेनापती जाली व खासखेली जाली यावर मुलूखगिरी श्रीगंगातीरपरयेत केली येते समई अकोलियावर तल आला ते समई भानजी नाईक नाना यासी बोलाऊन

---

+ शक १५४० इ. १६१८.

आणिले कीं तुम्ही आपले गावावर यावे असे राव बोलिले यावर ( पुरवणी ) मानजी नाईक नानानीं उत्तर केले की आमच्या वाड्यात उमाजी पाटील राहिले आहेत तेव्हां राव बोलिले की उमाजी पाटील राहिले तर काही चिंता नाही त्यास काढून तुमचा वाडा तुम्हास देऊ आम्ही आलियावर आमची जागांहि आम्हास दिधली आम्ही आपले घर बांधले आणि आजपरियेत नानलो हे सर्वांस विदित आहे कलावे हा करिण लिहिला सई

---

## बाळाजी विश्वनाथाचें पत्र

ले. २४

{ शक १६३८ कार्तिक शु. ५
{ इ. १७१६ आक्टो. ९

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
रामचंद्र माहादेव स्वामी गोसावी यांसि

सेवक बालाजी विस्वनाथ प्रधान नमस्कार विनंति सु॥ सबा अशर मया आलफ राजश्री बाबूराव बिन राजश्री सोमाजी दाभाडे याणी कसबे उचर नवलाख प्रांत जुनर येथील पाटीलकीची चौथी तकसीम येस पाटील पापल याजपासून विकत घेतली त्याची हरकी रुपये २०० दोनीसे करार करून यैवज तुम्हाकडे देविला असे घेऊन पावलियाचा जाब देणें तेणेप्रमाणे मजुरा असे छ ४ जिलकाद +बहुत काय लिहिणे. हे+ विनंति

+चार ( पत्राचे पाठीवर )

---

## कटापूरची वांटणी

ले. २५

{ श १६३९-१६५१
{ इ. १७१७-१७२९

श्री [1]शंकरभजन
राजश्री खडेराव दाभाडे सेनापति गोसांवी यांसी

॥ द

श्री सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्ये ——श्री मोरो जी॰ बाजी देशपांडे पा। वांई आसीर्वाद विनती उपेरी येथील कुशल जाणोन स्वकीये स्वानंद॰

---

+ तिन्हीं अक्षरें वेगळीं. 'हे विनंति' हे बाळाजी विश्वनाथाच्या हातचें.
१ अक्षर वेगळें.

र्भव लेखन करीत गेले पाहिजे विशेष आपण जाते समई करार केला कीं कटापूरचे वतनाची कालीपांढरी देखील वाटून देऊन कागदपत्र वाटणीचे पाठविले म्हणजे घोली प्रा पैका पाठवून देऊ त्यावरून गावकरी यास बोलावून आणून च्यारी गोष्टी सागणे त्या सांगितल्या तेव्हा ते कालीपांढरीचे वांटणीस रजावद जाले मग चांपाजी ढमाले आपण वतनाचे कारभारास ठेविले आहेत त्याचे दखलगीरीने कालीपांढरीची वाटणी करून चौथी तकसीम नेमून दिल्ही कालीपांढरीचे वांटणीचे दुनरका जाबिते करून पाठविले आहेत व चांपाजी ढमाले याचा कागद चौथी तकसीम आपण समजोन घेतली म्हणून घेतला त्याची बजिनस नालिक पाठविली आहे गोसावी-याचे वतनाचा कार्यभाग विल्हे लाविला या उपेरी पैकीयाचा करार आपण केला आहे त्याप्रमाणें पैका पाठविला पाहिजे कालीची वाटणी आपण असतां जाहाली होती ते आपण पूर्वीच समजले आहेत पांढरीची मात्र वाटणी राहिली होती ते करून घेऊन काली-पांढरीचे दुनरका जाबिते करून पाठविले आहेत कलले पाहिजे बहुत काय लिहिणें ऽ लोभ असो दीजे हे विनती

---

## सेनाखासखेलीवरून सेनापती-पदावर

ले. २६ (श. १६३९ आश्विन शु. ६ | इ. १७१७ सप्टं. २९)

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४४ हेमलंबी सवत्सरे अस्वीन शुध शष्टी रविवासरे क्षत्रीये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी राजश्री मलोजी पवार यासि आज्ञा केली ऐसी जे राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति यांस पेसजी खासखेलीचा मामला होता त्यावरी स्वामी कृपाळू होऊन सेनापति सांगितली खासखेलीचा मामला राजश्री त्र्यंबकराव दाभाडे यास सांगितला आहे तरी तुम्ही जैसे खंडेरायांचे ताबीन राहून स्वामीकार्य करीत होतेस तैसे त्र्यंबकरायाचे ताबीन राहोन स्वामीकार्य करणे अणी सेवेचा मजुरा करून घेणें +बहुत काये लिहिणे मर्यादेयं राजते[१] (पट्‌कोनी शिक्का)

( कागदाच्या मागें )

*चार *तुरुमुद *चार *चार

---

† येथून पुढील मजकूर पत्राच्या मागें लिहिलेला आहे.

ऽ हें अक्षर निराळें आहे.

+ अक्षर वेगळें. * हीं चारीहि वेगवेगळीं हस्ताक्षरें आहेत.

१ सातारा छत्रपतींची मर्यादामुद्रा. खंडेरावांस सेनापतिपद नेमकें केव्हां मिळालें हे निश्चित नाहीं. प्रस्तावना पहा.

## सौ. उमाबाईकडे वेहेज इनाम चालविणें

ले. २७ 　　　　 श्री 　　　　 }श. १६३९ माघ वद्य ९ बुध.
}इ. १७१८ फेब्रु० १२

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४४ हेमलंबी संवछरे माघ बहूल नवमी सौम्यवासरे

| | | |
|---|---|---|
| ⌣ श्री ० | ० श्री ⌣ | क्षेत्रीये कुलावतंस श्री राजा |
| राजा शाहु न | श्री आई आदी पु | शाहू छत्रपति स्वामी यानी |
| रपति हर्ष नीधा | रुष श्री राजा शाहु न | मोकदम कसबे वेहेज ता। |
| न बाळाजी वि | रपति स्वामी रुपानिधी | कोन्हाली प्रांत बागलाण यासि |
| श्वनाथ प्रधा | नस्य श्रीनीवास पर | आज्ञा केली ऐसी जे कसबे |
| न | शुराम प्रतिनीधी | मजकूर राजश्री खंडेराऊ |
| ( कोयरी आकार ) | ( आकार वाटोळा ) | दाभाडे सेनापति यांची स्त्री |

सौ उमाबाई यांस इनाम आहे तेणें प्रा। करार केला असे तरी कसबे मजकूरचा वसूल मारानिलेस रुजू होऊन पावति जाणे +लेखनालंकार[1] मर्या देयंरा जते (पटूकोनी शिक्का)

+रुजू +सां। +मंत्री

+बार सुद सुरुसुद +बार +बार

---

+नऊहि अक्षरें निरनिराळ्या वळणाचीं.

१ ह्याच वेहज गांवाबद्दल श. १६४१ आश्विन शु. ४ ( १७१९ आक्टो. ६ ), श. १६४३ कार्तिक वद्य ५ ( १७२१ आक्टो. २८ ), श. १६४५ कार्तिक शु. १० ( इ. १७२३ आक्टो. २७ ) व श. १६५३ आषाढ शु. ८ ( १७३१ जुलै १ ) चीं चार पत्रें शाहूछत्रपतींचीं ह्याच मजकुराचीं आहेत. तीं येथें स्वतंत्रपणें घेण्याचें कारण नाहीं. ह्या पत्रांपैकीं १ ल्या पत्रावर बाळाजी विश्वनाथांची मुद्रा वर्तुळाकार असून त्यांत ' मुख्य ' शब्द आहे ' धान ' एवढींच अक्षरें सहाव्या ओळींत आलीं आहेत. आणि श्रीनिवास पंत प्रतीनिधींचीच मुद्रा पण अष्टकोनी आहे. दुसऱ्या पत्रावर बाजीराव व श्री. निवासरावाच्या मुद्रा कोयरी व वर्तुली असून तिसऱ्या पत्रावर ह्याच दोघां वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुद्रा अनुक्रमें वाटोळी व अष्टकोनी आहेत. अर्थात ओळींतील अक्षरक्रम बदलला आहे. आणि चवथ्या पत्रावर प्रधान बाजीरावाची मुद्रा तिसऱ्या पत्राप्रमाणेंच असली तरी प्रतिनिधींची मुद्रा वाटोळी व पांचच ओळींची आहे. अक्षरक्रम वेगळा आहे. श्रीकार नाहीं. सर्व हि पत्रांवर छत्रपतींची सभासिमुद्रा सारखीच आहे. ह्यावरून प्रतिनिधींच्या मुद्रा दोन असून त्या श. १६३९-४३,५३ वर एक आणि श. १६४१ व ४५ वर दुसरी अशा उठविल्या आहेत.

त्याचप्रमाणें बाळाजी विश्वनाथ व बाजीराव बल्लाळ ह्या पितापुत्रांच्याहि दोन दोन मुद्रा आहेत हें ह्या पत्रांवरून कळून येतें.

## काळोजी भोसले यास परगणे भामेरचा मोकासा

ले. २८ { श. १६३९ आश्विन वद्य १
श्री { इ. १७१७ आक्टो. १०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबी संवत्सरे आश्विन बहूल प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्रीराजा शाहूछत्रपति स्वामी याणी

१ २ देशमुख व देशपांडे पा। भामेर यासि आज्ञा केली ऐसी जे पा। मा।र रा। काळोजी भोसले याकडे सालगुदस्ता मुकासा आहे तेणेप्रो साल मारी करार केला असे रुजू होउनु मुकासबाबेचा उसूल मा।रनिलेकडे देणे †लेखनालंकार मर्या देयं। जते

+रुजू +सा।

+मंत्री

+सुरुसुद +बार +बार

---

## खंडेरावास घोटीऐवजी किरकटवाडीची पाटिलकी

ले. २९ { श. १६४० वैशाख शु. ५
(नकल) श्री { इ. १७१८ एप्रील २४

शेके १६४० विलंबी नाम संवत्सरे वैशाख सुध पंचमी *इंदुवासरे ते दिवसी राजश्री खंडेराव वलद येसाजी दाभाडे मोकदम मौजे तलेगाव पा। चाकण सरकार जुन्नर यांसी कुसाजी वलद सिदोजी जाधव मोकदम मौजे वाघोली पा। पुणे व मौजे किरकटवाडी ता। कर्यात मावल लेहून दिल्हे ऐसे जे आपले बाप सिदोजी जाधव यांसी देवाज्ञा जाली यावर कर्जदारानी चेतंग केले पदरीं जनोबा भारी संसारकृत्ये न चाले याजकरितां आपण तुमचे भेटीस चिंचवडच्या मुकामास आलों सविस्तर वर्तमान तुम्हांपासीं सांगितलें त्याजवरून तुम्ही आपणास तलेगांवास घेऊन आलस तेथें तुम्हांसी करार केला कीं आपण करजदार जालों याजकरितां मौजे वाघोली पा। पुणें येथील मोकदमी आपली आहे ते तुम्हास देतों तुम्हापासून रु।। घेऊन कर्ज वारून ऐसा करार करून मौजे मजकूरची मोकदमी तुम्हास देऊन मुकरर। रुपये ३००० तीन हजार केले त्याजपैकीं

---

१ बाळाजी विश्वनाथ पेशव्याचा कोयरी आकाराचा शिक्का.
२ श्रीनिवास परशराम प्रतिनिधीचा अष्टकोनी शिक्का
† अक्षर वेगळें. + निराळे वळणाचा मजकूर. * जंत्रींत गुरुवार आहे ?
दा. ४

तूर्त रुा ५०० पाचसे व कापड येन खरीदी मारफात राजश्री आनावा नाईक गुड याजकडून रुा २०० दोनसे देविले सदरहू रुो सातसें आपण घेतले बाकी रुपये तेवीसस राहिले त्याजपैकी हवाला राजश्री रघोजीराऊ घारे देशमुख ता पोनमावळ रुो..... देविले राहि......द्यावे येणे प्रा..........करून घेऊन निरोप घेऊन गावास गेलों मातुश्री गंगाबाई यासी वर्तमान सागोन त्यांस आणून खरिदीखत करून घ्यावें त्यास गावास जाताच राजश्री संभाजी जाधव यास वर्तमान कळलें कीं दाभाडियांस पाटीलकी दिल्हीं त्याजवरून आपले कर्जदार देवजी मोगल वगैरे उठऊन आपल्या गळां पाडिले आपणास नादेडियास नेले तेथे देवजी मोग[ल] यानी संभाजी जाधव यांचा दस्तदपट दाखऊन सख्येत्वाच्या गोष्टी सांगोन मायेत मेळऊन घेतले नाविलाज जाणोन मौजे वाघोली येथील पाटीलकी संभाजी जाधव यासी दिल्ही कर्जदारांचे तगादे वारावे योसियास आपणासी करार केला त्यास लटीकवाद आला हें जाणोन फिरोन तलेगांवास आलों जालें वर्तमान सविस्तर तुम्हास सागितले त्याजवरून तुम्ही आपणास रुपयाचा तगादा लाविला द्यावयास मवसर नाहीं याजकरितां मौजे किरकटवाडी ता कर्यात मावळ येथील निमे मोकदमी आपली व निमे आपल्या भावांची आहे त्यास आम्ही आपली निमे मोकदमी तुम्हांस खुशरजावंदीने दिल्ही असे वंशपरपरेने आनभऊन सुखरूप मोकदमी करणे यास कोण्ही हिला हरकत करील त्यास आपण वारून यासी आतर करूं तर श्रीकुल स्वामीची व पूर्वजांची शफत असे याचें खरीदखत पाटीलाच्या विदेमाने करून देऊन हें लिहिले सही

| | |
|---|---|
| बीकलम भास्करराऊ बाबाजी देशपाडे व कुलकर्णी ता हिरडस मावल | निशाण नागर (नांगराचें चित्र) |

गोही

| | |
|---|---|
| गोविंदराऊ ढमाले देशमुख ता पौडखोरे | तुळाजी बरगे पाटील का कोरेगाव बा वाड |
| आपाजी बागुल | रघोजीराऊ घोर देशमुख ता पोन मावळ |

---

## सावंत दे०खांचा घारे दे०खांस वायदे रोखा

ले. ३०

श्री

{ श. १६४० भाद्र. शु. ५ मंगळ
{ इ. १७१८ आगष्ट १९

सके १६४० विलिबीनाम सवछरे भाद्रपद सुध ५ पचमी मंगळवार तादिनी लिखिते राजश्री रघोजी घारे देसमुख मा पौन मावल यास सुर्याजी सावत देसमुख ता वाडे सरकार जुनर सुा स(न) तिसा आसर आलफ लेहून दिल्हे येसे जे आपण राजश्री

——राऊ सेनापती यासि खर्गिदी गला व तूर दिल्हे त्याचा वायेदा खरिफाचे रासमाथा केला त्यास तुम्हास उगवणीस जमान दिल्हे त्यास आपण खरिफाचे रासमाथा खताप्रा जिनस रु॥ २३५ दोनींसे पचतसि रुपयाचा जिनस निरख प्रा देऊन तुमची जामिनी मोकली करून मुद्दतीस न देऊन तरी दुप्पट प्रा हिसेबु करून देऊन साहदेसी परदेसी देऊन हे लेहिले सहि छ २७ सवाल हे +लेख सही

गोही

गोरोजी नाईक लोहट १

गोविंदराऊ ढमाले १

सुभानजी केदारी पाटील मौजे वालुन १

समाजी नाईक नाईकवाडा चाकणकर १

---

## खंडेरावांकडे निंबगांवचा मोकासा

ले. ३१

श्री

शु. १६४० अश्विन वद्य ११
इ. १७१८ आक्टो. ९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४५ विलंबी नाम संवत्सरे आस्वीन बहुल येकादसी गुरु वासरे क्षेत्रीये कुलावंतस श्री राजा शाहु छत्रपति स्वामी याणी मोकादम मौजे
१ २ निंबगाऊ ता॥ खेड प्रा॥ जुनर यासि आज्ञा केली येसी जे मौजे मजकूर राजश्री खंडेराऊ दाभाडे सेनापती याकडे साल गुदस्ता आहे तेणे प्रा करार केला असे तरी तुम्ही रुजु होऊन मुकासबाबेचा वसूल मारनिले कडे देणे *लेखनालंकार †मर्या देयंरा जते षट्कोनी शिक्का

* *रुजू सुर नीवीस *सा॥ मंत्री

*बार सुद *सुरु सुद *बार *बार

---

+ ह्याच मितीमजकुराचें दुसरें पत्र आहे. त्यावर लोहट व ढमाले ह्यांच्याच गोही आहेत केदारी वगैरेंच्या नाहींत.

*हीं हस्ताक्षरें निरनिराळ्या अधिकारी लोकांचीं असत.

† हा मजकूर पत्राचे पाठीवर लिहिलेला आहे.

१, २, प्रधान प्रतिनिधींची मुद्रा कोयरी व अष्टकोनी. याठामीं विश्वनाथांच्या मुद्रेंत फक्त 'न' हेंच अक्षर ६ व्या ओळींत आहे.

## प्रांत त्रिंबकचा मोकासा सेनाखासखेल त्रिंबकरावांकडे

ले. ३२ { शक १६४० आश्विन वद्य ११
{ इ. १७१८ आक्टो. ९ गुरुवार

श्री

स्वस्ति श्री राज्याभिशेक शके ४५ विलंबी नाम संवत्सरे आस्विन बहूल येकादसी गुरुवासरे क्षत्रीये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे प्रांत त्रिंबक सरकार दौलताबाद यास आज्ञा

(१) (२) केली येसी जे प्रांत मजकूर राजश्री त्र्यंबकराऊ दाभाडे सेनाखासखेल याजकडे साल गुदस्ता मुकासा दिल्हा आहे तेणे प्रमाणे साल मजकुरी करार केला असे तुम्ही हजूर होऊन मुकास याचेचा वसूल मशारनिलेकडे देणे +जाणिजे +लेखनालंकार [३]मर्यादेयं जते

+हजूर +सा
+निविस +मंत्री

+बार +सुद +सुरुसुद +बार +बार

---

## इंदुरी खंडेरावास इनाम

ले. ३३ { श. १६४१ आश्विन शु. ४
श्री { इ. १७१९ आक्टो. ६

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४६ विकारी संवछरे आस्विन शुध चतुर्थी भोमवासरे क्षत्रिये कुलावंतस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी मोकदम मौजे इंदुरी पा चाकण

(१) (२) यासि आज्ञा केली येसी जे मौजे मजकूर राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति यास देखील इनाम निजाई इनाम आहे त्याप्रमाणे करार आहे तरी

---

+अक्षरा अक्षरं भिन्नभिन्न. १, २ प्रधान व प्रतिनिधी ची कोयरी व अष्टकोनी मुद्रा. प्रधानमुद्रा ले. ३१ प्रमाणें. ३ छत्रपतींची समाप्तिमुद्रा.

तुम्ही गाव. मशारनिलेस रुजू होऊन गावीचा येवज पावीत जाणे +जाणिजे +लेखनालंकार.
मर्या देयं रा जते षट्कोनी

(पाठीवर) [1]रुजुमुरु [3]सा
[2]निविस [4]मंत्री
[5]बार [6]सुद [7]सुरुसुद [8]बार [9]बार

---

## त्रिंबकराव सेनाखासखेल यांस परगणे कोतूल निमे

ले. ३४

श्री

{ श. १६४१ आश्विन शु. ४
{ इ. १७१९ आक्टो. ६ मंगल

स्वास्ति श्री राज्याभिषेक शके ४६ विकारी संवत्सरे आस्वीन शुध
(१) (२) चतुर्थी भौमवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री
राजा शाहू छत्रपति स्वामी यांणी देशमुख
व देशपांडे पा। कोतूल मान हारिश्चिंद्र यासि आज्ञा केली ऐसी जे पा। मा।र राजश्री त्रिंबकराऊ दाभाडे सेनाखासखेल याकडे साल गुदस्ता निमे मुकासा आहे त्या प्रो साल मा।रि करार केला आहे तरी तुम्ही रुजू होऊन मुकास बाबेचा वसूल मा।रनिलेकडे देणे सदरहू निमेचा मुकासबाबेचा उसूल देणे +लेखनालंकार (मर्या देयं रा जते षट्कोनी शिक्का)

+रुजु सुरु +सा।
+निवीस +मंत्री
+बार +सुद +सुरूसुद +बार +बार

---

## चांदखेड पाटिलकींत दाभाडे हिस्सा

ले. ३५

श्री

{ श. १६४१ आश्विन शु. १३
{ इ. १७१९ आक्टो. १४ बुधे

(छत्रपती शाहूची 'वर्धिष्णु॰' ही अष्टकोनी सहा ओळींची मुद्रा)

स्वस्ति श्री राज्याभिषक शके ४६ विकारी सवत्सरे आस्वीन शुध त्रयोदसी सोम्य

---

+ व १ ते ९ अशीं अकरा अक्षरें वेगळालीं. ह्या पत्रांत इंदुरीला मौजे म्हटलें हें चिंत्य वाटतें. कसबे पाहिजे. १, २ बाळाजी विश्वनाथांचा वर्तुळी व श्रीनिवास परशरामांचा अष्टकोनी शिक्का. बाळाजीच्या शिक्यांत सहाच ओळी. पण सहाव्या ओळींत 'धान' हीं अक्षरें आहेत.

+ दहा अक्षरें वेगळीं १, २ प्रधान प्रतिनिधींचा वाटोळा व अष्टकोनी शिक्का

त्याच मितीचें असेंच दुसरें पत्र मौजे बेहूज हा गांव सौ॰ उमाबाई यांजकडे आहे तो चालविण्याबद्दल आहे.

वासर क्षेत्रीये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामि याणी सयाजी बिन हरजी दाभाडे व खंडेराऊ बिन येसाजी दाभाडे निमे पाटील मौजे चांदखेड ता पौन मावल प्रांत मावल यांसी दिल्हे वतनपत्र ऐसे जे

( १ ) ( २ )

तुम्ही स्वामी सनिध किले साताराचे मुकामी हुजूर येऊन विदित केले जे मौजे मजकूरचे पाटिलकीचे वतन निमे सिंदे याचे व निमे आपले ऐसे अस्ता चापाजी गाईकवाड यांनी स्वामीस अर्ज केला जें दाभाडे यांचे नकल जाहाले त्याचे कोणी नाही तर आपणास दाभाडे याच्या निमे पाटीलकी पैकी निमे वतन करून दिल्हे पाहिजे म्हणून त्यावरून स्वामींनी त्यास आपले निमे पाटीलकी पैकी निमे वतन करून देऊन वतनपत्र दिल्हे आहे ऐसियासी निमे पाटीलकीचे सावद आम्ही हाजीर असोन गैर माकूल चापाजी गाईकवाड याणे अर्ज करून वतनपत्र करून घेतले आहे तर स्वामींनी आपले निमे पाटीलकीचे वतन पूर्ववत् आपणास बाहाल करून देऊन वतन पत्र करून देवून वंशपरंपरेने आपणास वतन चालविले पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणून तुम्ही मौजे मजकूरचे निमे पाटीलकीचे सावद पुरातन वतनदार खरे आहा म्हणून स्वामी तुम्हावरी कृपालू होऊन चापाजी गाईकवाड यास तुमचे निमे पाटीलकी पैकी निमे ·I· त्यास वतन करून दिल्हे होते ते त्याजकडून दूर करून वतनपत्रे त्याची रद केली असत हाली मौजे मजकूरचे निमे पाटीलकीचे वतन तुमचे तुम्हांस करार करून देऊन हे वतन-पत्र करून दिल्हे असे तर सदरहू निमे पाटिलकीचे वतन मौजे मजकूरचे तुम्ही आपले दुमाले करून घेऊन पूर्ववत हक लाजिमा पानमान सुदामत चालिले प्रमाणे घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वतन निमे पाटीलकीचे अनभऊन सुखरूप राहणे तुमच्या वतनाची हरकी तुमच्या माथा करार केली रा। १०० येकसे सेरणी करार केली आणि वसूल जिल्हेकडे देविला आसे तरी जिल्हेकडे देणे +जाणिजे +लेखनालंकार
( मर्यां दे यं ग जते ) . . .

+रुजू सुरु +सा।
+नीविस +मंत्री

( वाटोळा शिक्का )

+तेरीख ११

+जिल्हेज सु॥ अशरीन मया

+बार +सुद +सुरुसुद +बार +बार

---

+तेरा अक्षरें निगनिराळीं. १, २ प्रधान ( ले. ३३ प्रो ) प्रतिनिधींची मुद्रा वर्तुळी व अष्टकोनी आहे.

# चांदखेड पाटिलकी—पुनः

ले. ३६ { श. १६४२ ज्येष्ठ शु. २
{ इ. १७२० मे २८

छत्रपती श्री

राजश्री देशमुख व देशपांडे ता। पौन मावल गोसावी यासि

॥ द श्री। अंताजी बलाल नामजाद व कारकून ता। मजकूर असीर्वाद व नमस्कार सु॥ ईहीदे, अशरीन मया अलफ सयाजी बिन हरजी व खंडोजी बिन येसाजी दाभाडे मोकदम तीन तक्षिमा मौजे चांद्खेड ता। मजकूर याची मोकदमी पूर्वी अगदीच होती त्यास गोदजी सिंदा मौजे मजकुरी येऊन कटकट करू लागला की निमे मुकादमी मौजे मजकूरची आपली आहे (त्या)वरून दाभाडे व गोदजी सिंदा हर दोजण वादे हुजूर गेले महाराज राजश्री — स्वामीनी व राजश्री पंताजीपंत याणी मनसुबी मनास आणून मौजे मजकूरची सारी मोकदमी दाभाडे याची पूर्वी होती येसे खरे जाले त्यावरून मौजे मजकूरची मोकदमी दाभाडे यास दिल्ही त्यास चापाजी गायकवाड चौगुला मौजे मजकूर (याने) + + राजश्री स्वामीचे सेवेसी आर्जी केला की आपण स्वामीच्या (पा)याजवळ येकनिस्ट सेवा करितो त्यास आपल्यास पाटीलकीचे वतन नाही तरी मौजे मजकूरची चौथी तकसीम मोकदमी आपणास दिल्ही पाहिजे त्यावरून राजश्री—स्वामी कृपाळू होऊन मौजे मजकूरची चौथी तकसीम चापाजी गायकवाड यासि मोकदमी दिल्ही तीन तासिमा मोकदमी सयाजी दाभाडे व खंडोजी दाभाडे याचे दुमाला केली आहे + + वरून हे पत्र तुम्हास सादर केले आसे...............चे होने मुकादमीची सेवा घेऊन पुत्रपौत्रादि वंशपरंपरे चालवणे मोकादमीस हाकलाजिमा पूर्वापार आसेल त्याप्रमाणे चालवणे या पत्राची प्रती लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयासि परतोन देणे येविशी राजश्री—स्वामीची व राजश्री पंताजीपंत याची पत्रे आलाहिदा तुम्हास सादर आहेत त्याप्रमाणे वर्तणूक (करणे) जाणिजे छ १ साबान मोर्तब सुद मोर्तब

(अंताजी बलाळचा शिक्का)

बसुद (वर्तुळी)

---

अंताजी बलालाचा चार ओळींचा वर्तुळी आकाराचा शिक्का. (श्रीमानडच रणीतत्परश्र नाजीबलाल नीरंतर)

## खंडेरावांचें घारे देशमुखांस पत्र

ले. ३७ श्री +राम {श. १६४२ आश्वीन शु. ११ / इ. १७२० आक्टो. ३}

राजेश्री रघोजीराऊ घारे देशमुख व राजश्री दादोपंत गोसावी यासि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—श्रो खंडेराऊ दाभाडे सेनापती रामराम सुहुर सन इहिदे आशरीन मया अलफ आंचीचा महजर तुम्ही पाहिलेला आहे त्याची तालीक लेहून पाठऊन देणें जाणिजे छ ११ जिल्हेज ( मोर्तब सुद अष्टकोनी दुवलई )

( पत्राच्या पाठीवर ) ० श्री [1] ( श्री कारासह पांच ओळींच, दुवलई अष्टकोनी )

राजा शाहु रा
मि छत्रपति खं
डेराव दाभाडे
सेनापती

---

## पटी करून गांवकुसूं—खंडेराव पत्र

ले. ३८ श्री {श. १६४२ कार्तिक शु. ६ / इ. १७२० आक्टो. २५}

राजश्री रघोजीराऊ घारे गोसावी यासि

द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—श्रो खंडेराऊ दाभाडे सेनापती रामराम सुा इहिदे अशरेन मया अलफ गावीचे कुसूं चिरा कुसुर आधीं घालवणे गावावरी पटी करणे आगर वाटून देणे डालेसाकर्डाल +परवाना लावणे हे काम आधी करणे मग दुसरा विचार करणे बहुत काय लिहिणे छ ४ मोहरम ( मोर्तब सुद अष्टकोनी शिक्का )

+ + ( पाठीवर ) ० श्री

राजा शाहु स्वा
मि छत्रपति खं ( ले. ३७ प्रमाणें )
डेराव दाभाडे
सेनापति ( अष्टकोनी शिक्का )

---

[1] सेनापती दाभाडे खंडेरावाचीच मुद्रा ५. द. भा. १२ ले. ३, १३४८ दिली आहे. पण ती मूळ पाहूनच प्रमाण मानिली पाहिजे. ही येथें दिलेली बरोबर आहे.

+अक्षर वेगळें.

## दाभाडे देसाई व त्याबद्दल चिंचवड इसाफत

ले. ३९ { श. १६४२ पौष शु. १
{ इ. १७२० डिसें. १९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४७ शार्वरी संवछरे पौष शुध प्रतिपदा इदुवासरे

| | | |
|---|---|---|
| ० श्री ० | ० ० | क्षत्रियेकुलावतंस श्री राजा |
| राजाशाहूनर | श्री आईआदीपु | शाहू छत्रपति स्वामी यांणी |
| पतिहर्षनिधान | रुषश्रीराजाशाहूछ | राजश्री खंडेराऊ चिन |
| बाजीरावबल्ला | त्रपतिस्वामीकृपानीधी | येसजी दाभाडे देसाई ताा |
| ळ प्रधान | तस्यश्रीनिवासपर | गिरे ताम्हणखोरे ताा पौड खोरे |
| | शुरामप्रतिनीधी | प्राा मावळ यास दिल्हे इनाम- |

पत्र ऐसे जे तुम्ही स्वामीसंनिध किले साताराचे मुकामी येऊन विनंति केली जे ताा मजकूरचे देसाईपणाचे वतन आपले आहे या वतनास इसापत येक गाव देऊन वंशपरंपरेने चालवले पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणून तुमचे चालवणे स्वामीस अवशक जाणोन स्वामी तुम्हांवरी कृपाळू होऊन मौजे चिंचवड ताा पौडे खोरे हा गाव पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून हाली तुमच्या देसाईपणाचे वतनास कुलबाब कुलकानू देखील हाली पटी व पेस्तर पटी स्थल जलतरु तृण पाषाण निधिनिक्षेप आदी करून पहिले पान खेरीज इनामदार व हकदार तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इसापत करून दिल्हा असे तरी तुम्ही मौजे मजकूर चुतःसीमा पूर्व मर्यादेप्रमाणे आपले दुमाले करून घेऊन देसाईपणाचे वतनास वंशपरंपरेने इसापत अनभऊन सुखरूप राहाणे लेखनालंकार
( मर्या देयंरा जते षट्कोनी शिक्का )

*रुजू सुरू साां
निवीस मंत्री ( ले. ४७ पहा )
तेरीख २९
सफर सुाा इहीदे अशरेन

बारसुद सुरूसुद बार बार

---

## हवाला खत रोखा–सावकारी पत्र

ले. ४० { श. १६४३ भाद्र. वद्य १०
श्री { इ. १७२१ सप्टें. ७ गुरु

राजेश्री कृष्णाजी दाभाडे सुभेदार गोसावी यांसि

७ श्रीसकल गुणां अलकर्ण राजमान्य—श्री सिवजी रघुनाथ असीर्वाद सुाा इसन्ने इसने अशरीन मया अलफ लिहून दिधले ऐसी जे ताा मोगे शकर कुलकर्णी मौजे ओ-

* रीतीप्रमाणे येथील १०-११ अक्षरे वेगवेगळी आहेत.

सरिबुा याजकडे तुमचे रुपये १९३॥ येकसे साडेन्याणव होते त्यास आरण त्याचा हवाला घेतला सदरहू येकशे साडेन्याणव रुपये अडीच महिनियांनि देऊन अडिचा महिनियां मुदतीस नेटू तरी चवोत्राप्रमाणे दर माहे दर सदे देऊन शके १६४३ प्लवनाम संवछरे भाद्रपद वद्य द्वादसी गुरुवार छ २५ जिल्कादी हा खतरोखा लिहून दिल्हा सही

गोही

जिऊबा नाईक भदे कडूसकर

आबाजी सलाट

मोराजी काले माहाजन

मौजे तलेगाऊ प्रा। चाकण

रामचंद्र × × कशी × ×

देस × ×

---

## दामाजी खंडेराव

ले. ४१

श्री

{ श. १६४३ कार्तीक वद्य ५ शनि.
{ इ. १७२१ आक्टो. २८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४८ प्लव सवत्सरे कार्तिक बहूल पचमी मंदवासरे क्षत्रीयेकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपति स्वामी याणी + + मोकदमान मौजे नागोडी ता। माहालुगे यास आज्ञा केली येसी जे मौजे मजकूर रा। दामाजी खडेराऊ यास

१ २

इनाम आहे तेणे प्रो करार आहे तर तुम्हीं यास रुजू होऊन मौजे मजकूरचा वसूल सुरलीत देणे +जाणिजे +लेखनालंकार (मर्यादेयं विराजते पट्‌कोनी सिका)

+रुजु सुर +सा।

+निवास +मंत्री

+बार +सूद +सुरसुद +बार +बार†

---

१ येथे बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा कोयरी आकाराचा मुलम्याचा शिक्का.

२ येथे श्रीपतराव प्रतिनिधींचा लंब वर्तुळाकारी शिक्का.

+ अक्षरें ११ निरनिराळ्या अधिकाऱ्यांचीं.

† ह्याचप्रमाणें कृष्णाजी दाभाडे यास साल उंबरे ता। चाकण-चा मोकासा दिल्याचें ह्याच मितीचें पत्र असेंच आहे. आणि सौ. उमाबाईकडे मौजे वेहज हा गांव पूर्ववत् चालवावा याबद्दलचेंहि ह्याच मितीचें आहे. मौजे कुरुळी ह्याहि गांवचा मुकासा श. १६४४ पौष व. ३–१७२३ जाने. १३ रोजींच्या सनदेवरून सालमजकुरीं दिला असल्याचें असेंच अस्सल शिक्कामोर्तबाचें पत्र आहे.

## साल—उंबरे कृष्णाजी दाभाड्यांस मोकासा

ले. ४२

श्री

{ श. १६४३ कार्तिक वद्य ५ शनिवार*
{ इ. १७२१ आक्टो. २८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४८ प्लव संवत्सरे कार्तिक बहुल पंचमी मंदवासरे क्षत्रीय-कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणि मोकदमानी मौजे *सालउंबरे ता। चाकण यांसि आज्ञा केली ऐसी जे मौजे मार रा। कृष्णाजी दाभाडे याजकडे आहे तेणे प्रा। करार असे+ मुकासबाबेचा उसूल मारकडे देणे जा (णिजे) (लेखनालं) कार (मर्या देयंग जते षट्कोनी)

१ २

सुजू सुरू सां

निवीस मंत्री

बार सुद सुरूसुद बार बार

---

## कमाविसदार सावकार

ले. ४३

श्री

{ श. १६४३ माघ वद्य ३
{ इ. १७२२ जाने. २४

राजश्री (च)ांहरो विठल कमाविसदार नामजाद सरमोकद्मी गोसि

छ अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य—श्री खंडेराव दाभाडे सेनाखासखेली† लस्कर रामराम सुहूर सन इसने आशर मया आलफ सरमोकद्मीची कमावीस तुम्हास सागोन तुम्हापासून कर्ज मुद्दल रुपये ८०० आठसे घेतले असेती यासी व्याज वीलमता ता। साल रुपये २५० अडीचसे केले असेत येंकूण रुपये साडेदहासे सर मोकदमी पैकी उगऊन घेणे जाणिजे छ १७ रासर अपस्ट [ खंडेराव दाभाड्याचा अस्पष्ट शिक्का†, अष्टकोनी, पांच ओळींचा कागदाच्या पाठीवर ले. ३७ प्रमाणे ]

---

* जंत्रींत रविवार आहे व शनिवारीं १४ घ. ५० प. नंतर पंचमी लागते.

१ येथें बाजीराव बल्लाळ पेशव्याचा कोयरी आकाराचा सुलट्या ' न ' चा शिक्का. २ येथें श्रीपतराव प्रतिनीधींचा लंबवर्तुळ आकाराचा शिक्का आहे.

† खंडेराव दामाडे ह्यांचा हा शिक्का सेनापतीपदाचाच आहे आणि खंडेरावास सेनापतीपद श. १६३८ (इ. १७१६-१७) मध्यें मिळालें आहे. पण त्या पदाचीं वस्त्रें मिळणें व सरंजाम गांवें मिळणें ह्यांत कालान्तर झालें आहे. तसेंच सेनाखासखेली पुनः मिळाली कीं काय ह्याचाहि विचार करणें ह्या उल्लेखावरून प्राप्त वाटतें. (ले. ५७ पहा). सविस्तर विवेचन प्रस्तावनेंत पहावें.

## बाजारभाव, सण

ले. ४४

श्री

श. १६४४ भाद्र.
इ. १७२२ सप्टें.

हिसेब निा सौ *पारोतीबाई दाभाडे सुा सन इसने सुा सलास असरैन मया अलफ गुा नवसी

'तादूल मोटे १॥२॥
या तादूल ॥ ११ दर ॥२
या रुपये २०॥
काा तादूल
॥ चारीक
॥ काा दर ॥२
रुा ६ या
२॥ १॥काा दर ॥१॥
रुा ३ या
१॥२ काा दर ॥१ रुा
रुा२ यम
॥॥
११
सावे दर ॥ या
गला याा रुा
३।÷
त्याा
२०॥ ताा मोटे ॥११
२१ गहू ११
११ ताा चारीक ॥ ॥
५४ नागली ७ ॥
३।÷ सावे
११०
६ दाल तुरी
११६।
१०१४२॥

गहू विकले
॥१॥ भात भरडणावलीस रुा ॥॥
या
॥१॥ गुा लिंबाबाई ॥ पैकी
...या रु ॥ १॥
॥ काा दर १। या रुा २
॥ काा दर १। या रुा ८
॥ काा गुानवसी दर १। या रुा २
११॥ २१
नागली
॥१ काा दर ३ या रुा ३२
१०। काा २। या रुा ९
११॥ काा दर २। या रुा १३२
७॥ ५४
दाल तुरी ११ पैकी
निंबालकर ॥ बाकी ॥ या बाकी । या दाल ४ दर ॥ या रुा ६ या दाल बाकी १
॥ छ २४ जिल्हेज
दाल विकली । साा चाडे

* येथें पूर्वीचें नांव होतें त्यावरच हें लिहिलेलें आहे. ह्या प्रमाणें ह्याच पारोतीबाईंच्या नांवचा गेल्याच वर्षीचा असाच कागद आहे. त्यांतहि धान्यभाव आले असून 'कासीबाई दाभाडे' वगैरे नांवें आहेत. १ 'भात' होतें त्याचें 'तांदूळ' केलें आहे.

( कागदाच्या पाठीवरील मजकूर )

याा खर्च रुपये

बारीक तादूल पैकी रुा ११
२ रामा
५ बैल रुा १३ पैकी
२ गुा नवसी बैलास
२ ब्राह्मण आनुस्टान
पोटखर्च
११
६ काा ।। पैकी ८ दर
१७ ‿—॥= याा रुा
चि १ ६
गहू रुा २३८=
॥ भात भरडणवलीस मजुरी
२ ताा बाई जवळा दिल्हे
० श्रावणमासी
॥ ताग ताा सिवर्जा कोटवला
१ देव्हास नेला
१॥ छ २७ जिलकाद
॥ लिंग
॥ निवणी
१। दक्षणा
१॥
॥ गोकुळ अस्टमीस अमाजी दाभाडे
याच घरी
४ लिंग्या ब्राह्मण दक्षेणा रुा ७ पैकी
१ महापूजा गणेस
१ गणेस चौथीस
॥ दुरवा
१। दक्षणा
० नरसू कामकरी
७ बैलास

मोटे तादूळ पैकी रुा ;
२०॥ तादाला बाा
५४८= नागली
७४॥=
‿
२५ खाा मेढरे
३ सिगात घातले
२५ नाा चवई
५३
२१॥=
ताा
१३८= काा नागली
९ काा नागली
२२८=
३ बजा बाा नागली
२५८=
‿
१ लोखड कुचु ( १ )
१ ताबोलीन
वालीबाा रुा ६
॥ हारितालिका पूजा
॥ दक्षेण ब्राह्मण म्हातारा कोकणाचा
३ नरसू कामकरी
३ दक्षेणा ब्राह्मण लिंगाच रुा ६ पैकी
५ बाकी ० फाजील रुा १
सावे रुा ३।– खर्च
बाकी कुलाकडे अस रुा ३।÷
छ २४ जिल्हेज तादूळ विकले
८।१ चारिक रुा ॥

१ बराबर नेला
२०
बाकी रुो
१८=

खर्च + कापिला शास्त्री दक्षणा

## नारो राम मंत्री यांचें पत्र

ले. ७५ श्रीराम { श. १६४४ कार्तीक शु. ८
इ. १७२२ नोवें. ५ }

[ अस्पष्ट मराठी चार ओळींची मुद्रा ]

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री नारो राम मंत्री ता। मोकदमान मौजे क(त)लेगाव ता। चाकन सुा सलास आसेर मया आलफ मौजे मजकूर यैन

कड्या सुमार चुर्ली मडकी दालचुरडी
५०० १० ६ २५

येणे प्रा घेऊन येणे या कामास भालदार पाठविला यास रु ।। निमे देणे छ ६ सफर पा। हुजूर [ मोर्तबची अस्पष्ट मुद्रा ]

## बेचिराख गार-ची पुनर्वसाहत

ले. ७६ श्री { श. १६४५ ज्येष्ठ वद्य ६
इ. १७२३ जून १३ }

नक्कल

सिका

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत सवत्सरे जेस्ट बहूल शष्टी गुरुवासर क्षेत्रीये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकदमान व रयान मौजे गार नजीक दौंड ता। राजणगाव यासी

सिका सिका

दिल्हें अभयेपत्र यैसे जे मौजे मजकुरी बहुत दिवस बेचिराख आहे तेथील लावणी वसाहत जाली पाहिजे यानिमित्य स्वामी तुम्हावरी कृपालू होऊन आमयेपत्र सादर केले आहे तर तुम्ही कोण्ये बाबे शक न धरता बेशक होऊन मोजे मजकरी वसाहत

करून कोर्दी आबादानी करून सुखरूप राहाणे तुम्हांस कोणे बाबे आजार लागणार नाही अभये असे लेखनालंकार

रुजूसुरू सा।
निवृत्त मंत्री

---

## देसाईपणाबद्दल चिंचवड इसाफत

ले. ४७

श्री

{ श. १६४५ कार्तिक शु. १० रवि.
{ इ. १७२३ आक्टो. २७

स्वति श्रीराज्याभिषेक शके ५० शोभकृत संवत्सरे कार्तिक शुध दशमी †रविवासरे क्षत्रीय कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकदम मौजे चिंचवड ता। पौढ खोरे यांसि आज्ञा केली ऐसी जे मौजे मजकूर राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति याकडे गिन्हे ताम्हण खोरे येथील देसाईपणास इसाफत आहे तेणे प्रमाणे करार आहे तर तुम्ही मौजे मजकूरचा वसूल मा।रनिलेकडे देणे *जाणिजे *लेखनालंकार

१ २

( मर्या देयं। जते षट्कोनी शिक्का )

रुजूसुरू सा।
निवीस मंत्री ( ले. ३९ पहा )
बारसुद सुरूसुद बार बार

---

## कृष्णाजी सोमाजी दाभाडे—देशमुख व इनाम

ले. ४८

श्री[४]

{ श. १६४५ कार्तिक शुद्ध १२
{ इ. १७२३ आक्टो. २९ मंगल

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५० शोभकृत सं(व)त्सरे कार्तिक शुध द्वादसी

---

१ येथे बाजीराव बल्लाल पेशवे यांचा वाटोळ्या आकाराचा उलट्या 'न' चा शिक्का आहे. * अक्षरें भिन्न.

२ येथे श्रीनिवास परशराम प्रतिनिधीचा अष्टकोनी शिक्का आहे.

† जंत्रींत १० मी चा क्षय आहे आणि रविवारीं घ० ५ प० २ च ९ मी आहे.

त्याच मितीचें व खंडेराव दाभाडे यांच्या बायकोस ( सौ. उमाबाई) मा। वागळाण ता। कारोली पैकी बेहज हा गांव पूर्वीपासून चालत आहे तो चालविण्याबद्दलचें पत्र आहे. तें असेंच असल्यामुळें घेतलें नाहीं.

४ येथें छ. शाहू महा. चा शिक्का.

भोमवासर क्षत्रीयकुलावतंस श्री राजा शाहूछत्रपति स्वामी याणी कृष्णाजी बिन सोमाजी दाभाडे देशमुख देहाये ४ च्यार ता॥ पोनमावल यासी

२ ३

दिल्हे वतनपत्र ऐसे जे स्वामी कृपाळू होऊन मौजे दक्षणे ता॥ मजकूर हा गाव ( पेस )जीच्या मोकासीयाकडून दूर करून हाली तुम्हा ( स ) इनाम कुलबाब कुल कानू खेरीज ह(कदार) ( व ) इनामदार चतुःसिमापूर्वक पूर्वमर्यादे प्रमाणे तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने दिल्हे आसे तेणे प्रमाणे आनभऊन सुखरूप राहाणे जाणिजे *लेखनालंकार ( मर्या देयंरा जते षट्कोनी शिक्का ) ( नुसता मोर्तबच कागदाच्या पाठीवर रेघ ओढून प्रारंभीं उठविला आहे. )

*रुजूसुरू *सां
निवीस *मंत्री
तेरीख* १०
सफर* *सुा आर्बा आशरीन
*बार *सुद *सुरु सुद *बार *बार

---

## देशमुखीच्या वतनास इनाम इसाफत गांव

ले. ४९

( श. १६४५ कार्तिक शु. १२
( इ. १७२३ आक्टो. २९ मंगळ

१ ( शोभन पाहिजे )

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत सवंत्सरे कार्तिक शुद्ध द्वादशी भोमवासर क्षत्रीये कुलावतंस श्रीराजा शाहू

२ ३

छत्रपति स्वामी याणी रायाजी बिन सोनजी घारे व विठोजी बिन राजजी घारे देशमुख देह ६ ता॥ पोनमावळ

| परदवडी | बेचडवाहाल | अढळेबुा | मांग्वे | थुगाव | कोथुर्णे |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | १ | १ | १ |

---

* अक्षरें भिन्नभिन्न.

१ छत्रपती शाहूची शिवराज म्हणून मुद्रा—अष्टकोनी, श्रीकारासह, ओळी ६.

२ येथे बाजीराव बल्लाळचा वाटोळा ' न ' उलटा असलेला शिक्का.

३ येथे श्रीपतराव प्रतिनिधीचा अष्टकोनी शिक्का.

येकूण देह साहा यासि दिल्हे इनामत व इसापत पत्र ऐसे जे तुम्ही स्वामी सनिध किले सातारचे मुकामी येऊन विनति केली ऐसी जे आपणास देशमुखीच्या वतनास इनाम व इसापत नाही तरी स्वामींनी इनाम इसापत देऊन चालविले पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणून स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन सदहू देहपैकीं मौजे बेवडवाहल ता मजकूर हा गाव पेशजीच्या मुकाशियाकडून दूर करून हली तुमचे देशमुखीच्या वतनास इनाम व इसापत दिल्हा असे

इनाम देह ·॥- इसापत दे॥ ·॥·

ऐकूण देह एक कुलबाब कुलकानू खेरीज इनामदार व हकदार तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम व इसापत दिल्हा असे तरी तुम्ही मौजे मजकूर चतु:सीमा पूर्वमर्यादेप्रो आपले हुमाले करून घेऊन वंशपरंपरेने इनाम इसापत अनभऊन सुखरूप राहाणे +लेखनालंकार ( मर्या देयंरा जते पट्कोनी सिका )

( पत्राच्या पाठीवर )

+रुजू सुरु +सुा +सुा

+नीवीस +मंत्री +सरकार

+तेरीख १०

+सफर सुा आर्बा अशरीन

+बारसुद +सुरुसुद +बार +बार +बार

---

## विहीर व घुमट-लेख

ले. ५० श्री (श. १६७५ फाल्गुन वद्य १ / इ. १७२४ फेब्रु. २८ शुक्र.

स्वस्ति श्री नृप शालीवाहान शके १६४५ पुर्ण : शोभन संवत्सर वद्य फाल्गुण भ्रगुवासर समनी ॥ १ ॥ श्रीडोंजस कुलस्वामि देव : यज पाटिल दाभाडे तळगाव तयाचे

---

+ चवदारि अक्षरें निरनिराळीं व ले. ४७ हूनहि निराळीं.

त्याच मिर्ती मजकुराचें खंडेगाव येसजी दाभाडे देशमुख देह ५ ता पौनमावळ यांस देशमुखी वतनास म्हणून 'करंज' हा मौजा अर्धा इनाम व अर्धा इसापत असा दिला आहे. १ हा मजकूर चालचोबीन.

पुत्र सदैवं : यस पाटिल सामाजि ॥ २ ॥ जयी जन्मला खंडेराव रुढ सेनापती नावं : शांभव पुर्ण वैभव : असे जया कारणे ॥ ३ ॥ कनीष्टी जन्म दोघा जणा : कृष्ण वाचुराव जाणा : वाचुरायाची पत्नी सगुण : तस्य कर्तव्य गमट वापि ॥ ४ ॥ वौंशीं अहे सवाई चाळ ॥ यासि रक्षु श्रीगोपाळ ॥ हा करिल प्रतिपाळ ॥ गुमट आणि वाविचा ॥ ५ ॥

²विहिरीवरचे लिहिले त्याची नकल गुमढाची

---

## घारे व दाभाडे देशमूख–सलोखा

ले. ५१

(श्री) रामसमर्थ

श. १६४६ श्रावण वद्य ७
इ. १७२४ जुलै ३१

सवादपत्र राजश्री रायाजी बिन सोनजी व विठाजी बिन राजजी घारे व सडोजी बिन येसाजी दाभाडे देशमुख तिजाई ता। घारे तपे पोनमावळ यासि माणकोजी बिन कुसजी भोपतराव व दादजी बिन येसवंतजी भोपतराऊ घारे देशमुख ता। घारे ता। मा।र सु।। खमस अश्रैन मयां अलफ संन हजार ११३४ अकराशे चौतीस कारणें तुम्हास सवादपत्र लेहून दिल्हे यैसे जे ता। मा।रि घारे तर्फ देशमुखी देह त्रेतालीस पूर्वापार वतन तुमचे आमचे वाडिलाचे आहे त्यास आमचे वडील वतन अनुभऊन होते तुमचे वडीळ मौजे बेचडवाहाल देह १ येक येथीळ मोकदमी व देशमुखी करून होते त्यास तुम्ही आम्हापासी वतनाचा विभाग मागो लागलेस यामुळें तुमचा आमचा हर्षामर्ष वाढोन दरबार पावतों कजिया लांबला राजश्री पंताजीपंत स्वामीचे शेवसी तुम्ही साकल्यवृत निवेदन करून ता। मा।रचे गोत हुजूर नेऊन गोतावर इनसाफ नेमून दिल्हा गोताने बरहक मनसुभा मनास आणितां तुम्ही तिसरे तक्षीमेचे वडील भाऊ यैसे खरे जालें त्यावरून राजश्री पंती तिजाई वतन तुमचे दुमाला करून वतनपत्र करून दिल्हे व देसकाल(?) आज्ञापत्र सादर केले जे माहालीहून गोत महजर करून देणे त्यावरून राजश्री अंनाजी चलाल नामजाद ता। मा।र व देसक मौजे उरसें येथील मुकामी जमा होऊन कुल कैफत मनास आणून निवाडा केला जे घारे तर्फ देह त्रेतालीस वजा मौजे काले देह १ एक बाकी देह ४२ बेतालीस पैकी तिजाई रकम येकूण देह ११ अकरा तुमचे दुमाले करून महजर करून दिल्हा त्याप्रा। आपण राजी होऊन आत्मसंतोषे आपले वतनपैकी तिजाई रकम बे।। देह ११ अकरा येथीळ देशमुखी तुमचे दुमाला केली असें वौशपरंपरेने अनभवणें वडीळपण तुमचे वौशावळीमुळे होते त्यास आमचे

(शिक्का:)
श्री कान्हो
जी कमाजी घारे
भोपतराव दे
समुख
(नागर चिन्ह)

२ हा मजकूर मोडीत.

वडिली कस्त करून वतन जतन केले यामुळें वडीलपण व सिका व इसापत व इनामती आम्हाकडे पूर्वीपासून चालत आहे त्याप्रा गोताने व राजश्री पंनी आम्हाकडे करार केलें यासि तुम्हा(स) समंध नाही तुम्हास तिजाई वतन घारे तरफ पैकी रकम तिसरा हिसा येकून देह ११ ची ता।।

| मौजे उरसे | मौजे परंदवडी | मौजे वेचडवाहाल | मौजे करुंज | मौजे भडवली |
|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | १ | १ |

| मौजे आढलेबु।। | मौजें धुगाव | मा। कोथूर्णे | मौजे मलवडी | मौजे मोरवे | मौजे वेतले |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | १ | १ | १ |

येकूण देह अकरा गोतमतें आत्मसंतोषें आम्ही तुम्हास दिल्हे यासि आमचे वौसांचा कोण्ही अनसारिखे करून कथला करील तो दिवाणचा गुन्हेगार व गोताचा खोटा असें व त्यास वाराणसीमधें गोहत्या ब्रह्महत्या केलीयाचे पातक असे हे सवादपत्र लेहून दिल्हे सही शके १६७६ क्रोधीनाम सवछरे श्रावण वदुल नवमी(?) रविवासर छ २१ जिलकाद ( [1]मोर्तब सुद षट्कोनी )

---

## खंडेरावांचें ढमाले पाटलास निमंत्रण

ले. ५२ (श. १६७६ भाद्र. शु. ७ इ. १७२४ आगष्ट १५)

श्री

श्री

राजाशाहु स्वा
मि छत्रपति खं
डेराव दाभाडे
सेनापति

( अष्टकोनी शिक्का )

अज्ञापत्र समस्त सेना धुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री खंडेराव दाभाडे सेनापती ता। विठोजी ढमाले मोकदम का। कडुस मु।। खमस असरीन मया अलफ तुम्हासी कितेक प्रयोज (न) आहे तरी देखत आज्ञापत्र भेटीस येणे कोण्ही गोष्टीचा वसवास न धरणे सवेच आज्ञा दिली जाईल जे करणे ते तुमचे मुदे माफीक केले जाईल समाधान असो देणे जाणिजे छ ६ जिलेज ( मोर्तब सुद अष्टकोनी शिक्का )

---

[1] जोडावर दोन दोन मोर्तबचे शिक्के दोन ठिकाणी ह्या मोर्तबात विशेष हें कीं 'च' आधीं असून 'त' नंतर आहे. मोर्तब नव्हे मोतर्ब कागदाच्या प्रारंभीचा श्रीकार फाटल्यांत गेला आहे.

## बटकीच्या खुनाची कबुली

ले. ५३ | श. १६४६ भाद्रपद शु. १२
श्रीशंकर नकल | इ. १७२४ आगष्ट २०

शके १६४६ क्रोधीनाम संवत्छरे भाद्रपद शुध १२ द्वादशी गुरुवासरे ते दिवसी राजश्री खंडोजी बिन येसाजी पाटील दाभाडे मोकदम मौजे तलेगाव प्रात चाकण यांसि गोदजी बिन सयाजी पा। जाधव व राणोजी बिन पिलाजी पाटील जाधव मोकदम मौजे नेरे ता। हवेली प्रान पुणे लेहून दिल्हे जे तुमची बटीक येसी मौजे मा।रा सेत व घर बाधोन राहात होती त्यास तिजपासी मालयेत होती आपल्या मनामधे कुत्रिमबुधी निर्माण जाहाली जे इजला मारून इची वस्तभाव रोख घ्यावे म्हणोन जपणीस लागोन तिजला मारावयासी येक दोघासंगे येसी बटकीचा सरीक गोमाजी कदम व त्याची बायेको नजी दोघे सामल करून येत्नास लागोन येके दिवसी तिजला भर दिल्हा जे तू मालमत्तेसी वस्तभाव घेऊन रानात बसलीस आहेस गावीची वस्ती फुकट आहे आपली वस्तभाव घेऊन तलेगावी जाणे दुसरे दिवसी येसी वस्तभाव व पासीजमता होती ते घेऊन तलेगावास नजीक दमीण सागाते घेऊन तलेगावास चालली आपण गोदजी जाधव राणोजी जाधव रखोजी जाधव ऐसे पुढे मौजे दारउबरे येथील सिवेमधे येऊन वोहालात बैसले येसी बटीक येनाच धरून जिवे मारून रात्रीची वोढून मौजे मजकुरी गावानजिक बुडविली दुसरे दिवसी बोभाट जाहला तलेगावीहून संभाजी सिंदे आले गीर्दनवाई गोत मेलेऊन शोध काढिला तो आकरावे दिवसी खुग वोहलातुन काढून आपले आंगी लाविला समस्त गोताचे साक्षीसी आपण कबूल केला त्याजवरून आपणास गोतान आणून काईल केले आपणास खुगा ...... लागलेस आपणास जाब न होये.

[पुढील बराच मजकूर फाटण्यांत गेला]

बिता। त्रिंबक रघुनाथ रेडे जोसी कुलकर्णी तलेगाव प्रात चाकण

गोही

खुभानजी पा। सिनोले मोकदम मौजे साई ता। हवेली प्रात पुणे नांगर

धावजी पा। वाघोली मोकदम मौजे दारउबरे पा। पुणे नांगर

साबाजी पा। व बाबाजी पा। गराडे मोकदम मौजे धामणे पा। पुणे नांगर

---

## ० कागद गहाण ठेऊन कर्ज

ले. ५४ | श. १६४६ अश्विन शु. १
| इ. १७२४ सप्टें. ८

शके १६४६ क्रोधी नाम संवतछर असीन सुध १ प्रतिपदा वार मगलवार तद्-

दिवसी खत लिखिते धनको नाव खंडेरायें व येस पाटील दाभाडे मो का पारनेर यासि रिणको नाव सोमनाईक बा बादनाईक सोनवणी चापनाईक बा मलनाईक नगरे माहार मेहतेरे का मो आमतकार्ये घेतले मुदल रुा ११२८ येकसे चारा यासि व्याज दरमहा दर सदे रुा ३॥ साडे तीन देऊन यासि मुदत महिनिया ४ च्यार देऊ यासि गाहाण ठेविले तपसील

१ महजर फौजदाराचे व जमीदाराचे दसकते बा माफी हडोला
१ हडोला हिसा हदनाक नगर
१ बहिसा सोमनाक सोनवणी
—
२

१——परवाना असद खानाचे मोहरेचा
२ गोमाई व दारकाबाईची सनद चा हडोला माफ

सदरहु गाहाण ठेऊन रुा घेतले असेत हे मुदतीस देऊन हा रोखा लिहिला सही आधी पैका घेतला मग रोखा लेव्होन दिधला सही

विला दोर नि॥ विला दोर ××××

सोमनाईक सोनवणी

बि॥ भगवंत यादव जोसी कुलकर्णी का पारनेर

गोही

कमत्ल पा॥ मोकदम कावंर को॥ मार
मलोजी पवार पा॥ मोकदम मोजे वाघाळे ता॥ पावल
चिकलम लक्षीमण मल्हार कुलकरणी मोजे पोखरी पा॥ मा॥
कृस्णाजी पाटील पोवार मो मोजे घुणे प्रा॥ मा॥ बि॥
चिकलम लक्षीमण मल्हार कुलकरणी मोजे पोखरी प्रा॥ मार

विसाजी गोविद पा॥ मोजे कादी प्रा॥ मार
रघुनाथ गोविद कुलकरणी किले ताहेराबाद पा॥ मार
येसनाक गाइकवाड माहार मोजे म्हसणे प्रा॥ मा॥

---

## इनाम व इसाफत गांवावरील जिल्हेकडील तिजाई

ले. ५५

श्री

(शक १६४६ आश्विन वद्य १
(इ. १७२४ अक्टो. २? मंगळ

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५१ क्रोधी सवत्सरे आस्वीन बहूल प्रतिपदा भोमवासरे

क्षत्रीयकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी ता। पोनमावल यांसि आज्ञा केली ऐसीजे मौजे करूंज ता। मजकूर हा गाव निमे इनाम व निमे इसापत रा। खंडेराव चिन येसाजी दाभाडे देशमुख देह ५ पांच ता। मजकूर याजकडे आहे तर तुम्ही मौजे मजकूरचा आकार होईल त्यापैकी तिजाई येवज जिल्हेकडील वसूल घेणे जाजती उपसर्ग न देणे या पत्राची प्रति लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयास परतोन +देणे जाणिजे +लेखनालंकार ( मर्या देयंरा जते )

१ २

+हजूर +सां +सां
+निर्वास +मंत्री +सरकार
+बारसुद +सुरुसुद +बार +बार +बार

---

## करुंज—चा मोबदला मलवंडी

ले. ५६

श्री

{ शक १६४७ भाद्र. वद्य ८
{ इ. १७२५ सप्टं १८

॥ छ. मा। अनाम देशमुख व देशपांडे ता। पोनमावल यांसी पंताजी सिवदेव सुा। सीत असरीन मया व अलफ रा। खंडेराव चिन येसाजी दाभाडे देशमुख देहाये ता। मजकूर यांसी मौजे करूंज हा गाव पेसजी निमे इनामत निमे इसाफत करून दिल्हा होता त्याचा मुबदला मौजे मलवंडी ता। मजकूर हा गाव दिल्हा आहे याप्रमाणे करार करून सनद सादर केली असे तरी मौजे मजकूरची निमे इनामत इसाफत याजकडे चालवणे जाणिजे छ २१ मोहरम (गोल मोर्तब सुद शिक्का)

( श्री ० मार्गवचरणी तत्पर पंताजी शिवदेव निरंतर )

सुरूसुद

---

१ बाजीराव बल्लाळ पेशव्याचा कोयरी आकाराचा शिक्का.

२ श्रीनिवास परशराम प्रतिनिधीचा अष्टकोनी शिक्का.

+१३ हि अक्षरें निराळीं

त्याच मितीचें व त्याच मजकुराचें रायाजी सोनजी व विठोजी रायाजी घारे यांच्या बेचरवाहाल गावाबद्दलचें पत्र आहे तें घेतलें नाहीं.

## कर्ज व त्याची फेड

ले ५७. (श. १६४८ आषाढ वा। ४
नकल (इ. १७२६ जुलै ७

राजश्री .......... दाभाडे गोसावि

छ. अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्य श्री खंडेराव दाभाडे सेनाखासखेल लस्कर रामराम विनंति सु॥ सबा आसरीन मया व अलफ तुमचे कर्ज स्वारी मजकुरी होते त्याचा हिसेब करून (तुम) चे रु॥ ६५००० पासष्ट हजार बाकी राहिली ते सदर रु॥ तुम्हास देऊ म्हणुन काये लि॥ छ १७ जिलकाद हे विनंति मोर्तबसुद

*सु॥ तलेगाव सन इ + + + + + मया व अलफ थालनेर माहाल फौज ...... याजकडे दोन तक्षिमा व रा॥ ... याजकडे येक तर्क्षीम होती ती तावजी जगथाप याजकडून दूर करून देखील चौथाई + + + + सन सबा ता॥ सन मजकुरी सांडस पिसाळ व नासीकची सेही व दाभाडी व थालनेर येथील चौथाईचा येवज सदरहू माहाल देऊन सन पासष्ट हजार रुपयाचे काढून घेतले गु॥ दामाजी खडेराव व नरसो त्रिमल याचे गुजारतीने खत फाडून मातुश्री उमाबाईचे हती दिल्हे

---

## खातगांव, कान्हूर इत्यादि सात तर्फांची सरदेशमुखी

ले. ५८ (श. १६४८ मार्ग. शु. २
(इ. १७२६ नोवें. १४

श्री

श्री
राजाशाहू न
रपती हर्षनीधा
न बाजीराव बल्ला
ळ प्रधान

छ. मा। अनाम देशमुख व देशपांडे ता॥ वसुंदे पा॥ पारनेर यास बाजीराव बलाल प्रधान सुहूर सन सबा आसरीन मया व आलफ रा॥ खंडेराऊ बिन येसाजी दाभाडे याजवर राजश्री स्वामी कृपालू होऊन ता॥ मजकूरची सरदेशमुखी इनाम आलाहिदा पत्रे सादर केली आहेत तरी तुम्ही ता॥ मजकुरचा आकार होईल त्याची सरदेशमुखी रयेन नि॥ दर सदे दाहोत्रा प्रमाणे देत जाणे या पत्राची प्रती लिहून घेऊन

---

*हा कर्जाच्या परतफेडाचा मजकूर इ. १७२९ नंतर लिहिलेला असला पाहिजे. कारण, खंडेरावाचें नांव ह्या मजकुरांत नाहीं व उमाबाईचें नांव आहे पण निवर्तलि सोम्हटलेलें नाहीं.

आसल पत्र भोगवटीयास परतोन देणें जाणिजे छ १० रबीलावल पा। हुजूर ( लेखन सीमा बदामी शिक्का )

---

## बाजीरावांचें जुन्नर सुभेदारांना पत्र

ले. ५९ | श. १६४८ मार्ग. शु. २
श्री. | इ. १७२६ नोव्हें. १४

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री कृष्णराव माहादेव सुभेदार व कारकून प्रांत जुनर गोसावी यासी

सेवक बाजीराव बलाल प्रधान नमस्कार सुहूर सन सबा आसरीन मया व अलफ रा। खंडेराव बिन येसाजी दाभाडे यांजवरी राजश्री——स्वामी कृपाळू होऊन ता। चाकण व ता। निघोज प्रांत मजकूर या दोन्ही तर्फाची सरदेशमुखी इनाम देऊन आलाहिदा जमीदारांस पत्रें सादर केलीं आहेत. तरी तुम्ही ता। मजकूरचे सरदेशमुखीचा वसूल दर सदे दाहोत्रा प्रमाणे रयेत निसबत मा।रनिलेकडे देत जाणे या पत्राची प्रती लेहून घेऊन आसल पत्र भोगवटीयास परतोन देणे जाणिजे छ १० रबिलावल पा। हुजूर ( लेखन सिमा ) वाटोळा शिक्का

---

ले. ६० | श. १६४९ कार्तिक
श्री | इ. १७२७ आक्टो. नोव्हें.

यादि येवज माहाल पोता ... राजश्री राऊ सेनापती सु॥ समान अशरीन मया अलफ येवज सचीस स्वारीस रुपये घरी खर्चास रुपये

२५ छ १७ रावलोवल ता। छ ३० रबिलावर

५० छ ९ जमादिलावर मोहर ४ दर मोहोरास रु॥ १३

प्रा। यो। रुपये

+ दोन्ही अक्षरें भिन्न. पत्रावरील बाजीरावाची मुद्रा प्रारंभीच बाजूस आहे. व अशीच दुसरी सहा पत्रें सातगांव, कान्हूर, हवेली पारनेर, कोडगांऊ, निघोज, थडीवडजो ऊर्फ ताहुराबादच्या देशमुख–देशपांड्यांना लिहिलेलीं आहेत. निघोजच्या पत्रावर 'सरकार जुनर' म्हटलें आहे आणि ताय(ह)राबाद व सातगावच्या पत्रावर 'प्रांत हरिश्चंद्र' असें विशेष लिहिलें आहे. ह्या सर्व सातहि तर्फा परगणे पारनेर मधीलच आहेत. ह्या म्हणजे वसुंदेच्याच पत्रांत 'रयेतनिसबत' हा शब्द अधिक आहे आणि सातगांव व ताय(ह)राबाद संबंधीच्या पत्रांत 'अलाहिदा पत्रें' म्हणतांना 'अलाहिदा राजपत्रें' असें सांगितलें असून 'देखील जकात' हें सातगांवच्या पत्रांत विशेष लिहिलेलें आहे.

२५ छ ११ रजब रुा ३५ पैकी वजा समाराधना रुा १०
बाकी खर्चाच खासदारपैकी यैवज ... ... ...

१०८

३०० कार्ती(क) सुध सप्तमी लस्करास जातेसमई घरीची बेगमीस
५०० मो गंगातीर घरीचे बेगमीस
८५॥ रुपये २०० पैकी गुा म्हलोजी बकरा धर्मादाय रुा
११४॥ बाकी रुाये खर्च नाइकास

९९३॥

---

## बाजी संभाजी दाभाडे हे स्वामीच्या राज्यांतील एकनिष्ठ सेवक

ले. ६१ श्री (श. १६४२ पौष शुद्ध १ / इ. १७२० डिसें. १९)

१

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४७ शार्वरी संवछरे पौष शुध प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रियेकुळावतंस राजा शाहू छत्रपति स्वामी याणि बाजीराव बिन संभाजी दाभाडे

२ ३ यासि दिल्हे इनामपत्र यैसे जे तुम्ही स्वामीच्या राज्यातील येकनिष्ट शेवक तुमचे चालवणे स्वामीस अवशक जाणोन स्वामी तुम्हांवरी

रुपाळू होऊन मौजे जाभोल[४] ताा नाणे मावल प्राा मावल हा गांव कुल बाब कुल कानू देखील हाली पटी व पेस्तर पटी खेरीज इनामदार व हकदार तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम करून दिल्हा असे तरी तुम्ही मौजे मजकूर चतुःसीमा पूर्वमर्यादेप्रमाणे आपले दुमाले करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम अनभऊन सुखरूप राहणे +लेखनालंकार मर्या देयंरा जते (असा षट्कोनी शिक्का)

+रुजू सुरु +सां
+निवीस +मंत्री

+तेरीख २९
+सफर सुा इहिदे आशरैन

+बार सुद +सुरु सुद +बार +बार[४]

---

१ शाहू छ. ची अष्टकोनी मुद्रा, २ बाजीराव प्रधान व ३ श्रीनिवास परशुराम प्रतिनिधी यांच्या मुद्रा. + अकराहि अक्षरें भिन्नभिन्न. ४ ह्याच मितीचें ह्याच जाभोल गावाबद्दल व तेथील मोकदमास लिहिलेलें दुसरें एक आज्ञापत्र आहे. मजकूर एकच असल्यामुळें येथें घेतलें नाहीं. त्यावर छ० ची मुद्रा नाहीं. फक्त प्रधानप्रतिनिधींच्या आहेत. ह्याच जाभोळ गांवचे मोकदमास लिहिलेलें राजशक ४८ मधील दुसरें एक पत्र आहे. तेंहि इनाम वसूल सुरळीत देणें अशाच मजकुराचें असल्यामुळें घेतलें नाहीं. त्याची मिति श. १६४३ कार्तिक वद्य ५, तारीख इ. १७२१ आक्टो. २८, मंदवार अशी आहे. जंत्रींत शनिवारीं १४ घ. ५९ प. चतुर्थी आहे. ह्यामुळें शनिवार प्रमाण धरून त्या पत्राची तारीख दिली आहे.

# तंटा तोडण्यासाठीं दिल्लीची वारी

ले. ६२ श्री { श. १६४५ / इ. १७२३

माहाराजाधिराज राजेश्री——राऊ सेनापति साहेब

॥ द श्रीमत प्रौढप्रतापदिनकर खंडेस्वरी सदायेशवंत निराधारियांसी आधार धर्ममूर्ति गोब्राम्हनप्रतिपालकया विराजित माहाराज राजेश्री —— माहाराजांचे सेवेसी शामजी मुधाजी कुलकरर्नी का। उक्षर अनेक आर्सीर्वाद विनति उपरी माहाराजे पत्र पाठविले ते सिरसा वंदिले रा। सोमववंसी सुभेदार त्यांचे त्यांस दिल्हे यावरी तेही आज्ञा केली की हिरोजी कदम वगैरे रा। मोरोपंताबराबरी येतो म्हनऊन लिहिले आहे त्यांबराबरी ते न आले म्हनजे तुम्ही सुखी जाने याकरिता न पुसत तरी (येता ×××) त्यावरून चीयजी व रा। खंडोपंतास सेवेसी पाठविले आहे हे जबानी विनति करतील त्यावरून कलों येईल तरी रा। सुभेदारांही साहेबांच्या कार्यानिमित्य हिरोजी कदम वगैरे त्यास पांच सात वेलां लिहिले त्यांस यांही लिहिले कीं शामजीपंतास रा। रायांही आपले हातीं दिल्हे आहे की पंचायती करावी तरी तुम्ही तुम्हापासी काये दस्तायेवज अस्ती ते कुली घेऊन येने पंचायेत वाजवी करून त्यावरून त्यांच्याने वादास रूबुरू येवत नाही का कीं ते गुमास्ते खरेखुरे आहेत त्यांपासी आहे काये त्यांसही पुरते उमजलें की या राज्यात रा। सोमवंसी यांचा आस्रा होता तो वारला यावरी आता आबोजी देशमुखाचा आस्रा धरून दैवाचे दिवस घालितात जो दिवस गेला तोच खरा अखेर पाटिलकी देशमुखी काही करीत नाही हे त्यांची निशा जाली आहे त्यासी तेथें साहेबाचा अमल सुखरूप बसावा यांचा आस्रा त्यांस काडीचा नाही यांसही कलले की ते मादरचोद खोटे आहेत त्यासी आबोजी देशमुखावरीही पातशाहाची इतराजीच आहे मनसबा कुली काहाडिली पंचस ही तेवढी ठेवली आहे आवरंगाबादेस यास अैयेवजखानानेही रुपये मबलग लाविले आहेत सुखी रा। जनाजी वागदरे त्यास आज्ञा करावी तो अमल बसवतील अबोजी देशमुखासही सुखी लेहावे तो बल करील आज्ञेप्रमाने अपन दिलीस जाऊन आबोजीस हुकूम पाठऊन त्याच्या वकिलाचे लिहिलेही पाठऊन तो एकंदर मुजाहिम न होये ते केले जाईल हे आपण खातरखा करून परतु माहाराज चित्ती धरीत (होते) तेथे जनाजी वागदरे अगर हर कोन्ही पाठऊन टाकूनठकून आमल करावा कारादी काये म्हनऊन लेहावें चिरंजीव जबानी सागता कलो येईल तरी विनति उदास न कीजे अनी रा। सुभेदारास एक पत्र लेहून अपनास तेथे बोलावने एक पत्र त्यांप्रचीत आम्हासही लिहिने इतकिया उपरी गैई करायाचे कांम नाही हिरोजीचा मामिला तेथे फार अलवनी । जाला आहे साहेबीं बेवसवास चित्ती धरून ठाकूनठकून अमल बसवावा एध(थ)वा ते कोन्ही जेथें प्रसंगास येतील तेथे

अपन त्यास पुरऊन यावरी येथे रा। सुभेदाराही लेकराकारने दुपते म्हैसगाये दिल्ही आहे ते आता उडाली तरी येक म्हैस दुपती अपनास दिल्ही पाहिजे रा। नागोजीपंतास येखादे कमाविसदाराचे हाती देऊन येखादे ठाई ब्राह्मन अनास लाविले पाहिजे अपले सिरी उपकार होईल चिरंजीवाउ लवकर वाटेस लाविले पाहिजे ते येथें आल्यावरी आपनास तेथें आले पाहिजे सरकारच्या हरकाराबराबरी[1] रा। सुभेदारा लेहून म्हनजे आपले येने तेथें होये खर्चाविचास काही दिल्हे पाहिजे कुटुंबही येथेच आहे तरी आपन दिलीस जाऊन आबाजीचे निवारन करून परतु अपन चिंता धरा हे उतम आहे बहुत काये लि।। रुपा असो दीजे हे विनति

---

## एक यादी

ले. ६३ { श. १६४५ / इ. १७२३ }

श्री

यादी कठापूर

५०० मु।। चंदनगडची माच
 १ कुसाजी
 १ जाणोजी
 १ माणाजी
 १ तुळाजी
 १ बहिरजी
 १ अंताजी लक्ष्मण कुलकरणी
 ६ याही घेतले
५०० मु।। पांडवगड मातुश्रीकडून देविले
३०० मु।। वोझर रा। परशरामपंत याचे वरातदारानी अडविले त्याजबदल
२५० सापचे मुकामी वरातदारानी पाटील कुलकर्णी नेले होते ते सोडुन आणावयासि दिल्हे

१५५०

याखेरीज बुधीहून सेताचा मळा दिल्हा त्याचा हिसेब आलाहिदा भोईजवर व सोलसीचे मुकामी नख्त दिल्हे त्याचे कागदपत्र होते ते चंद्रसेनाचे दंगियात गेले

---

१ येथून पुढील मजकूर पत्राचे पाठीवराल मजकुराच्या प्रारंभीं समासवजा मोकळ्या जागेंत तिरप्या ओळी काढून लिहिला आहे.

# बुध–कठापूरकडे मोगली धामधूम व दाभाडे कठापूरच्या पाटिलकीचा अंश खरीदतात

ले. ६४ श्री { श. १६४६ श्रावण वद्य २
{ इ. १७२४ जुलै २६

महजर बतेरीख १६ माहे जिलकाद सुहूर सन खमस आशरीन मया व अलफ बिहुजूर हाजीर मज्यालसी बितपसील

१/९ मो। नऊ चंद रास

[ या पुढें पांच सहा बोटें कोरी जागा ]

राजमुद्रा

राजश्री श्रीनिवास परशराम पंडित प्रतिनिधी

० श्री ⌣
श्री आई आदिपुरु
ष श्रीराजा शाहु छत्रप
ति स्वामि कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनिधि ( अष्टकोनी सिक्का )

सुभा प्रांत वाई

| स्वराज्य | खालसा |
|---|---|
| राजश्री गणेश माहादेव सुभेदार | राजश्री गणेश माहादेव नामजाद पा। मार |
| | श्रीनिवास येसाजी मजुमदार |

० ⌣
श्री राजाशा
हुचरणि तत्प
र माहादेवत (अष्टकोनी शिक्का)
नुज गणेश
निरंतर

[ फार्सी शिक्का ]

[ पुढें एक वीत कोरी जागा ]

श्री शाहूजी राजे भोसले
देशमूख पा। मजकूर

श्रीशंकर
श्रीशाहुजी रा
जे भोसले देस
मुख प्रा। वाई
[ नांगराचें चित्र ] ( अष्टकोनी शिक्का )

भगवंत सामराज व गिरमाजी झुंगो देशपांडे पा। मजकूर

[ येथें ७॥ विती कोरी जागा ]

या विद्यमाने स्वास्ति श्रीशालीवान शके १६४६ क्रोधीनाम सवछरे श्रावण वदी द्वितीया तदिनी खंडेराऊ बिन येसाजी दाभाडे पाटील तकसीम चौथी मौजे कटापूर सा कोरेगाऊ पा वांई यासी लेहून दिल्हा महजर ऐसा जे तुम्ही माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी किले साताराचे मुकामी विनति केली की पूर्वी मोगलाची धामधूम या प्राते बहुत जाली तेव्हा आपला काबिला मौजे बुध कर्यात ललगुण येथे ठेविला होता ते समई कुसाजी व मानाजी व हिरोजी व जानोजी व नरसोजी व तुलाजी केंजले पाटील मौजे मजकूर हे आपणाकडे चाकरीस होते ते वलखीने बुधाहून आमचा काबिला घेऊन मौजे मारास आले आम्ही तेथे नांदत होतो ते प्रसंगी गावास दिवाणचे देणे जबरदस्त पडले गावीचि लागवण थोडके त्याजवरी दिवाण टका उगवेना बाकीदार गाव जाहला याकरिता कर्जावामाच्या तलाशास पाटील लागले त्यासी कोठे कर्जवामहि मिलेना मग कुल आवघे भाऊ येकत्र होऊन विचार करून आमच्या गला पडले की तुम्ही आमचे भाऊ होऊन आम्हास आपले पदरी घेऊन आम्हास दिवाणच्या टकियाच्या तगादा लागला आहे त्याणे प्राणसंकट जाहालें आहे त्याजपासून आम्हास सोडवणे आम्हीं आपले अत्मसंतोषे खुशरजावंदीने चवथी तकसीम पटेलगी तुम्हास देतो म्हणऊन बहूतच गला पडले त्यावरून चवथे तकसीमेची किमत पटेल माराचे रजावंदीने पधरासे रुपये करार जाहली ते किमत सदरहू पधरासे रुपये त्याचे पदरी घातले त्याणी आम्हास खरीदी-पत्र लेहून दिल्हे ते खरीदीपत्र त्रिंबक चिंतामण कुलकर्णी मौजे मार यासी अम्ही आपले चौथे तकासिमेचे पटेलगीचे मुतालिकीस ठेविले होते त्याजवल ठेविले होते त्रिंबक चिंतामण भ्रष्ट होऊन गेला त्याबराबरी खरीदीपत्र गेले याकारिता महजर जाहला नाही तरी स्वामींनी रुपाळू होऊन परगणे मजकूरच्या सुभेदारास व देशमूख व देशपाडे यासी अज्ञा करून आपले दुमाला पटेलगी करून महजर करून देविला पाहिजे म्हणऊन विनति केली त्यावरून माहाराज राजश्री स्वामींनी माहालच्या हकिमास व देशमूख व देशपाडे यासी आज्ञा केली की मौजे कटापूर येथील पाटील सुभा आणून खंडेराऊ दाभाडे याची हकीकत मनास अणून विले लावणे म्हणून आज्ञा आज्ञेप्रमाणे राजश्री सुभेदार व देशमूख व देशपाडे पा मार याणी मौजे मारच्या पाटिलास सुभा बोलाऊन आणिले आणि त्यास विचारिले कीं खंडेराऊ दाभाडें म्हणतात की तुमच्या वडिलानी आपल्या गला पडोन पधरासे रुपये किमत घेऊंन चवथी तकसीम पटेलगी दिल्ही आहे त्याचें खरीदीपत्र त्याणी लेहून दिल्हे होतें ते त्रिंबक चिंतामणी कुलकर्णी मौजे मजकूर यासी आम्ही आपले चवथे तकसीमेचे पटेलगीचे मुतालिकीस ठेविले होते त्याजपासी खरीदीपत्र ठेविले होतें तो भ्रष्ट होऊन गेला त्याचराबरी खरीदी-पत्रही गेले तरी हाली आपणास मजहर करून दिल्हा पाहिजे ऐसे म्हणतात तरी याची हकीकत काये आहे ते सदरेस जाहीर करणे म्हणून हुकूम केला त्यावरून पटेल मारानी

विदित केले की पेसजी मोगलाची धामधूम या प्राते बहुत जाहाली ते प्रसगी कचिला-सहीत खंडेराऊ दाभोडे आपलें गावी नांदत होते ते समई आमच्या वडिलास दिवाण देणियाचा तगादा बहूत लागला गावसमधे टकियाची उगवणी होईना याकरिता कर्जवाम मेलऊन द्यावेसारिखे जाहाले याकरिता कर्जवामाचा तलाश केला परतु कोठे कर्जवामही मिलेनासे जाहाले तेव्हा याच्या गला पडोन यासी चवथी तकसीम खेरीज वडीलपण देऊन याजपासून टका घेऊन दिवाणचा तगादा वारिला आणि खरीदी-पत्र यासी आमच्या वडलानी लेहून दिल्हे ते त्रिबक चितामण भ्रष्ट होऊन गेला त्याजबराबरी गेले म्हणऊन विदित केले त्याजवरून केजले पटेल यासी सदरेचा हुकूम जाहला की खंडेराऊ दाभाडे यासी आपल्या वडलानी खेरजि वडीलपण चौथी तकसीम पटेलगी विकत देऊन त्याजपासून टका घेऊन दिवाणचा तगादा वारिला खरीदीपत्र लेहून दिल्हे होते ते कुलकर्णी मजकूर भ्रष्ट होऊन गेला त्याबराबरी गेले म्हणऊन तुम्ही सदरेस जाहीर केले तरी तुम्ही ज्याप्रा जाहीर केले त्याप्रमाणें हाली खरीदी-पत्र तुम्ही खंडेराऊ दाभाडे यासी लेहून देणे म्हणऊन सदरेचा हुकूम जाहला त्यावरून हाली खरीदीपत्र लेहून दिल्हे वितपसील [ यापुढें खरेदीपत्राचा उद्धार केला आहे. ] येणेप्रमाणे खरीदीपत्र लेहून दिल्हे आणि सदरेस केजले पाटील मजकूर याणी विदित केले की आपल्या वडलानी पधरासे रुपये किमत घेऊन चवथी तकसीम पटेलगी काली व पाढेर देखलि हकलवाजिमा खेरजि वडीलपण आत्मसंतोषे विकत दिल्ही आसे याचा महजर खंडेराऊ दाभाडे यांसी करून दिल्हा पाहिजे म्हणून विदित केलें त्यावरून मनास आणिता तुम्ही जे हकीकत सागितली त्याचप्रमाणे केजले पाटील याणी हकीकत सागोन खरीदीपत्र लेहून दिल्हे त्यावरून दिसोन आले की तुम्ही माल धणियाचे रजावंदीने रास्ती किंमत देऊन चौथी तकसीम पटेलगी खरीदी करून घेतली येसे मज्यालसीचे मते जाहले त्यावरून तुम्हास महजर करून दिल्हा असें तरी तुम्ही मौजे मजकूर आज रकम चावर पचेतालीस पैकी वडीलपणाचे चावर पाच बाकी चावर चालीस पैकी चौथी तकसीम चावर १० दाहा देखील काली व पाढेर वतन अनभवणे तुमचे दुमाला केले असे तरी तुम्ही खेरीज वडीलपण चौथे तकसिमेचा हक व इनाम व लवाजिमा बाजे उत्पन खाऊन सदरहू दाहा चावराची पटेलगी लावणी उगवणी करून वंषपरंपरेने सुखरूप वतन अनभवणें पेस्तर कालकला तुम्हासी व तुमचे वंषपरपरेसी केजले कोणी कथालियासी उभे राहिले तरी ज्याचे नर्फेतील उभा राहील त्याणे तो वारावा तुम्हासी व तुमचे वंषपरंपरेसी कथला केजलियासी करावयासी आर्थेआर्थ समध नाही जो कोणी तुम्हासी व तुमचे वंषरंपरेसी कथला करील तो दिवाणचा गुन्हेगार गोताचा अन्याई हा महजर लेहून दिल्हा सही महजर वली सुमार वितपसील

| | |
|---|---|
| येन वली च्यार रकाने | जिल्हेच्या वली |
| १८४ | २२ |

येकून दोनीसे साहा वली रास हा लेहून दिल्हा महजर सही [1]मोर्तब सुद ( मोर्तब सुद )[2]

---

## दाभाड्यांच्या इनाम गावास वसुलाचा तगादा

ले. ६५ | श्री | श. १६४७ चैत्र शु. १३ / इ. १७२५ मार्च १५

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री अंताजी बलाल नामजाद व कारकून ता। पौनमावल गोसावी यासि

सेवक पंताजी सिवदेव नमस्कार सु॥ खमस असरीन मया अलफ मौजे करूज ता। मार हा गांव राजश्री खंडेराऊ दाभाडे देशमूख देहाये ता। मार याकडे इनामत इसापत आहे ऐसे असतां रा। रामचंद्र माहादेव लखुमण विश्वनाथ गांवास वसुलाचा तगादा करितात म्हणून कलो आले तरी पेस्तर सालापासून त्यांची दखलगिरी गांवात होऊ न देणे येक रुका त्यास वसूल न देणे जाणिजे छ ११ रजब मोर्तब सुद[3] (गोल शिक्का)

सुरू सुद[3]

---

## काळी–पांढरीची वाटणी

ले. ६६ | श्री | श. १६४७ श्रावण वद्य ३ / इ. १७२५ आगष्ट १५

राजश्री खडेराऊ दाभाडे पाटील मौजे कठापूर गोसावी यासि

॥ई अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य——श्रो मोकदम दुतरफा मौजे मजकूर

---

१ हा मजकूर निराळ्या वळणाचा. कागदास ८ जोड असून जोडगिरीवर दोन दोन मोर्तब उठविले आहेत.

२ कठापूरचे पाटील घराण्यांतील नऊ विद्यमान व्यक्तींनीं याच आशयाचें पण सु. ११२४ सफर १५ (श. १६४५ कार्तिक वद्य २, इ. १७२३ नोव्हेंबर ३) चें खरेदी-पत्र लिहून दिलें आहे. त्या पत्रांत या महजरावर असलेले शिक्के व शिक्केकरी आहेत.

३ अशाच मजकुराचें व ह्याच मितीचें पंताजीपंताचें करूजच्या मोकदमास लिहिलेलें 'आज्ञापत्र' आहे. त्यावर प्रारंभीं अगदीं वरच पंताजीची पांच ओळींची मुद्रा आहे. आणखी दोन पत्रें रामचंद्र महादेव यास व पंत प्रधान यांसही लिहिलेलीं आहेत. त्यांवर पंताजीचा शिक्कामोर्तब नसून फक्त श्रीकाराजवळ 'भार्गवराम' आणि शेवटीं 'हे विनंती' व 'विज्ञापना' एवढेंच पंताजीपंतानें स्वहस्तें लिहिलेलें आहे. पंतप्रधानांस लिहिलेल्या पत्रांत 'स्वामी कथला करितात तरी हे गोष्टी उचित नव्हे वतनाच्या कार्यास आपण खलेल करावे हे काही उतम नाही' असें बजाविलें आहे.

रामराम विनति सुा सीत असरीन मया अलफ मौजे मजकूरची मोकदमी तुम्हास खेरीज वडीलपण चौथी तकसीम चावर १० दाहा दिल्हे त्याची वाटणी कालीची दिली पाढरीची वाटणी चापजी नाईक ढमाल्ल याचे पदरी येणेप्रा घालून बितपसील

| | |
|---|---|
| ता माणकोजी बिन कुमाजी पा. | ता सकराजी बिन साबाजी पा |
| निमे तापैकी तकसीम पाचवी | निमे तरफ पै [ कीं ] चौथी तकसीम |
| देऊन कलम | देऊन कलम |
| १ | १ |

येणेप्रो दुतरफा गावास जाऊन तुमचे पदरी घालून यास अतर करून तरी श्री—चे सफत असेत बहूत काये लिहिणे छ १७ जिल्हेज हे विनति

[ नांगराचें चित्र ]

---

## कुवर बहादुर व शाहूचे सरदार यांची चकमक

ले. ६७

{ श. १६४९ कार्तीक वद्य १२
{ इ. १७२७ आक्टो. ३०

( पाच ओळी फार्सी मजकूर )

बायेस तहरीर ई सितूर आंकी वाके बतारीख २५ माहे रावल सन ९ जलूसवाला मुताबक सन ११३७ फसली नायेब शाहमत पनाह कुंवर बाहादर अज ठाणें पा आंकोले सा संगमनेर सुबे खुजस्ते बुनयाद येथून देहाये तपे पठार पा कोंतूल सो जुनर माहाल जागीर सा आली येथे जात होते सबब की पेशजी खंडोजी दाभाडे वगैरे नासरदार संगमनेरावर येऊन उतरले ते वखती दरमियान राह देहाये तपे मार ताख्ततारा ज करून बंद व मवेसी रयेतीची धरून तमाम लूट करून घेऊन गेले अंजी सबब त्यावाये देहाये मार तफर्का व परागदा जाली आहे त्याची तसले करून मकानावर आणून आबाद करावयाबदल जात होते तो येक बयेक मौजे वांसेरे पा आकोंले तेथील घाटीनें कालोजी भोसला व राणोजी भोयेटा वगैरे नासरदार पाच हजार स्वार सातारियाकडून मौजे थुगाव बुा पा मार कसबाहून येक कोस मुफासला आहे तेथें येऊन उतरले नायेब मारासी व नासरदाराचे फौजेसी नीम कोसाचा तफावत होता मुफसद मारानी तीनचारसे स्वार नायेब माराच्या मुकाबलियावर पाठविले चार घडी लडाई जाली तीन घोडी मकहूराची गोलियानी जखमी जाली बयेकबाल सरकार आली मुफसदास तंबी करारवाके पोहचावून कुल स्वारांचा जमाव होता त्यामधें नेऊन घातले त्यावरी कुल फौज सिवारामधें व देहातमधें आवारा होऊन निस्फ सिवार कसबे मार व मौजे थुगो बुा वगैरे देहात बमोजिब ता जेल जोरी व बाजरी खलवाडीमधें

जमा जाली होती ते व सिवारामधें उभी होती ते कुल कापून नेली व रबी जुजकिस्तकार जाली होती त्याची पायेमाली केली व मवेसी गुरे व घोडी मोकदमाची व जेवर वगैरे मता लूट केली व कितेक गावचे मोकदम व मुजारी बंद धरून खानदेशाकडे घेऊन गेले दोन रोज मौजे भोजापूर व देवठाणच्या सिवारामधें मुकाम केला होता रयेतीवर तादी बहूत केली महसूल खरीफ व रबी कुली तलफ केला अजी सबब दर माल वांजिब सरकार नुकसान तमाम जाले यास जे कोण्ही इतला राखत असतील त्यानी मोहर गोही महजरावर करणें देहे बिता। देहे १५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कसबे मा।र[1] | मौजे परखतपूर | मौजे थुगौ बुा | मौजे वांसेरे | मोजे थुगौ खुर्द |
| १ | १ | १ | १ | १ |
| मौजे ताभोल | मौजें कुंबे (फल) खुर्द | मौजे कलस खुर्द | मौजे देवठाण | मौजे वीरगौ |
| १ | १ | १ | १ | १ |
| मौजे भोजापूर | मौजे दापूर(चूर) | मौजे पिपलगाऊ नि।। | मौजे हिवरगौ | मौजे चास लंग |
| १ | १ | १ | १ | १ ० |

तेरीख २७ माहे मा।र सन इले

( कागदाच्या उजव्या बाजूस प्रारंभींच आडवा असलेला मा।र )

+शाहिदी देशमुखानी व देशपांडिया(नी)

| | | | |
|---|---|---|---|
| +सयाजी देसमूख (फार्सी गोल सिक्का मधे नांगराचें चित्र ) | +त्रिंबकजी देसमूख [2] त्रिंबकजी ( नांगराचें चित्र ) देसमूख (गो. सिक्का) | +नारोजी देसमूख नारोजी बिन ( नांगर ) देशमूख | येमाजी देसमूख+ येसाजी ( नांगर ) देसमूख (गोल सिक्का) |
| +सदासी गोदजी दे(शमूख) [1]गोदजी (नांगर) दे(शमूख) त्रिंबक ( गोल सिक्का ) | जनार्दन देशपांडिये | निबाजी | उधो शामजी देसपांडिये |

(देशमूखाचें नांव देशपांडे यांनीं लिहावयाचें असल्यामुळें देशमुखाचें नांवाखाली देशपांडे यांचें नांव आहे व तीं दोन्हीं हस्ताक्षरें एकच आहेत. )

---

१ आकोले. २ हा शिक्का उलटा उठला आहे. + हस्ताक्षर वेगवेगळें.

## वडगाव बुद्रुकच्या पाटिलकीचें वतनपत्र

ले. ६८ {श. १६५० भाद्र. व. २ सोम
श्री {इ. १७२८ सप्टें. ९

० श्री ‿
प्रतिपच्चंद्ररेखे
व वर्धिष्णुर्विश्ववं (वर्तुळी व सुंदर मुद्रा)
दिता शंभु छत्रप
तेर्मुद्रा रामसूनो
र्विराजते

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५५ कीलक नाम संवत्सरे भाद्रपद बहुल द्वितीया इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणीं खंडेराव दाभाडे चिन

| | | |
|---|---|---|
| ‿ श्री ० | श्री आई आ | येसाजी दाभाडे देसाई |
| (को राजा शंभु छ | दिपुरुष श्री राजा (अ | ता। हवेली कोल्हापूर |
| च त्रपति हर्षनिदा | शंभु छत्रपती स्वा ष्ट | व पाटील मौजे वडगाव |
| री) न दामोदरसुत चि | मी रुपानीधी तस्य को | बु॥ ता॥ मा।र यांसि |
| मणाजी पडित | रुष्णाजी परशुराम नी) | दिल्हे वतनपत्र ऐसे जे |
| मुख्य प्रधान | म प्रतीनीधी | रा॥ बाजी दाभाडे दि॥ |

मा।र याणी किले पनाले मुकामी स्वामीसंनिध (येऊन) विनंती केली कीं मलगौडा चिन चेनगौडा इवन मलगौडा पाटील मौजे मजकूर याणें आम्हाजवल येऊन विदित केलें की दुष्कालाकरितां आपली राडापोरे मरतात भक्षवयासी अन्न नाहीं पंधरा दिवसपर्यंत अन्न मिलालें नाहीं तेव्हां देवेंद्रागेरी महंत याचे घरी जाऊन अन्न खाइले पुढें जीव वाचावयाचा अर्थ दिसत नाहीं तुम्ही देसाई आहा आपण मौजे मजकुरची पाटिलकी व कारभार कुल काइदे तुम्हास देतों निमे इनाम व निमे पालक मात्र आम्हीं पांच जण भाऊ मिलोन खाऊन राहातों पाटिलकी देसाई याची ऐसे पत्र करून देतों म्हणून पाटिलाने विदित केलें आणि समस्त वतनदार देसाईं देशकुलकर्णी पनाला व आवातर पाटील चौगुले बाजे वतनदाराचे साक्षनिसी सिके नागर करून क्रयपत्र करून दिले आहे त्याप्रमाणें स्वामींनी क्रयपत्र मनास आणून त्याप्रमाणें सनद सादर करावी म्हणून बाजी दाभाडे याणी विदित केले त्यावरून मनास आणिता तुम्ही देसाई स्वामीच्या राज्यातील पुरातन येकनिष्ट सेवक आणि वतनदार प्रमाणिक तुमचे चालवणें स्वामीस अगत्य आणि मलगौडा पाटील याणे दुष्कालात मुले माणसे अन्नाविण मरों लागली तेव्हां तुम्हापासून दोनसे रुपये घेऊन पाटिलकी तुम्हास

आत्मसंतोषें पाटिलकी व कारभार कुल काइदे हक व दईजमा व मीठकुडो .... पान मान तश्रीफ होलीची पोली व राहाव्या व पडद् व भावई व नागर तुम्ही देसाई यानी करावा निमे हक व निमे पालक यामध्ये पाच जण भाऊ

खुद् मलगोडा हणमगोडा मलगोडा बिन सेटगोडा

१ १ ६

— गोडा बिन भागगोढा सेटगोडा बिन येसगोडा

१

येणेप्रा पाच जणानी इनाम ·।।· निमे चावरपैकी पाव चावर व पालक ·।· पाव चावर पैकी १५ पधरा बिघे खाऊन गावी राहावे कोणी कथ ढा करील तो गुन्हेगार गोताचा आन्याई ऐसे कयपत्र दिल्हे ते स्वामीनी मनास आणून तु (म्हास) मौजे वडगाव बुा येथील पाटिलकीचे वतन मन्हामत केले आहे तरी तुम्ही मौजे मारचे पाटिलकी व कारभार सुदामत चालत आले आसेल त्याप्रमाणे करणें येविषी आलाहिदा देशाधिकारी यास सनद सादर आहे सदरहूप्रमाणें पाटिलकीचे वतन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने देशमुखी देखील वतने अनभऊन सुखरूप राहाणे वतनसमधे तुमचे माथा (शेर) र्णा रुपये १७५ पावणे दोनसे रुपये करार केले त्याचा ++ हुजूर जाहाला [1]निदेश समक्ष मर्यादेयं

विराजते

(अष्टकोनी शिक्का)

तेरीख १५ रुजू सुरु सुद बार

सफर सुा निसा आसरीन बार

---

## दाभाड्यांचें इनाम व मावळांतील वतनदारांस वस्त्रें

ले. ६९ श्री { श. १६५० पौष शु. ३
{ इ. १७२८ डिसें. २२

यादी वस्त्रे कर्यात मावल [बद] ल इनाम राजश्री खंडेराऊ दाभाडे छ १ जालाखर सुहूर सन तिसा अशरैन मया अलफ

---

१ अक्षर वेगळें-

देशमूख

पायेगुडे
१ दिपाजीराव
१ मानाजी पायेगुडे
१ सुलतानजी पायगुडे
१ केशवजी

पाडे
१ रामजी पाडे
अगलंबेकर

५

करजवणे
१ धोंडजी ना।
१ खंडोजी ना।
१ सुभानजी करजवणे
१ मोत्याजी

करजवणे

४

बाजी सिवदेऊ
मुतालीक दि।
रा। पंत सचीव

१

देशपांडे

१ धोंडो नामदेऊ
१ माहादाजी आपदेऊ
१ रामचंद्र यादव
१ यादव रामचंद्र

४

मौजे गहुजे
१ विठोजी बोडके
१ गिरजोजी बोडके
१ बापुजी दागट
१ कासी केशव कुलकर्णी

४

मौजे सिरगांव
१ सूर्योजी गोपाल
१ मोरो सारंगधर कुलकर्णी
१ बहीरजी सेलका चौ।

३

सो ++ ठाणें
१ देवजी पाटील मुन्हे
१ दावजी मुन्हे
१ मोरो सारंगधर कुलकर्णी

३

१ ++ पाटील मोसरे
१ ( कुलकर्णी )

पंच वीस ( पा ) गोटी सुमार

२५

---

## खानदेश–वऱ्हाडच्या फौजा व सरदार आले

ले. ७०

श्री

{ श. १६५१ पूर्वी
{ इ. १७२९

राजश्री नारबा व राजश्री सामराजपंत गो। यासि

द. अखंडित लक्षुमा अलंकृत राजमान्ये — श्रो कृष्णाजी दाभाडे रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणे विशेष येथे आम्हास येऊन पंधरा सोला

रोज जाले पाच सात पत्रे पाठविली परंतु उतर आले नाही याजकरिता आम्हास दिसोन आले की तेथे राज्याचा कारभार पडिला आहे विजयादसमी सनिध याजकरितां सरदार भेटीस येतात फौजाची दाटी यामुले अविस्मरणे जाले आहे तरी ऐसी गोष्ट न करणे पत्रे श्रमकडून लेहून पाठवितो ती असरेशाहा वाचून दाऊन सेहनिसे करून उतरे पाठवणे येक वेल आम्ही येथील कारभार विल्हे लाऊन तुम्हाजवल येऊ ते गोष्टी करणे तुम्हास अवकाश नसले की सरदाराची व कमाविसदाराची दाटी स्वार्थामुले आमचे स्मरण नसेल याजकरिता पाल्हाले ल्याहावे लागलें तरी तीर्थरूप राजश्री——रायांस व सौ॥ वज्रचुडेमंडित उमाबाईस साकल्ये सागोन उतरे व येथील पाटिलगीचे साहित्य होये ते करणे तुम्ही आपले वर्तमान लिहीण जाणे बहूत काये लिहिणे खानदेशच्या व वराडच्या फौजा व सरदार आले आहेत याजकरिता दाटी पडली असेल म्हणऊन लि॥ असे हे विनंति

दा॥ सेवसी दादाजी केशव कृतानेक विनति लि॥ परिसोन सांभालास अंतर न करणे व राजश्री सुभेदार आज्ञा करितात त्याजकरिता ल्याहावें लागते विशाद येऊ दिल्हा न पाहिजे हे विनंती हे विनंति[1]

हे विनती

---

## खंडेरावाचें देहावसान, त्र्यंबकरावास देशमुखी, सरमोकदमी, इ.

ले. ७१

श्री

श. १६५१ माघ वद्य १२
इ. १७३० फेब्रु० ३ मंगळ

( शाहू छत्रपतींची अष्टकोनी मुद्रा )

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५६ सौम्य संवत्सरे माघ बहुल द्वादसी भोमवासरे
१ २ क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं राजश्री त्रिंबकराऊ चिन खंडेराऊ दाभाडे यास दिल्हे (वतनपत्र) ऐसे जे तुमचे बाप राजश्री खंडेराऊ दाभाडे यास सरदेशमुखी

---

१ पत्रांतील मजकूर संपल्यानंतर कोरी जागा राहिली असेल तितकी धरून पत्राच्या अगदीं शेवटीं पुनः त्याच पत्रलेखकानें 'हे विनंती' इत्यादि शब्द पुनः लिहावयाचे अशी पद्धती होती. ह्याचा अर्थ पत्रानंतर ताजाकलम वगैरे आतां नाहीं. मध्यंतरीं कोणी लिहिलें तरी तें अप्रमाण. एका प्रकारानें लेखकाचा हा पत्रसमाप्तीचा मोर्तबच म्हणतां येईल. ह्या पत्रांत दोन तीन बोटें कोरी जागा होती ती सोडून ही 'विनंती' काढली आहे.

| | |
|---|---|
| पा। चाकण देह ६४ वजा बाकी | पा। पारनेर सरकार |
| बांकी बुा। १ देह ६३ येकून माहाल | जुनर माहाल |
| १ | १ |

सदरहू दोन्ही माहालचे होते ते मृत्य पावले याकरितां हाली सदरहूप्रा। सरदेशमुखीचे इ(नाम) पूर्ववतप्रा। तुम्हास करार करून दिल्हे असे तरी तुम्ही दोन्ही माहालचे सरदेशमुखीचा हक वंशपरंपरेने घेऊन इनाम अनभवीत जाणे जाणिजे [४]लेखनालंकार मर्यां। देयंरा। जते ( असा षट्कोनी शिक्का )

रुजू संमत ता। सां।
सुमंत मंत्री सरकार
बार सुद सुरू सुद बार बार बार बार

---

## मल्हार कोन्हेर मजमदार—तेरखेड

ले. ७२

श्री

शा. १६५३ आषाढ शु. ८ गुरु
इ. १७३१ जुलै १

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५८ विरोधकृत संवत्सरे आषाढ शुध अष्टमी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकदमानी कसबे तेरखेड सा।

---

१ ह्याच मितीचीं आणखीं ८ पत्रें आहेत त्यांचा तपशील असा—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ( १ ) उमाबाई | बेहज | ता। कारुली | | मोकदम | इनाम |
| ( २ ) त्रिंबकराव | कहज | ता। पौनमावळ | | ,, | इनाम व इसाफत निमे निमे |
| ( ३ ) ,, | इंदुरी | ता। चाकण प्रांत जुन्नर | | ,, | इनाम |
| ( ४ ) ,, | | ता। जुन्नर | | दोरी व लेखक | सरमोकदमी |
| ( ५ ) ,, | ता। चाकण | | प्रां। जुन्नर | देशख, देशडे | सरदेशमुखीचे हक इनाम |
| ( ६ ) ,, | ता। चाकण | | ,, | दोरी व लेखक | सरदेशमुखी |
| ( ७ ) ,, | पा। पारनेर | | | दोरी व लेखक | ,, |
| ( ८ ) ,, | ,, | | | देशख देशडे | ,, |

ह्या सर्व पत्रांवर थोरला बाजीराव व श्रीनिवासराव ह्या प्रधानप्रतिनिधींच्या मुद्रा तीन ओळींनंतर मध्येंच उठविल्या आहेत. आकार वाटोळा व अष्टकोनी आहे.

१ २ परंडे यांसी आज्ञा केली ऐसी जे
कसबे मजकूर रा मल्हार कोनेर
मजमदार दिा सेनाखासखेल यास पेसजीपासून निमे मुकासा आहे त्याप्रमाणें करार आहे तरी तुम्ही यांजकडे रुजू होऊन कसबे मजकूरचे निमे मुकासबाबेचा वसूल देणे जाणिजे लेखनालंकार+ मर्या । दं्यं रा । जते ( असा षट्कोनी शिक्का )

रुजू सुरू संमत साां साां
निवीस सुमंत मंत्री सरकार
बार सुद सुरु सुद बार बार बार

## यशवंतराव दाभाडे सरमोकदम

ले. ७३ श्री { श. १६५३ आषाढ शु. १० शनि
इ. १७३१ जुलै ३ }

( शाहू छत्रपतींची अष्टकोनी मुद्रा )

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५८ विरोधकृन संवत्सरे आषाढ शुध दशमी मंदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी रा येशवंतराव बिन खंडेराव
दाभाडे यांसी दिल्हे वतनपत्र ऐसे जे
३ सरकार जुनर येथील सरमुकदमीचें वतन
पूर्वी तुमचे बाप खंडेराऊ दाभाडे यास दिल्हे
होते ते मृत्य पावल्यावरी तुमचे वडील बंधु त्रिंबकराव दाभाडे यांस करार करून दिल्हें तेही आलाकडे मृत्य पावले ऐशास तुमचे चालवणे स्वामीस अवश्यक जाणून स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन सरकार मजकूरचे सरमोकदमीचे वतन मन्हामत केलें असे तरी तुम्ही सरकार मारचे सरमुकदमीचे वतनास हकलाजिमा पेसजी चालत आल्याप्रमाणे आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन वतनाची सेवा दंडकप्रमाणे करीत जाणे +जाणिजे लेखनालंकार+ मर्या । दं्यं रा । जते (असा षट्कोनी शिक्का )

रुजू संमत साां साां
मंत्री सरकार
बार सुद सुरू सुद बार बार बार बार

---

१ येथें बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा वाटोळ्या आकाराचा उलट्या 'न' चा शिक्का.

२ येथें श्रीपतराव प्रतिनिधींचा वाटोळा शिक्का.

३ फक्त बाजीराव बल्लाळ पेशव्याचा मुख्य शिक्का आहे; प्रतिनिधीचा शिक्का नाहीं. पण ती जागा कोरी ठेविली आहे. + अक्षरें भिन्न.

## नारो राम मंत्र्यांची दाभाड्यांच्या कमाविसदारास ताकीद

ले. ७४

श्री नकल { श. १६६० कार्तिक वद्य ७
इ. १७३८ नोवे. २२ }

राजश्री कमाविसदार दिा दाभाडे सरपाटील ताा कर्यात मावल गोसावी यासि श्मो नारो राम मत्री सुाा तिसा सलासीन मया आलफ ताा माा देह छपन्नपैकी विसा गावीचा सरपाटिलकीचा आमल तुम्हाकडे आहे त्यास छतिसा गावींच्या हक सिरस्तेप्रमाणे घ्यावा ते न करिता मनमानेसी धामधूम करून ज्याजती वसूल घेता म्हणौन हुजूर विदित जाले तरी ही गोष्ट काही कार्याची नाही राजश्री-स्वामीची सहीची चिठी सादर जाली असता ज्याजती उपसर्ग करिता राहात नाही येणेकडून राजश्री येशवंतराव दाभाडे सेनापति यासी बोल लागतो तरी याउपरी येसी वर्तणूक न करणे छतीसा गावाप्रो विसा गावी सर पाटि[ल]कीचा आमल करून वसूल घेणे फिरोन बोभाट आलिया गोष्ट कार्याची नाही +जाणिजे रा+ छ २० साबान मोर्तब (+ अक्षर भिन्न)

---

## कडूसचा पाटील बाजीरावास हजार रुपये नजर देतो

ले. ७५

श्री { श. १६६० फाल्गुन वद्य १३
इ. १७३९ मार्च २६ }

श्री
राजा शाहु
नरपति हर्ष (वर्तुळी कोयरी)
निधान बाजीरा
व बल्लाळ प्र
धान

आज्ञापत्र राजश्री——पंत प्रधान ताा सीवजी पाटील ढमाले व येमाजी नेहरे (?) पाटील काा कडूस सुहूर सन तिसा सलासैन मया अलफ तुम्हांकडे नजरेचे रुपये हजार करार केले त्यापैकी रुपये ४०० पौ वजा बहुडा ताा दावलखान——रुपये

१३ मोहोर अमदाबादी १
१२ नकद हौगाचे
——
२५

बाकी रुा ३७५* पावणे च्यारशे पाठविले ते दावलखान याचे गुजारतीने पोता जमा जाहाले असेत छ २६ जिल्हेज पाा* हुजूर श्री लेखन सिमा (बदामी मोर्तब)

---

* यापुढील अक्षरें वेगळ्या वळणाचीं आहेत. त्यांतील रु. ३३६ पोचल्याचें श. १६६१ ज्येष्ठ वाा ३०, इ १७३९ जून २४ चें एक पत्र आहे तें घेतलें नाहीं.

## यशवंतराव दाभाड्याची मानसिंग दाभाड्यास ताकीद

ले. ७६ श्रीराम {श. १६६२ कार्तिक शु. १४ / इ. १७४० आक्टो. २२}

राजश्री मानसिंग दाभाडे गोसावी यांसि

द अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य —— श्री। येशवंतराऊ दाभाडे सेनापती राम राम सु॥ इहिदे आरबैन मया अलफ रा॥ माहादाजी सिवदेव याजला देशमुखीचा धंदा सांगोन ता॥ वांकर येथील हकइनामाचा यैवज नख्त व गला नेमून दिल्हा आसोन हाली तुम्ही खलेल करून यैवजास आटक केली म्हणून हुजूर विदित जालें तरी हे गोष्टी कायांची नाही मा॥रनिले हुजूर चाकरीवर असतां व पेसजीपासुन चालत आसोन खलेल करावेंसें नाहीं याजउपरी देखत पत्र सुदामतप्रमाणे ता॥ मजकूरचा यैवज त्यांचे +बंधू तेथे आहेत त्याजपासी पावते करून पावलियाचे कबज हुजूर पाठऊन देणें [1]फिरोन बोभाट येऊं न देणें जाणिजे [1]*छ ११ साबान [अ. मो.] मोर्तब सुद

[अष्टकोनी शिक्क्यांत '० ‿ श्री राजा शा हुस्वामीछत्रप तियसवंतरा वदाभाडेसे नापती' असा पांच ओळींत मजकूर.]

---

## कर्नाटकच्या नबाबाचा देवस्थानांस त्रास

ले. ७७ {श. १६६५ / इ. १७४३}

श्री रंगनाथनस्वामी श्री मते रामानुजाय नमः ॥

छत्रेपर्तीयां

श्रीमंत माहाराज राजेश्री फतेसिंग —— राजे यांप्रती

० ॥ द श्री मद्वेदमार्गंप्रतिष्ठापनाच्चार्योभये वेदांताच्चार्ये परमहंस परिव्राजिकाच्चार्यं श्रीरंगस्थळश्रीरंग नारायेणजीयेर स्थान समये अनंत कोत्तु परीकर यांही श्रीमत्समस्त सद्गुणगणात्लंकृत असंडित लक्ष्मी प्रसाद परीपूर्ण श्री——पादारविंद द्वद्वंशंदमान मकरंद बिंदु संदोहा स्वादनं तुंदि लेंदीनिराये मान मानस निखिल निगमांत पारावार पारीण विंद्वद्वृंद चेकोर शार पराका चंद्र चंद्रीकाये राजश्री——स्वामि संनिध त्रीसंध्याकालीं ॥ श्लोकः ॥ आयुरारोग्य पुत्रार्थ राज्य बंधु समृत्धयः ॥ भवंतु ते सदा विष्णोः प्रसादं द्रंगशायिनः ॥ १ ॥ या प्रकारें आनेक आसीर्वाद करीत आलों यानंतरें

---

+ कागदाचे पाठीवरील मजकूर व तेथेंच यशवंतरावाची मुद्रा.

[1] हीं अक्षरें निरनिराळ्या वळणाचीं

श्रीमंत व रघोजी भोंसले स्वशैन्यासहवर्तमान या प्रांतास आगमन केले त्यासमई देवालयांस बहुत काही महोछवादीक करऊन सर्वत्र जनास संतोषऊन त्रीचनापली संवस्थानी रो मुरारजी घोरपडे यांस स्थापुन या देवालयां विशई बहुता प्रकारें सांगावयाच्या रीतीने सांगितलें त्याहीं अपली आज्ञां सिरसावंदून पूर्वी कर्नाटक प्रकारा परीस आर्तीषईत उछाव व सर्वमान्यादिक देव ब्राह्मणास देऊन चालवीत आले येसें आस्तां या देशास निजामन मुलुक यांचें आगमन घडिलें त्यानींही पूर्वस्थिति चितास आणून हा हिंदु धर्म अनादि चालत आला आहे म्हणून विरोध न करितां स्वमुद्रांकित पत्रें करून दिधलीं तदनंतरें येथील अधिकार अनवर्दीखानास दिधला त्यांस तें पत्रें दाखविलीं त्यांही पत्रें अम्हापासून हिरोन घेऊन जबरदस्तीनें प्रती सांवछर पंनास साठी हजार रुपये नजर म्हणून घेत आहेत देवताकार्याविशई कोण्हीं अभिमानी दिसत नाहीं. काये करावें आम्हांस नाथ आसून अनाथापरीं श्रम पावतों तें पत्रीं लिहितां पुरवत नाहीं देवालयांची पुजा राहिली माहाद्वारें आडकिलीं आहेत म्लेच्छाक्रांत जालें आहे भगवदिछा येसीच घडुन आली आहे. आहोरात्री श्री—च्या संनिधी सर्वत्र ब्राह्मण मिळून प्रार्थितों कीं सीघ्र केव्हां आपलें पुनरागमन होईल या माहास्थळांचा उत्धार घडल या विशई माहाराज——प्रती विज्ञापना—पत्र लिहिलें आहे त्यावरून विदित होईल श्रीमंतांही ज्याप्रकारें विनंती करावी की तैसी करून सीघ्र जीर्णोत्धार होऊन पूर्वप्रकारें सकल उछव व सर्वमान्यादिक आविछिन्न चालेसा आगत्य येत्न करविला पाहिजे येदनिमित्य खंडेराव यांसी पाठविलें आहे ते मुखोद्गतें विज्ञापना करितां श्रुत होईल सर्वज्ञा प्रती विशेष काये लिहिणें हा अनेक असीरवा.*

---

## कोल्हापूरच्या संभाजीस दाभाड्यांचें अगत्य

ले. ७८ { श. १६६६ श्रावण शुद्ध ५
{ इ. १७४४ ऑगस्ट १

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ७१ रक्ताक्षीनाम संवत्सरे श्रावण शुध पंचमी सौम्यवासरे क्षत्रियें कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी समस्त सेनाधुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री येशवंतराव दाभाडे सेनापति यांसि आज्ञा केली ऐसी जे तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें हवेली कोल्हापूर येथील देशमुखीचें वतनाविसीं कितेक लिहिलें तरी तुमचें चालवणें हें स्वामीस अगत्य आहे त्याप्रमाणें वतनाचा प्रसंग सुरलीत करून दिल्हा असे येविसी पुण्यसील उमाबाई यांसी लिहिलें आहे त्यावरून तुम्हांसही कळेल तुम्हांपेक्षा स्वामीस कांहीं विशेष आहे येसें नाही त्याप्रमाणें दिवसेंदिवस

* ह्या पत्रावर जेथें मोकळी जागा आहे तेथें कोण्या गांवढळांनीं कांहीं मायने वगैरे लिहून पत्र खराब केलें आहे.

स्वामीची सेवा करून संतोष पाववेंगे हांडीं राजश्री अंबाजी अनंत यांस लिहिलें आहे व राजश्री रुस्तमराव तुम्हाकडील राजश्री नारो सामराज यास आज्ञा केली आहे हे सांगतील त्यावरून कलेल त्याप्रमाणें दिनप्रतिदिनी तुम्हाकडील कार्याचे निदर्शन ये ते गोष्ट करणे [1]बहूत लिहिणे तर सुज्ञ असा [ प. मो. ] मर्यादेयं विराजते

[1]बार बार बार

---

## बदअमलाच्या चौकशीचा दाभाड्यांच्या प्रतिष्ठेमुळें संकोच

ले. ७९ श्री { श. १६६६ श्रावण शुद्ध ११ / इ. १७४४ ऑगस्ट ७ }

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ७१ रक्ताक्षीनाम सवत्सरे श्रावण सुध येकादसी भोमवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणी पुण्यसील उमाबाई यांसि आज्ञा केली यैसी जे बाळाजी वेकाजी याजला हु(ज)रून साहोत्र्याचा धंदा होता तुम्हाकडील देशमुखीचाही धंदा त्याजकडे आहे प्रस्तुत याजपासून बदअमलाचा धंदा घडला त्याचा शोध करून बाजपूस करिता बहूतच दूरवर लावणार परंतु तुम्हां लोकाचे स्वामीस अगत्य याकरितां ते गोष्ट राहून बाळाजी वेकाजी हुजूरचा सेवक यास्तव याचीच बाजपुसी होणे ते होईल तुमचा वतनी प्रसंग चालावा लागतो याकरितां शाहाणा मनुष्य स्वामीसेवेल्यास आणि तुम्हासहि उतम यैसा कोण्ही योजून पाठवणे वतनाचा धंदा त्याचे हाते स्वामी चालवितील तुम्हाकडील रा। नारो शामराज याती सविस्तर दखल जाले आहे तुम्हास सांगतील त्यावरून कलेल जाणिजे [1]बहुत काये लिहिणे [ प. मो* ] मर्यादेयं | विराजते

सुरू सुद बार संमत सुद बार बार

---

## कोल्हापूरच्या संभाजीचें दाभाड्यांस आश्वासन

ले. ८० श्री { श. १६६७ आषाढ वद्य ७ / इ. १७४५ जुलै १० }

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ७२ क्रोधननाम संवत्सरे आषाढ बहूल सप्तमी सौम्य-वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री बाबुराव कोनेर यांसि आज्ञा केली यैसी जे राजश्री रुस्तुमराव अंबाजी हे व सिदोजी देवकर व

---

१ या पुढील मजकूर निराळे वळणाचा.

शाहाजी खराडे तुम्हांकडून हुजूर आले याणि पुण्यसील उमाबाई दाभाडी व राजश्री येसवंतराव दाभाडे सेनापती याचे एकनिष्ठेचा कितेक अर्थ सांगितला तो विदित होऊन स्वामीस संतोष जाला तुम्हीही स्वामीचे ठाई बहुतसी निष्ठा धरून पेसजी हाली चालीप्रो येवजाची विल्हे करून दिलीत तरी ज्या कार्यभागात तुम्हासारिखे लोक असतील तेथे दरज काढाइतकी पडणार नाही हा तो निशा तुम्हाप्रा स्वामीचा आहे सेनापती याचा वतनी प्रसंग व गांव सुरक्षित चाळवजे हे तो स्वामीस सर्व प्रकारे अगत्य बोलीप्रो स्वामीनि गाव स्वाधीन करून तुम्हाकडील शाहाजी खराडे यास गावात ठेविले हा प्रसंग या मागेच होऊन गेला असता परतु ज्याचे स्वाधीन गाव पेसजी होता त्याच्या साल झाड्याच्या मााराकरिता च्यार दिवस लागले प्रस्तुत वतनी प्रसंग व गांव खुरली( त ) करून देऊन मााराविलेस पा असेत सेवे निरर्शन वरचेवर येऊन तुम्हावर स्वामी संतोसी होत ते करणे +जाणिजे +बहुत काय लिहीणे [ प. मो. ] मर्यादेयं । विराजते

+सुरु सुद +बार +समत +सुद +चार +बार

---

## कोल्हापूरकर छत्रपतींविषयीं दाभाड्यांची पूर्वापार निष्ठा

ले. ८१

श्री

{ श. १६६७ कार्तिक शु. ७
{ इ. १७४५ आक्टोबर २०

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ७२ क्रोधननाम संवत्सरे कार्तिक शुध सप्तमी रविवासरे क्षात्रियेकुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी यांणी पुण्यसील उमाबाई दाभाडी यांसि आज्ञा केली येसी जे विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें कितेक आपले येकनिष्ठेचा अर्थ लिहिला त्यावरून स्वामीस समाधान वाटले तरी पूर्वापर तुमची निष्ठा स्वामीचे पायांसी तसीच आहे याकरितां स्वामीची कृपा तुमचे ठाई सर्वप्रकारें आहे तुम्हीं आपलें समाधान असों देणें वतनाचा प्रसंग सुरळीत चालवावा म्हणून लिहिलें तरी तुमचे वतनी प्रसंगास कोणेविसीं स्वामी अंतर करणार नाहींत व पाटगी म्हातारी व दोघे चाकर आणविले आहेत राजश्री कासी विस्वनाथ मुा राजाज्ञा पेसजीं तुम्हांकडे पाठविले आहेत तरी म्हातारी व चाकर आगत्य हुजूर पाठवणें अनमान सहसा न करणें राजश्री रुस्तुमराव अंबाजी मुा मंत्री याणीही कितेक लिहिले त्याचे उत्तर त्यांस लिहिले आहे सांगतील त्यावरून कलेल [1]गणोजी जाधव दिा हुदे पाा आहे सांगेल [1]बहुत काय लिहिणे [ प. मो. ] मर्यादेयं । विराजते

[1]सुरू सुद [1]बार [1]समत [1]सुद [1]बार [1]बार

---

+ अक्षरें भिन्नभिन्न. १ या पुढील मजकूर निराळे वळणाचा आहे.

# अंताजी माणकेश्वराचें शेटेपणाच्या हक्कासंबंधीं पत्र

ले. ८२ श्रीशंकर { श. १६७६ पौष शु. ४
{ इ. १७५४ डिसें. १७.

मुद्रेषा शंभुचरण-
द्वंद्वनिष्ठस्य सर्वदा
माणिकेश्वरसंभूत
अनंतस्य विराजिते ( गोल त्रिवलयी सिक्का )

अज स्वारी राजश्री अंताजी माणकेश्वर दिमत राजश्री———पंत प्रधान ता। रायांपा जैन सेट्या सुा। खमस खमसैन मया व आलफ तुजकडे सरकारचे सेटेपण आहे त्यांस तुवा आर्ज केला की मजला सेटेपणाचा हक आहे त्याप्रो साहेबीं यावा म्हणोन विनंति केली त्यांस येणेप्रो

सरकारच्या कारखानियास पागा हाती व उस्टरखाना व मुबदख खर्च वगैरे जो जिनस सागेल देत जावा त्यास जो निरख आसेल त्यापैकी हर-जिनस दाणे यास येक सेर कमी देत जावा व कीरण बाब यास दर रुपियास आद्पाव कमी देत जावा लवंग जायेफल व जायेपत्री द केशर व कस्तुरी यास दर रुपयास येक आणा देत जावा सरकारची जकात इमानेप्रमाणे देत जावी कलम १

बाहेरून रसद भरून बाजारांत येत जाईल त्यास गला हर जिनस व किरण बाब दर गोणीस ०८॥ आदसेर देत जावा हासील सरकारचा इमानप्रा देत जावा कलम १

ज्याप्रा माहादसेट वीरकर आठरा पगड जाती याजपासून जो हक घेत आसेल त्याप्रा तूं घेत जाणे जो सरकार हक आसेल तो सरकारात दाखल करावा कलम १

येणेप्रो श्रीमंत राजश्री———पंत प्रधान याचा सेट्या माहादसेट घेत आहे म्हणोन तुवा सागितले त्यास याप्रा तेथे आसिले तरी तूही त्याप्रा घेणे सरकारचा जो रुपया आकारेल तो इमान प्रमाण सरकारात आणून यावा येका रुपयास आंतर केले तरी सेटेपण दुसरियास दिल्हे जाईल जो जिनस सरकारात जे समई लागेल तो देत जावा * जाणिजे छ २ माहे रबिलावल मोर्तब सूद [ वा. मो. ] मोर्तब : सूद

---

* हें अक्षराचें वळण निराळें दिसतें. १ 'चर्त' असें मागेंपुढें लिहिलें गेलें आहे.

# दाभाडे मोंगलाईंत जातात

ले. ८३ { श. १६८९ श्रावण वद्य ११
श्री { इ. १७६७ आगष्ट २०

राजश्री दमाजी गाइकवाड सेनाखासखेल समसेर बाहादर गोसावी यांसि

द सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य —— ( राजश्री माधवरा ) व बलाल प्रधान आसीर्वाद विनंति ( उ )परी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष लक्ष्मण भारती गोसावी याचा (चे)ला उमेद भारती यागी हुजूर विदीत केले कीं मौजे आकुर्डी ता। चाकण प्रांत जुंनर येथील सरदेशमुखी व सरपाटिलकी दाभाडे सेनापति याणी लक्ष्मण भारती आपले गुरु यास देऊन पत्रे करून दिल्ही त्या प्रमाणे आमल आपल्या गुरुकडे चालत आला व ते मृत्यु पावल्यावरी आपणाकडेही आमल चालत असतां सन इसने सितेनात दाभाडे मोगलाईत गेले सबब त्याचे अमलाची व व + + जप्ती सरकारातून केली त्या + + ची जप्ती + + ज वरून येवि + + न तेथून हकीगत लेहून आणिली + + कूर सदरहूप्रमाण आहे सबब मौजे ( मा। )राची जप्ती मोकली करून हे पत्र तुम्हास लिहिले आसे तरी मौजे मजकुरची सरदेशमुखी व सरपाटिलकीचा अमल सन इसनेपूर्वी गोसावी मजकूर याजकडे चालत आला आहे त्याप्रमागे साल मजकुरापासोन उमेद भारती

श्री ० याजकडे चालवणे रा। *छ २४ रबिलौवल सु॥ समान सितेन
राजाराम नरप मया व अलफ बहूत काय लिहिणे हे विनंति लेखन सीमा
र्ती हर्षनिधान माध ( गोल शिक्का)
वराव बल्लाळ मु बार
ख्य प्रधान ( न उलटा. वाटोळी ५ ओळींची मुद्रा )

---

# यशवंतराव दाभाडे खर्ड्याच्या लढाईंत हजर

ले. ८४ { श. १७१८ मार्ग० वद्य ३
श्री { इ. १७९६ डिसें. १७

यादी नि॥ राजश्री येशवंतराव दाभाडे सु॥ सबा तिसेन मया आं [1] साल गु॥ सरकार स्वारीसमागमें मोंगलाकडेस गेलो ते समई स्वारीखर्चामुलें लोकांचे देणे जाहले व हाली लग्न करणे प्राप्त जाहले आहे यास्तव सरकारातून आमचे कमाविसदार याजला आज्ञा येक साल वसूल घ्यावयाविशई जाहली पाहिजे ——————

---

* हें अक्षर वेगळें वेगळें आहे. [1] श. १७१७ = इ. १७९५ खर्ड्याची लढाई.

१ तळेगाव ता॥ चाकण नि॥ बळवंत बाबुराव
१ जकात इदुरी तळेगांव नि॥ आंताजी माहादेव
१ सरदेशमुखी पारनेर नि॥ रामचंद्र नाईक परांचपे
१ जकात नवलाख उंबरें नि॥ सटवाजी दरेकार
१ पौंड मोदडे सरदेसाई नि॥ टिकाराम किराड
१ वारकेर सुमणे प्रो चांदवड नि॥ गोपाळराव त्रिंबक
१ उरसे मोकासा व इनाम मो ( वगैरे ) नि॥ लक्षुमणभट करवे
१ सरपाटिलकी प्रां जुनर व पुणे वगैरे नि॥ आबाजी नारायग कानिटकर
१ किरकोळ पाटिलक्या खुरबाव
―
९

* [२]येशवतराव दाभाडे याचा सरजाम वगैरे साहुकाराकडे रदकर्जास आहे त्यास दाभाडे याचे लग्न आहे सबब साल मजकूरचा वसूल रदकर्जी घेऊ नये येक साला मारनिलेकडे द्यावा येविसी सावकारास येक पत्र [२]देवावे [२]देणे

छ[२] १७ जाखर सन सबा तिसेन मार्गसीर्ष मास रा॥ धोंडो बलाल निजसुरे

---

## सेनापतीकडील अधिकारी व लेखनव्यवस्था

ले. ८५ श्री { श. १७२२ / इ. १८०० }

यादी रोजगारसंमंधी कलमे नि॥ सदासिवराव श्रीपत फडणीस सु॥ इहिदे मयातैन

३ सेनापतींचे पदसमंधी दरकी आसाम्यां

१ मजमू―――
१ फडणिसी
१ दप्तरदारी
―
३

१ खाजगीची फडणीसी
―
४

---

२ अक्षर वेगळें वेगळें.

कारखानेसमंधी लिहिणेच्या आसाम्या कारकुनीच्या—ता।

- १ माहाल फीलखाना
- १ कामाख्याची आसामी कारकुनीची
- १ नगारखाना
- १ स्वारीचे कोठीचे लिहिणे कलम
- १ रविवार पेठेची आसामी सुदामत पासून चालते त्याआन्वये वहिवाटीतच आहों कलम
- १ इमारती कारखाने संस्थानीक व वतनचाय व सरंजामी मुलकी याची कारकुनी
- १ माहाल टाकसालीचे लिहिणे आमचे आम्ही करितच आहों कलम
- १ पथक पागाच्या कारकुन्या पेश(जी) आम्हाकडे होत्या
- १ माहाल तोफखा
- १ खाते देवडीवरील क्रीच वगैरे व इतर देवड्या वगैरे यांची कारकुनी कलम
- १ जथे जासूद माहालाची कारकुनी कलम
- १ चक्षीगिरी निसबत शागिर्दपेशा कलम
- १ सिलेखाना
- १ माहाल सिबिकाखाने निा भोई
- १ रथखान्याची कारकुनी
- १ माहाल इंदुरी तलेगाव येथील जकातची फडणिसीचे आसामीविसी दों तीं वर्षात येक दोन वेळा विनंति केली त्यांचे आभये आहे कलम

---

फडणिसीचे दरक समंधी येणे प्रमाणे कलमे

- १ लिहिणेचे काम दरोबस्त झाडे येकत्र होऊन कीर्द व्हावी म्हणजे लिहिणे आकारांत येऊन नजरेस आजमास येईल
- १ कापड खरीदीच्या यादी कापडनीस याणी व आम्ही लिहाव्या उभयता मिलोन सरकारी आख घालावे चिठीने खर्च व्हावा सरकार परवानगीने खर्च केली*—जालियास रोजचे रोज दाखला पाहून रुजुवात घालीत जावी कलम
- १ माहाली मुलकी बेहडे व सनदा व वराता होत आहेत याचे हिसेब कमाविसदाराकडून आमचे विद्यमाने विल्हेस लाऊन मखलाशा आमचे हातच्या घेऊन हिसेबवार दफतरी रुजू असावे ( [1]मखलासी पुर्डे म ? सरकारचेकडून हिशेब ) कलम
- १ सिलेदार लोकांचे करार होऊन चोलीची याद चक्षी व आम्ही सरकार आज्ञेनरूप ठरावात आणून तैनात जावते तेरीखसुधा आम्ही

---

* येथें थोडें अक्षरावरच लिहिलें आहे. १ मध्येंच ओळीवर व तिरपें लिहिलें आहे.

१ कोठीकडे खरीदी गला व कैली व वजनी व तोलेवार सुमारी कुली खरीदी होईल ते समई कोठव-ल्याने माप घ्यावे कोटणिसानी व आम्ही याद धरावी दर दाम घालणे तो आम्ही घालावे पैका ठराऊन सरकारांत कानावर घालून येवज जेथून द्यावयाची परवानगी होईल तेथून देववावे कलम

१ माहाल पागा हुजरातीकडील लोकांस रोजमरे वगैरे वाटणी पागेनीस व आम्हाकडील कारकून या उभयेतानी वाटीत जावे तैनात जाबते व कबजे आम्ही घर्डात जावी हाजिरी गैरहाजिरी पागे-नीस याणी समजावीत जावी व चंदीमसाले लागवडाच्या यादी रोजगुदस्तच्या रोज मजकूर समजावीत जाव्या कमजाजती समजल्यावर तेणेप्रो चिठी घ्यावी कलम——येक

१ जवाहीर सोने रुपे वगैरे जामदार-खानेकडील कारकून व आम्ही खरीदी जिनसाच्या यादी लिहाव्या चौकसी करून किमत ठरवावी परवानगीने चिटी करून द्यावी कलम

१ उचापतदार वाणी तांबोळी व तेली व माळी वगैरे मोहतर्फा याजवर कारखान्याच्या खर्चाबाा चिठ्या लिहून देत जावे नकल बक्षीने करून घ्यावी हाजिरी गणतीचा सुड काढून कबजे आम्ही आका-रावी कलम

१ हाशमी लोकांचे तैनातजाबते व हाजिरीगणती रुसकतीचहालीचा हिसेब आम्ही आकारीत जावा येणेप्रो चालत आहे कलम

१ उस्टरखान्याकडील चंदी व मसाले वगैरे लागवडाच्या यादी दफ्तरी दररोज समजावीत जाव्या कम-ज्यास्थ आसल्यास त्या प्रो चिठी करून घ्यावी कलम

१ पथकपागाच्या चंदी रोजमरे आर्जं बाबेच्या चिठ्या आम्हाकडील होत आसतात हिसेब कबजे आम्ही आकारीत जावा येवज सरकातून नेमून देवितील त्याच्या वराता आम्ही करून द्याव्या आथवा पोत्यावर चिठ्या——

१ खरीदी भांडी वगैरे सिलकी दागिने कोटणीस याणी व आम्हाकडील कारकुनानी या उभयेतान चौकसी करून *समजाऊन दर दाम देवितील त्यास चिठी आम्ही लिहून द्यावी —— कलम-

१ पोत्यास आम्हाकडील तेरखेची चिठी होऊन खर्च व्हावा किर-कोळी सरकार परवानगीने खर्च जालियास कीर्दीस दररोज रुजवात घालीत जावी—— कलम

* येथील एक ओळ पुन: तेथेंच लिहिल्यामुळें लागत नाहीं.

आम्ही करीत जाव्या परभारे चिठ्या होऊ नयेत कलम
१ धर्मादाव सदावर्ताच्या चिठ्या सेट्यांवर वगैरे चालू होत आहेत त्यांप्रो चालत आहे—— कलम १

१ चिटणिसीची पत्रें चिटणीस याणी ल्याहावी मजमूचे निशाण आम्ही करावे व दस्तायेवजी आसलियास आम्हांकडे वार होऊन पत्रे देत जावी ——कलम

## त्रिंबकराव दाभाडे यास शाहूनें दिलेली जरब

ले. ८६ श्री { श. इ.

राजमान्य राजश्री त्रिंबकराव* दाभाडे सेनापति खासखेल यांसि आज्ञा केली ऐसी जे कितेक आज्ञा करणें ते करून राणोजी सालोखी हवालदार हुजरे पाठविलेत हे तुम्हास व सौभाग्यवती अंबिकाबाई† दाभाडे यांस स्वामीची अज्ञावचने सागतील तरी कोणेंहीविसीचा उजूर न धरिता पत्रदर्शनी स्वार होऊन राजश्री यशवंतराव दाभाडे सेनापति याचे दर्शनास येणे उजूर कराल तरी कार्याची गोष्ट नाही अपखुदीनेच फौज ठेवावी मुलकात जावें नानाप्रकारें बखेडा करावा हे रीत तुम्हा योग्य नाही दोही मामल्याचा येखतियार गंगाजलनिर्मळ उमाबाई दाभाडे यांजवर आहे तुम्ही सेनापतीजवळ असावे सर्वांनी बाईचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी यातच उतम आहे आणि असे जालियास स्वामीसही संतोश असे या[1] कामास राणोजी सालोखी वगैरे हुजरे पाठविले त्यास राणोजी सालोखी रु॥ १००० येक हजार व खान महमद व गंगाजी पवार यास रु॥ २०० यो॥ बारासे देणे [2]येन दरसनास खुदन आसा[3]

---

* हे त्रिंबकराव थोरल्या त्र्यंबकरावांचे पुतणे. खंडेराव दाभाडे सेनापति मृत्यु (इ. १७२९) पावल्यानंतर त्यांचे थोरले पुत्र त्र्यंबकराव हे सेनापति झाले. ते डभईचे लढाईत इ. १७३१ मध्यें मृत्यु पावल्यावर खंडेरावांचे मधले पुत्र यशवंतराव हे सेनापती झाले. ह्या यशवंतरावांचे हे त्र्यंबकराव पुत्र. ह्यांस जुन्या वहिवाटीप्रमाणें सेनाखासखेलीपद व बापाला सेनापतीपद मिळालें.

† ही यशवंतरावांची वडील पत्नी, धाकट्या त्र्यंबकरावाची आई व उमाबाईची सून. सासवासुनांचें जमत नव्हतें.

१ या पुढील मजकूर निराळे वळणाचा. २ या पुढील मजकूर छत्रपति शाहू महाराज यांचे हातचा. ३ हें पत्र परांडेकर इतिहासांत पृ. १३१ वर किंचित् बदल करून घेतलेलें दिसतें.

## एक यादी

ले. ८७ { श. इ.

यादि श्री

२०००० बाजीराव साहेब
३५००० अमृतराव साहेब
२५०००० नाना फडणसि
१०००० गोविंदरा(व) मामा
१०००० गोविंदराव बापू
३००० नाणकी निा गोविंदराव
७००० मकलासीवाला वगैरे दरकदार
५००० पागणसि
५००० फिकरीजी गाढवे

१२००००

येणेप्रमाण सलोक्या (?) टाकूण कार्या होत अल आहे याज माण निशा दिल्ही ही विज्ञमी[1]

---

## गुजरातेतील परगणे राजश्रींनी हुजूर ठेविले

ले. ८८ { श. इ.

श्रीशकर प्रसन

श्रीमत मातुश्री बाई साहेबाचे सेवेसी

विनंति सेवक सताजी नाईक याने चरणावर मस्तक ठेऊन सा। दंडवत विनंति उपरी येथील कुशळ जाणून स्वकीये कुशळ साहेबी आपणांकडील स्वकीये लेखन केले पाहिजे यानंतर येथील वर्तमान तर गुजारा [ ये ] तील परगणे राजश्रींनी हुजूर ठेविले तेथील मजकूर जाला तो पूर्वी शेवेसी लिहिला त्यावरून विदित जाहला असल हली वर्तमान तर मागती [2]नारबानी कितेक परगणियान आमलदार कोणी जात जात[3] नाही

---

१ ही सर्व यादी खासे दाभाडे यांच्या हातची दिसते.

२ नारो राम मंत्री का नारो विठ्ठल खासनीस ? ३ येथे 'जात' शब्द दोनदां पडलेला दिसतो.

आमल तेथें किरकोल कोणास चालत नाही तो परगणा म्हणजे मल्हारजी होळकर याचे हवाला करावा हे आमल करतील येसी बोली घातली मग राजश्री——राव प्रतिनिधी याणी बोली केली जे निंबाळकर म्हणजे बाजीरायाचा चाकर तो मागती गेला म्हणजे बाजीरावच गेला येसे जाले मग राजश्री बोलले तर ये गोष्टीस विचार कैसा करावा तर राजश्री राव बोलि(ले) जे उमाबाईकडून थोडे बहुत येवज देवितों परगणे त्याचे त्याजमागे द्यावे मग दीड लाख रुपये करार करून ते सनदा रुपये द्याव्या येसा निश्चये केला आहे राजेश्री बोलिले जे हे पैके तुम्ही कबूल केलें तर देतील की काये राजेश्री बोलिले जे होहि पैके आमचे हातें येतील ये [ अपूर्ण ]

---

## कोल्हापूरकर जिजाबाईचें उमाबाईस वतनाविषयीं आश्वासन

ले. ८९ श्री { श. इ.

पुण्यसील उमाबाई दाभाडी यांसि श्रीमंत सकलसौभाग्यादिसपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब उपरी तुम्ही आपणाकडील कुशलोतर विनंतीपत्री लेख करून साहेबास संतोश पाववित जाणे यानंतर तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते उतम समई प्रा होऊन लेखनार्थ श्रवणे विदित जाहला तेथ विनंती जे पूर्वीपासोन वतन साहेबीचे दिविवली आहे परंतु प्रस्तुत चिंतावरी घेऊन इनामतीचे गाव आदिकरून सुरक्षीत करून द्यावे म्हणोन कितेक प्रकारे पत्रार्थावरून विदित जाहले आशास आपण पूर्वापार येकनिस्ठेने सेवा करून वतन संपादिले आसताना साहेबाकडून दुसरे विवेचना होईल हे कदापी न घडे येविसीचा आर्थ हुजरून तुम्हास आज्ञापत्र सादर आहे त्यावरून सविस्तर आवगत होईल व रा। नारो शामजी सागतील कलेल वतन साहेबाचे आहे तुम्ही फिकीर न करणे येविशी सविस्तर रा। रुस्तुमराऊ आबाजी सागील ती वचने साहेबाची आहेत +जाणिजे +बहुत काय लिहिजे ( बारा बुरुजी )[1] चवथा वाडा मोर्तब[1] सुद

+बार

---

+ अक्षर वेगवेगळें. १ ही मर्यादामुद्रा कोल्हापूरकर छत्रपति जिजाबाई भोसले यांची आहे; लक्ष्य आहे.

## छत्रपतींची अंबिकाबाई दाभाडे हीस ताकीद

ले. ९०

श्री

{ श.
{ इ.

असल बा। नकल

[1]सौ अंबिकाबाई दाभाडे यासी आज्ञा केली ऐसी जे सेनापति व सेनाखासखेल या द्वोन्ही मामल्याचा येकत्यार स्वामींनी गंगाजळनिर्मळ उमाबाई दाभाडे याजवरी दिल्हा आहे आज तागाईत त्याचेच वजनावरी कितेक प्रकारे स्वामींनी बरदास्त करून आज परियंत चालविले पुढेंही चालवण्यास भीड त्यांचीच तुम्ही सर्वांनी त्याचे आज्ञेत चालावे ते गोष्टी न करितां आपले स्वसते वर्तणूक करू लागला फौज ठेऊन मुलकात जाऊन धामधूम केलीत तिकडेच जाऊन राहिला आहां याचा विच्यार काय स्वामीचे सरकारचा ली साला मामलतीचा ऐवज येणे त्याचा निकाल नाही दुसरे कर्जाची पटी सर्वांवर घातली आहे त्याप्रो गंगाजळनिर्मळ उमाबाई दाभाडे याजवर पटी बसली आहे त्याचा निकाल जाहाला पाहिजे तो होत नाही सारा बखेडा तुम्ही मांडला आहे ही गोष्टी काही बरी नाही आपलाले स्वसतेने मन मानेल तशा वर्तणुका कराव्या हे रीत स्वामीस मानत असे नाही यास्तव कितेक आज्ञा करणे ते करून राणोजी सालोखे हवलदार हुजरे पा। आहेत हे सांगतील ती स्वामीची वचने जाणोन पत्रदर्शनी राजश्री त्रिंबकराव दाभाडे सेनाखासखेल यास घेऊन रा। सेनापतीचिया दर्शनास येणे येविसी उजूर केल्याने उतम नाही राजश्री सेनापति यांजवल तुम्ही राहावें रीतीप्रो चालावे यातच लौकीक आहे अनरीत करू लागल्यास सेवट लागणे कळतच आहे इतके दिवस स्वामींनी तमासा पाहिला याउपरी स्वामीस उपेक्षा करिता येत नाही ऐसे स्पष्ट समजोन कोणेविसी उजूर न करिता येणे राणोजी साळुखे व हुजरे पा। आहेत यास मसाला देविला [1]आहे त्या प्रमाणे देणे घेऊन येणे पत्रदर्शनी दर्शनास उजूर केलियास उतम न होय आगत्य अगत्य बेऊन [ येणे* ] बहुत काय लिहिणे

---

## खंडेराव गायकवाडाची अंबिकाबाईविषयीं निष्ठा

ले. ९१

श्रीवरद

{ श.
{ इ.

सौभाग्यवति श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित मातुश्री आंबिकाबाई साहेबांचे शेवेसी

१ हें पत्र ले. ८६ प्रमाणें छत्र० शाहूनेंच पाठविलेलें आहे. *हस्ताक्षर निराळें.

विनंति सेवक खंडेराऊ गायेकवाड दडवत विनंति विज्ञापना येथील क्षेम ता। पौंश शुध्य ५ पर्येत (साहे)बाचे कृपादृष्टीकरून सेवकाचं वर्तमान येथा(स्थि)त असों साहेबी क्षेम लेखन करावयासि आज्ञा केली पाहिजे रुपावंत होऊन पत्र पाठविले ते उतम समई पावोन मस्तकी वंदिले साहेबी लिहिले की श्रीमंत राजेश्री——राऊ सेनाखासखेल यानी पत्र लिहिले आहे त्याचा आर्थ ध्यानात आणून कूच करून येणे दुसरा विचार न धरणे तुमच्या मणोदयानरूपे करून देऊ येैसे लिहिले तर आमचा मनोरथ पूर्ण करणार साहेब समर्थ आहेत साहेबांवितरिक्त दुसरा विचार जाणत नाही सर्वोप्रकारं भरोसा साहेबांचा आहे येंदा या प्रांती प्रज्यन्य नाही याजमुळें उदकाचा व चान्याचा दुस्काल आहे कितीक विस्तार श्रीमंत राजेश्रींचे पत्रीं लिहिला आहे तो विचार साहेबी ध्यानास अणावा आपण सेवक लोक आसो रुपा[1] लोभ असो दीजे हे विज्ञापी

---

## दाभाडयांच्या कोल्हापूरकडील इनामाचें संरक्षण

ले. ९२

श्री

{ श. इ.

तीर्थस्वरूप श्रीमत मातुश्री बाई वडिलाचे सेवेसी

बालक लक्ष्मीबाई दाभाडे व मानसिग दाभाडे चेरणावरी मस्तक ठेऊन सास्टांग दडवत विनति उपरी येथील क्षम श्रावण सुध येकादसी भोमवासरें पावेतो वडिलाचे आसिर्वादे मा। करवीर सुखरूप आसो विशेष राजश्री नारोपंतास साहेबी पाठविलं त्यास अमच घर रिकाम करून अमचे स्वाधीन स्रावण सुध प्रतिपदेस रविवारी केलं व मौजे बीड इनाम गाव येथील सनदा हुजरून वडिलाकड अल्या आहेत वरकड हक व कानू बाब पेसजी भोगवट्याप्रो सुधामत चालवावयाविसी ताकीद केली अहे कसबे मजकूरचा हक च्यार वरसीचा हिसेब करून निकाल करून घेतला या वतनाविसी सर्वस्व चालवावया बा। सकल सैभाग्यादिसंपन्ये मातुश्री—बाईसाहेबी अभिमान धरिला

१ हस्ताक्षर निराळें.

* हें लक्ष्मीबाई दाभाडे यांचें हस्ताक्षर. ह्या लक्ष्मीबाई त्रिंबकराव यांची दुसरी बायको होत.

अहे वडिलास कलाव म्हणून लिहिल असे त्यांकडून राजेश्री रुस्तुमराऊ व संकराजी सालोसे व बाबाजी सुखे वाडियातील मूल अल अहे ते स्वमुख निवेदन करितील त्यावरून सविस्तार श्रुत होईल क्षणंक्षणा पत्र पाठऊन दरबार राखावातेण करून मायन माया वडती हा दरबार पूर्वी वडिलापासून जोडिला अहे तो रक्षिलिया जागा थोर अहे येणकरून हीत व कीर्ति अहे वडिलाप्रति विशेष ल्याहावया शेरती नऱ्ह कृपा लोभ असो देणें [ निराळ्या अक्षरांत ] *हो वीनाती

---

# अमदाबादकडील प्रांतव्यवस्था व हत्ती व काठेवाडांत स्वारी

ले. ९३ { श. इ.

श्री

श्रीमंत राजश्री——राऊ सेनाखासखेल साहेबाचे शेवसी

विनंति सेवक दमाजी गायेकवाड समशेर बाहदुर कृतानंत विज्ञापना येथील क्षेम ता छ १४ माहे जमादिलाखर परियेंत साहेबाचे कृपेकरून येथास्तित असों साहेबी कृपावंत होऊन पत्री सांभाल केला बहुत संतोष जाला पत्री आज्ञा की हाती येक उत्तम स्वारी लायेक पाठवणे यास आज्ञेप्रमाणे हाती स्वारीस येक सेवेसी पाठविला अहे प्रविष्ट होईल ये प्रांतीचे वर्तमान तर आमदाबाज प्रांतीची मामलेत पूर्वी रेणको आनाजीकडे होती त्याप्रा त्याचे स्वाधीन केली आणि मोगलाईकडील माहल नवे साधले होते ते चिरंजीव रो खंडेराव गायेकवाड याजकडे स्थापिले येसे करून उभयेतां समजाऊन कामकाज चाली लाविले प्रांत मजकूरचा बंदोबस्तानिमित्य आपण आठ पंधरा दिवस मागे राहिलो पुढें रो कान्होजी ताकपीर फौज देऊन काठीवाड प्रांती रवाना केलें वरकड वर्तमान साहेबाचे प्रतापेकरून येथास्तित ++बहुत काये लिहिणे कृपा निरंतर + करावी हे विज्ञापी हाती आंबारी व गाशावरील कलस २ येसा सामानसुधा पाठविला असे हे विज्ञाप्ती

---

# दुसरे बाजीरावकालीन पुण्याचा अखबार क्र. १

ले. ९४ श्री { श. इ.

आखबार छ ८ माहे जिल्हेज रोज शुक्रवारचा मा॥ रात्री श्रीमंत आमृत-रावसाहेबानीं भोजन करून कचरीस आले नतरी विठल बाबाजी व गोविंदपंत मुजमदार

यासी हरीपंत भाव्येकडे काही बोलावयासी पाले होते ते येऊन बोलने विदित केले नंतरी हडसर किल्याहून नारोपंत चेक्रदेवाकडून जासूदजोडी येऊन कागद गुजरले नतरी श्रीमंतानी वाचून पाहिले त्यात लिहिले होते की आम्ही किल्यातून खाली उतरून आपले व होलकराकडील फऊजत सामिल जालो पुन्यास येऊन आपल्याजवल येतो ऐसे पत्र श्रीमंतानी वाचून जासूदजोडीस बारा रुपये विनाम देऊन मग मंडली बारखास जाली आपण बारा घटका. रात्रीं निद्रस गेले प्राथःकाली श्रीमंत आमृतराव साहेबानी स्नानसंध्या करून कचरीस आले नंतरी विठल बाबाजी व विठलपंत लघाटे व गोविदपंत मुजमदार व बापू चिटनीस व लक्षुमणराव फडके व आबाजी त्रिंबक आले नमस्कार जाले नतरी यासी बोलणे करून मुजमदार व विठल बाबाजीस हरीपंत भाव्येकडे काही बोलने करावयास पाले नतरी रात्री शेहरात हलालखोर याचे घरावर दरवडा पडला म्हणून हलालखोर मिळून फिर्याद आले ते ऐकून काही उतर केले नाहीं मंग दोण प्रहरी भोजन करून हिऱ्या बागात जाऊन निद्रा करून आस्तमानी साहा घटकानी उठले तो लक्षुमनराव फडके व त्रिंबकराव पेठे व बापू चिटनीस आले नमस्कार जाले नतरी यासी बोलत बसले तो आनदराव होलकर आले रामराम जाला नतरी श्रीमंत व होलकर व मतराम पवार व होलकराकडील महीपतराव वकील ऐसे याचे घटकाभर बोलने जाले उपरी मंडली बारखास जाली मग आपण पालखीत स्वार जाले ते डेरियास येऊन संध्या करून दोन घटका रात्री कचरसि येऊन बासले नतरी हरिपंत भाव्येकडून गोविदपंत मुजमदार व विठ्ठल बाबाजी येऊन नमस्कार करून बोलत बासले शेवसी श्रुत हाये हे विज्ञापना

ताा सुरगपटा वाले फिरंगीकडील दाहा पंधरा पलटने काही तोफा तुमभद्राचे कडेस हरीहरावर येऊन उतरले शिवाये पाचसात पलटने सोनारीकडे आले आहेत येने प्रमोने वर्तमान आहे हे विज्ञापना

ताजाकलम राजेमान्ये रो येशवतराव बाबा सेनापती साहेबाचे शेवसी आज्ञाधारक गोविदराव आखबारनवीस आमचा रामराम विनती उपरी ऐसं जे आपण हैबतरावबरोबर श्रीमंत बाळाबाईचे नावे थैली पाली ती डाकेत रवाना केली आमचे नावेही पत्र पावले लिाा मार समजला आपले लिहिलेवरून च्यार गडी नवकर ठेवले दर रोज आखबार लेहून आपणाकडे रवाना करीत जाऊ येथील वर्तमानविसी चिता करू नये फार काये लिाने हे विज्ञापना

# पुण्याचा अखबार क्र. २ रमणा दक्षणा

ले. ९५ { श. १७२९ श्रावण शु. ६
श्री { इ. १८०७ आगष्ट ९

अकबार छ ४ माहे जमादिलाखर रोज रविवार श्रीमंत प्राथःकाली उठले मुखमार्जन करून बसले ते समई अन्याबा राहनेकर व नारोबा आवटी येसे आले व श्रीमंताणी त्रिंबकजी डेंगल्यास आज्ञा केली की रमन्यात रुपये लवकर पाठवावे व चोबदारास ताकीद केली की दरोबस्त सरदार मंडलीस बोलाऊन आणावे याप्रमाणे ताकीद करून श्रीमंत स्नानसंध्या करून देवघरात गेले तो बालशास्त्री टोकेकर व रामचंद्र गोसावी व बापू कवडीकर असे येऊन त्यांचे नमस्कार व भट शास्त्री [ याचे ] आसीर्वाद होऊन देवपूज्या करून नित्य दान देऊन बारा घटका दिवस अल्यावर श्रीसांभाचे दर्शन घेऊन दिवानखान्यात अले नंतर आइन्याचे आबारीस व स्वारीची ताकीद करून श्रीमंत फरालास गेले फराल करून दिवानखान्यात आले पोशाख घेऊन आंगावर जोहार डागीणे सिरपेच व कलगी व पाचाचा तुरा व चवकडा व सीगा व मोत्याची कंठी व पाचाची कंठी व पवच्या व आंगठ्या येसे आंगावर घेऊन बसले तो आबा सेळूकर व पांडुरंगपंत ढमढेरे व जीवनराव सुमंत व बालशास्त्री टोकेकर व निलकंठराव पुरंधरे वगैरे येसे येऊन मंडलीचे नमस्कार होऊन दोन प्रहरी खाली येऊन श्रीरामचंद्रजीचे दर्शन घेऊन श्रीमंत आइन्याचे आबारीत स्वार जाहले व खवासीत पांडुरंगपंत ढमढेरे येसे स्वार होऊन रमन्यात श्रीमंती दरवाज्यावर जाऊन तेथे बसले तो मागोन सदासीव मानकेश्वर व खंडेराव रास्ते व विठलराव नरसिंग विंचूरकर व माधवराव रास्ते व शामराव रास्ते व गोपालराव राज्या बहादर भैया राजा बहादर व गणपतराव पानसे व येशवंतराव पानसे व बालाजी लक्ष्मण व कासीपंत निा विंचूरकर व तात्या मुजमदार व गोविंदराव खासगीवाले वगैरे येसे येऊन मंडलीचे नमस्कार होऊन मागील चवदा घटका दिवस राहता श्रीमंताणी दक्षेनास प्रारंभ केला व पंचेवीस तोफा सोडावयास आज्ञा दिल्ही व सदासीव मानकेश्वर यासी व आन्याबा राहतेकर यासी श्रीमंती दरवाज्यावर दक्षेना देयाची सांगितली तेथून श्रीमंत दुसऱ्या दरवाज्यावर अले तेथे ब्राह्मणास दक्षेना देऊन धोंडभट भागवत यासी त्या दरवाज्याचे काम सांगितले तेथून श्रीमंत तिसऱ्या दरवाज्यावर येऊन तेथील दक्षेनाचे काम पानशास सांगितले तेथून श्रीमंत चवथ्या दरवाज्यावर येऊन तेथील दक्षेनाचे काम शामराव रास्ते यासी व गोविं [ अपूर्ण ]

---

# दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर आणि रजपूत व फिरंगी

ले. ९६ श्री {श. १७२६ / इ. १८०४}

श्रीमंत राजश्री यशवंतराव दाभाडे सेनापती साहबाचे सेवेसी

आज्ञाधारक मिरधानी मुकाम पुणें राम राम विनंती विज्ञापणा येसी जे श्रीमंत राजश्री दौलतराव शिंदे यानी फिरंग्यापासून पण्णस लाख रुपये घेऊन आपली वीस × × × फौज जेपुरवाले याचे कुमकीस × × × सुर जाल्यापासून ही ही का × × × व जेपूरवालचे कुमकीस फिरंगी याची साहा पलटणे होती व राजश्री येशवंतराव होलकर याची पण तास हाजार फौज जोतपुरवालयाचे कुमकीस गेली त्यानीही काही जोतपूरवाले याजपासून पैका घेऊन जैपुरवाले व जोतपूरवाले याची लढाई होऊन होलकर यानीं फिरंगीयाचे पलटण लुटली व जैपूरवाले पलून जेपुरास आले भवताला वेडा येशवंतराव होलकर याचा आहे जैपूरवाले याची बहुत खराबी जाहाली आपल्यास कलावे खुसरुसेट मोदी आज तलेगावचे मुकामी येणार आपण तीस रुपयाची चिठी दीपचंद मारवाडी याजवर दिल्ही त्यास मारवाडी यानी आम्हास रुपये दिल्हे नाहींत त्यास आपण सांगून आता कोण्यापासी रुपये देवावे बहुत काय लिहिणे ( हे विज्ञा × × (विज्ञा)पना।

साहेबाचे सेवेसी अमृंता खबरदार याचा रामराम विज्ञापना

---

# दौलतराव शिंदे, महिपतराम राजे व होळकर

ले. ९७ श्री {श. / इ.}

श्रीमंत राजेश्री रावसाहेब दाभाडे सेनापती साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक आमृता डाकवाला मुा पुणे दंडवत विज्ञापना विशेष गगाजी जासूद या समागमे आज्ञापत्र पाठविले ते पावले पत्री मा। बातमी × × लिग श्रीमत राजेश्री दौलतराव सिंदे याचा मुकाम खागंरावींच आहे व राजेश्री यशवतराव होलकर याचे कूच होऊन महेश्वरास येणार व राजे महिपतराम थालनेरावर जमाव धरून आहे पेशजी आपल्यास पत्र पागा वगैरे लस्करातून येसी म्हणोन लिहिले होते परतु महाद्जीचा वाची रास रूपाबाई उजणीहून चाभारगोंद्यास यती याकारिता बनता पडली होती व यद्दा लग्नाचा बेत दिसत नाही वरकड मार वेथे श्री × × × शेवेसी श्रृत्य होये हे विज्ञापना

सा घोडनदीहून पलटन व विंचुरकर जात्या व रास्ते हे कुच करून नगराजवळ गेले व मोगलाकडील फौज पलटण येऊन आजंठ्याचे घाटाजवळ उतरले आहेत व राजे महिपतराम याजला होलकरी सरदार दामणखान व बंगश व भारमलदादा येसे सामील होणार नवलविशेष वर्तमान जाहाल्यास त्या घटकेस सेवेसी लेहून रवाणा करीत जाईन

---

## राजे महिपतरावाचा नबाबाचे मुलखांत दंगा

ले. ९८ श्री { श. / इ.

सेवेसी आमृतां खबरदार नि॥ डाक रुतानेक विज्ञापना फाल्गुन वद्य १२ द्वाद्सी पर्यंत सेवकाचा वर्तमान यथास्थित आसे यानंतर श्रीमंत महाराज कोपरगावी वा॥ येकादसीस मातुश्री आनदीबाईचे श्राध घालून संवछर प्रतिपदेस पुन्यास येणार होते परंतु हैद्राबादवाले नबाब याजकडील राज्या महिपतराव याणी बंड करून नबाबाचे मुलखात दंगा करू लागले म्हणोन मोगलाकडुन फौज व पलटण त्याजवर चालून आले पधरा कोसाचे दरम्यान उभयेताचा आंतर राहून राज्या महिपतराव यानी रात्रीस छापा घालून फौजतील सरदार मारून मोगलाकडील फौज पलटणे सिकस्त खाऊन माघारी गेले मागती हैद्राबाजेहून जमाव करून महिपतराव याजवर येत आहेत परंतु महिपतरायाणी श्रीमंताचे मुलखात खंडन्या घेऊन दर कुच गंगातीरी पैठणास आले नंतर बिडाहून सखो रुद्र दोन हाजार सरंजाम घेऊन बिडावर चालून गेले त्याची याची लढाई होऊन सखो रुद्राचा मोड होऊन बिडास गेला व राज्या महिपतराव गांडापूर, वैजापूर प्रगन्यात धामधूम करीत आले म्हणोन श्रीमंताणी राजश्री शामराव रास्ते व विंचुरकराकडील फौज यां दोनतीन हाजार तोंडावर ठेऊन वा॥ ७ शुक्रवारी आपण कुच करून निघोन निघगाव जाळीचे येथे आले तेथे बयाजी ना॥ जाधले याणी आपल्या वाड्यात नेऊन दोन हाजार रुपयाचा पोषाख दिल्हा सेरीज सात हजाराची कंठी व घोडा देऊन त्रिंबकजी डेगले याणीहि यक पोषाख दिल्हा तेथून स्वारी निघोन आसीस मुकामास आले [1]अष्टमीस शनवारी आसीहून कूच होऊन बुनगे साकुरास मुकामास आले खासे सडेश्वारीसुध। ताहाराबाजस हरिभक्त परायण विठल गोसावी याचे येथे गेले त्याची मेजवाणी घेऊन साकुरास बुनग्यात आले नवमीस रविवारी कुच होऊन मंगरुल पारगावास मुकाम येऊन केला।

---

१ येथून दुसरा कागद सुरू झाला. त्यावर 'पुरवणी बद रावसाहेबांचे सेवेसी' असें प्रारंभीं लिहिलें आहे.

दसमीस सोमवारी कूच करून दावडीनिंबगावास आले येकादसीस श्रीमंस कैलासवासी आनंदीबाईचे श्राध्ध भीमातीरी घालून द्वादसीस पुण्यास येणार कर्णेल बाहदर याची घोडनदीवरील पलटण राज्या महिपतराव याजवर जावयाविसई तयारी होत आहे व सरकारीनींहि मिरजवाल्यास व निपाणकरास पत्र लेहून सादर केले आहेत कर्णेल बाहादर याणी सिंदेहोलकर याचे वकिलास बोलाऊन नेहून खानदेस प्राती मामलेदारास पत्र लेहून घेतलेकी राज्या महिपतरायास सामील होऊ नये आम्ही रसद पोचऊ नये याप्रो मामलदारास पत्र घेतले आहेत राज्या महिपतराव बारी उतरून खानदेशात गेले

---

## दुसरे बाजीरावाची चिदंबरस्वामीस भेट

ले. ९९

श्री

शा. १७२९ मार्ग. शु. ५
इ. १८०७ नोवें. ४

आकबर छ ४ माहे शवाल रो शुक्रवार मुकाम नवलगुंद श्रीमंत् प्रातःकाली उठोन मुखमार्जन करू(न) कुच्याची आज्ञा करून आपण स्नान संध्या क(रून) देवपुजा करून × घटका दिवस आलियावर श्रीसांबाचे दर्शन घेऊन बारा घटका-दिवस (अलियावर) × × × स्वार जाले चितांबर स्वामी यांचे दर्शनास गेले. दर्शन घेऊन स्वामींनी श्रीमंतास प्रसाद येक शालजोडी व पागोटे व यक कंठी व सौ ताईसाहेब यास चोळी पातळ व सदासीव माणकेश्वर यास येक शेलापागोटे व त्यांचे बायकोस चोळी पातळ व आपाजीराव निपाणकर व चिंतामणराव मिरजवाले व आपासाहेब तासगावकर व त्रिंबकराव कुरुंदवाडकर व बालासाहेब मिरजकर याचे चिरंजीव बळवंतराव मिरजकर व माधवराव रास्ते व विठलराव नरसिंग विंचूरकर वगैरे सरदार खासे आसाम्यास स्वामींनी सेले पागोटी दिली व श्रीमंताकडील शास्त्री व भट मंडळी व शागीर्द मंडळी यास येक यक धोत्रजोडा दिल्हा नंतर श्रीमंतानी स्वामीस दाहा हाजार रुपये याची देवपुजा देत होते परंतु स्वामींनी देवपुजा काही घेतली नाही श्रीमंतानी आपले डेन्यास येऊन दोन प्रहरी भोजन केले आराम करावयास गेले. मागील च्यार घटका दिवस राहाता आराम करून उठले संदेकाली संध्या करून पालखीत स्वार जाहाले. नंतर स्वामीचे दर्शनास गेले. दर्शन घेऊन स्वामींनी श्रीमंतास व सदाशिव माणकेश्वर यास व माधवराव रास्ते यास पंक्तीस घेऊन फराळ करून नंतर स्वामींचा निरोप घेऊन साहा घटका रात्री स्वार होऊन दोन प्रहरा रात्रीस नरगुंदास आले मुकामास आले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

# दु. बाजीराव कुरुंद्वाड येथें

ले. १०० श्री { श. १७२९ मार्ग. शु. ११ / इ. १८०७ डिसें. १० }

आकबार छ १० माहे शवाल रोा गुरुवार मुा कुरुंद्वाड श्रीमंत प्राथःकाली उठोन मुखमार्जन करून स्नानसंध्या करून देवघरात गेले भट शास्त्री यांचे आर्सावाद होऊन देवपूजा करून नित्यदान देऊन श्री सांबाचे दर्शन घेऊन नंतर श्रीकृष्णेस गेले. तेथे श्रान करून तेथून डेन्यांत येऊन कैलासवासी सौ ताईसाहेबांचे वरसिश्राध म्हणोन श्राधास ब्राह्मण आा पांच व सुवासीन येक ऐसीयास भोजनास घालून श्राधाचे ब्राम्हणांस तीनशे रुो प्रमाणें दक्षणा देऊन व शालजोडी येक येक व धोत्रजोड येक येक व लोटी तांब्या येक येक व सुवासीनीस चोळीपातळ व येक शालजोडी व तीनशे रुा दक्षिणा देऊन आपण यकादसी म्हणोन फराल करून दोन घटका आराम करून उठले नंतर सदाशिव माणकेश्वर यांची मातुश्री यास पुण्यात देवआज्ञा जाली होती त्यास आजचा तेरावा दिवस म्हणोन श्रीमंत पालखीत स्वार जाले ते सदासिव माणकेश्वर यांचे डेन्यास गेले त्यास तेथे दुखोटा करून तेथून स्वार जाले ते कुरुंद्वाडांत श्रीराम-चंद्रजासि गेले देवदर्शन घेऊन देवापुढे यक मोहोर ठेवून तेथून स्वार जाले नंतर त्रिंबकराव कुरुंदवाडकर याणी दारू नल्या हावया सोडल्या घटका रात्रीस श्रीमंत डेन्यास आले नंतर कोल्हापूरवाले राजे यांजकडून मानसिंगराव पाटणकर व घोरपडे सेनापती आले त्यांची भेट होऊन त्यानी श्रीमंतास विनंती केली कीं कोल्हापुरास मेजवानीस चलावे श्रीमंत बोललें कीं मेजवानीचे काही काम नाहीं आसें सांगितले पाटणकर व घोरपडे वरखास जाले तो मिरजेहून बाळासाहेब मिरजवाले आले त्यांची भेट होऊन श्रीमंत संधेस गेले तो बळवंतराव नागनाथ आले. त्याणी कोल्हापुरास जावेयास निरोप श्रीमंतासी मागितला निरोप घेऊन गेले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

ताजा कलम सदासिव माणकेश्वर यांस दरोबस्त लोकानी दुखोटे केले हे विज्ञापना

---

# दु. बाजीरावाचा कोपरगांवीं मुकाम

ले. १०१ श्री { श. १७२९ माघ वद्य ११ / इ. १८०८ फेब्रु. २२ }

आकबार छ २४ माहे जिल्हेज रोज सोमवार मुा कोपरगाव श्रीमंत प्राथःकाली स्नानसंध्या देवपुज्या करून बारा घटका दिवस आल्यावर दुसरें गंगवर श्रान होऊन

वाड्यांत आले यकादसी म्हणोन श्रीमंताणी फराल करून आराम केला. नंतर श्री शुक्रेश्वर महाराजाचे देवालयात केर्तन करवून तिसरा प्रहरी देवाचा छाबिना काढून श्री कचेश्वरास गेले तेथें अर्धी होऊन मागती शुक्रेश्वरास छेबिना आनला परंतु श्रीमंत वाड्या बाहीर निघाले नाई दिलगिरीत होते त्यातील कारण मिळून विंचूरकराकडील कारभारी बापाजीपंत खानदेशातून पाचसे सरजामा सुधा श्रीमंतास भेटावयास आले होते त्याची पूर्वी वाटेवर भेट होऊन समागमेच कोपरगावचे मुकामी येऊन बापाजसि सेणिपात जाहला दोनच्यार दिवस आराम नव्हता त्यासी आज देवआज्ञा जाहाली त्याची स्त्री सयागमण बरोबर घ्यावयासी सीध जाहाली मग विठल नरसिंह विंचूरकर व बालाजी लक्ष्मण याणी त्या बाईस आग्रये केला की सयागमण न घ्यावें आम्ही तूज चालवू येसे बोलणें जाहाले परंतु बाईचा आग्रये सयागमण घ्यावयाविसई फार पडला मग विंचूरकर याणी सयागमणाची आरास गंगचे काटी करून बाईस वाजंत्री लाऊन मिरवत सयागमणाचे जवल आणिली. परंतु त्याबाईस नूतन नवा महिन्यांची कन्या होती तिने आपले भईणीचे स्वध्यान केली मग सयागमण घेतले तेव्हां श्रीमंत व विंचूरकर व बालाजी लक्ष्मण दरोबस्त लस्कर बहुत कष्टी जाहले सरदार उमेवार होतात हे विज्ञापना

---

## श्रीमंत चिमाजी रघुनाथ यांजकडील वार्तापत्र

ले. १०२ श्री { श. १७२७ फाल्गुन वद्य ५ / इ. १८०६ मार्च ९ }

अखबार छ १७ माहे जिल्हेज रोज रविवारचा मजकूर प्राथःकाली श्रीमंत आपा साहेबांनीं स्नान संध्या देवपुजा करून शास्त्री पंडिताचे आसिरवाद जाले नंतर भोजेन जालें आज पंचमीमुले रंग थोरले वाड्यात केला होता सदाशिव माणकेश्वर गेले होते तेथउण आल्यावर कारभाऱ्यानी आपलाले घरी रंग केले होते सौ काकूबाई याणी कारभाऱ्याच्या बायेका व आनीक शेहरातील ग्रहस्थाच्या बायका हळद कुकु करिता बोलावून नेल्या होत्या मग उभयेता कारभाऱ्या नी पत्र लेहून श्रीमंताकडे डाक रवाना केली बापुजी गणेश गोखले याचा मुकाम कुसी सावलीवर आहे पंतप्रतिनिधी आपले फौजासुधा वरधनगडा खालते आले आहेत येणेंपमाने वर्तमान असे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

## दु० बाजीराव पेशवे व गाठ्या व रेडक्यांची टक्कर

ले. १०३ पुरवणी २ { श.
इ.

(श्री)मंत थोरल्या हवेलीत जाऊन स्नान करून भोजन करून तालीमखान्याचे दिवानखान्यात आराम करावयास गेले नंतर मागील साहा घटका दिवस राहता जुन्या वाड्यातून आपासाहेब अले ते तालीमखान्याचे दिवानखान्यात बसले व नंतर मागील च्यार घटका दिवस राहता श्रीमंत उठले नंतर आपासाहेबाचे नमस्कार होऊन आपासाहेबाणी श्रीमंताचे गल्यात गाठी घातली व श्रीमंताणी आपासाहेबाचे गल्यात गाठी घातली नंतर बोलव बसले तो गवल्याचे हेले अणोन झुंजाया लाविले येक्या हेल्याची लढाई मात्र जाहाली बाकीचे हेले पलून गेले नंतर खंडेराव रास्ते व राघो मल्हार व जीवनराव सुमंत व बाबुराव कात्रे व गणपतराव पानसे व चिंतोपंत देशमूख व धाकटा मेहुणा व सावकार मंडळी सदाशीव नाईक वानवले व पुरुषोतम मुरलीधर (या)चा चिरंजीव दुलभसेट याचा चिरंजीव व अमरचेंद खिरदीचेंद व हरिभक्ती याचे चिरंजीव व दयाराम आत्माराम वगैरे सावकार मंडळी येसे येऊन त्यानी श्रीमतास गाठ्या यकयक व नजर पुतली व कोन्ही मोहोर येसे नजर करून श्रीमंताणी सावकारमंडळीस गाठ्या दिल्ह्या नंतर आपासाहेब व सावकारमंडळी बरखास जाहाली श्रीमंत रेडक्याचे लढाया पाहत बसले नंतर श्रीमंताणी म्हेहुन्यास खुनऊन जीवनराव सुमंत याचे पागोटे पाडले संध्याकालपरयत गमत करून श्रीमत संध्यास गेले वगैर बरखास जाहले हे विज्ञापना

---

## पंत प्रतिनिधी साखरपाणी मात्र घेतात

ले. १०४ पुरवनी २ { श.
इ.

त्याचे नमस्कार जाहला नाई ते उठोन आपल्या घरास गेले श्रीमंत घटका रात्री खाली येऊन श्रीरामचेंद्राचे दर्शन घेऊन थोरल्या हवेलीत संध्यास गेले सेवसी श्रूत्य होये हे विज्ञापना

ना। जुन्या वाड्यातून श्रीमंत आपासाहेब मागील प्रहर दिवस राहता पालखीत स्वार जाहले ते पाशानास गेले देव दर्शन घेऊन तेथून स्वार जाहले ते जुन्या वाड्यात आले व खुसरूसेट मोदी आज प्राथःकाली बेटावरून कूच करून गेले व सुर्तेहून यक पलटण काली आज पुन्याचे मुकामी अले व श्रीमंत पंतप्रतिनिधी अद्यापपरयत स्नानहि करीत नाईत व भोजनहि करीत नाईत मात्र साकरपानी घेतात सेवसी श्रूते होई हे विज्ञापना

---

## श्रीमंत आप्पासाहेब व हुताशनी

ले. १०५ श्री { श. १७२७ फाल्गुन शु. १५ / इ. १८०६ मार्च ४ }

अखबार छ १२ माहे जिल्हेज रोज मंगलवारीचा मज्कूर आज हुताशनीचे दिवसी प्राथकाली श्रीमंत आपासाहेबांनीं श्रानसंध्या देवपुज्या होऊन शास्त्री पंडिताचे आसीरवाद जाले नंतर दोण प्रहरी भोजन जालें कारभारी आपले आपले घरीच होते पंत प्रतीनिनिधीकडील मार बोलावयास खडे दीक्षित वाविकर व त्याजकडील कारकून कृष्णाजी भवानीकडे प्रहर दिवसानी आले अडीच प्रहर परयेत खलबत जाले कागदपत्र तयार होऊण सदाशिवभाऊकडे पाठविले सायेकाली हुताशनी पूज्या करावयास श्रीमंत आपासाहेब थोरले वाड्याचे दरवाज्या पुढें येऊन होलीची पूजा केली कारभारी यानी आपले आपले घरीं होलींची पूजा केली येणेंप्रमाणें वर्तमान आसे शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना विनंती उपरी साहेबानी कृपा करून पत्र पाठविले ते पावलें मोन्होगराम मार लिहिला तो समजला काल लष्करची डाक हिंदुस्तानातून आली तेथील अखबार आला आहे उदईक आथवा परवाचे दिवशीं साहेबाकडे पाठवूण देतों ते काम कृपा करूण लवकर करावें सरव भरवसा साहेबाचाच आहे फार काय लिहिणें कृपा लोभ आसो द्यावा हे विनंती

---

[ भाग पहिला समाप्त ]

# सेनापती दाभाडे दफ्तर–भाग १

## व्यक्ति–स्थल–सूची

पुढें दिलेल्या सूचींत व्यक्ति–व स्थल–नामें अकारादि वर्णानुक्रमानें दिलीं असून नामापुढील कंसांत नामाचा शककाल दिला आहे व त्यापुढें लेखांक आहे. जेथें हा अंक लेखांक नाहीं पृष्ठांक आहे, तेथें पृ. असें दिलें आहे. ऐतिहासिक नामें पहातांना येसाजी–एसजी, शिदोजी–सिदोजी, उक्षर–ओक्षर, असा फरक असतो. तसेंच लेखामध्यें एकदांच तें नांव येतें असें नाहीं. म्हणून लेख संपूर्ण पहावा व त्या दृष्टीनें सूचीचा उपयोग करावा. ओ–औ–नंतर अनुस्वाराची स्वतंत्र बाराखडी दिली आहे व त्यानंतर जोडाक्षरें आहेत. सूचीचे कामीं चिरं० मोरेश्वर याचेंहि सहाय्य झालें आहे.


अ–आ–कोले (१६३८–४९) २३,६७
अजिठ्याचा घाट ९७
अ–आढळराव २३
अढले बु॥–पौनमावल (१६४५)४९,५१
अनवर्दीखान (१६६५) ७७
अन्याबा राहतेकर ९५
अमरचेंद बिरदीचेंद १०३
अमाजी दाभाडे (१६४४) पृ. ३७
अमृतराव ले. ८७, ९४
आमृता डाकवाला ले. ९७,९८
अर्जोजीराव ढमाले देशमुख (१६२८)१६
अवसरी बुद्रुक (१६४३) ४०
असदखान ५४
असोली खुर्द (१६२३) १२
आनाजी ९३
आनंदराव होलकर ९४
आनंदीबाई ९८
अपाजी चागुल (१६४०) २९
आपाजीराव माणकेश्वर ९९
आपा–चिमाजी दुसरे १०३–०५
आपासाहेब तासगांवकर ९९
आबाजी खलाट (१६४३) ४०
आबाजी त्रिंबक ९४.
आबाजी नारायण कानिटकर (१७२२) ८४
आबा सेळूकर ९५
आबोजी देशमुख (१६४०) ६२
आचोली (१६२३) १२
अशी गांव ९८
उज्ज–णी–नी ९७
उक्षर ६२
उधावा नाईक मवाल २३
उमाजी पाटील २३
उमाबाई दाभाडे–खंडेराव पत्नी (१६३९, –४१, ४३,–४५–६६) २७,३४टीप, ४१,४८,५७,७०, ७२, ७८– ८१, ८६, ८८–९०
उरसें मौ. पौनमावळ (१६१८) ८, (१६४६) ५१
उराडे मौ. (१६२३) १२
एरंडे (१६५३) ७२
औरंगाबाद (१६४५) ६२
अंताजी चलाल सुभेदार (१६४२) ३६, (१६४६–४७) ५१,६५

अंताजी माहादेव (१७५८) ८४
अंताजी माणकेश्वर (१६७६) ८२
अंताजी मुधाजी कुलकर्णी ओझर (१४३२) १
अंताजी लक्ष्मण कुलकरणी (१६४५) ६३
आंतावा नाईक गुंड (१६४०) २९
अंबाजी अनंत (१६६६) ७८
अंबिकाबाई दाभाडे ८६, ९०, ९१
आंबी (१६४२) ३७
इंदोरी (१६१८–५३) ७, ३३, ७२, – तलेगांव (१७२२) ८५
उंबरे (१६३१) २१
उंबरे दार उं० (१६४६) ५३
उंबरे नवालाखाचें (१६०८) २,२४
औंध २३
कटापूर (१६४७) २५, ६६
कडूस का॥ (१६४६) ५२
कहोली मौजे (१६२३) १२
कमल पा॥ कावेर–पारनेर (१६४६) ५३
करदी पा॥ पारनेर (१६४६) ५४
करवीर ९२
करंज–पौनमावल (१६४५–५३) ४९, ५१, ५५, ५६, ६६, ७२
कर्णल बाहादर ९८
कर्नाटक (१६१३–६५) ५,१०,७७
कर्यातमावल (१६४०) २९
कन्हेपठार तर्फ (१६१६–२८) ६, १६
कलस मौजे (१६४९) ६७
कल्याण प्रांत (१६२३) १२
काकूबाई सौ० १०२
काठेवाड प्रांत ९३
कान्हूर तर्फ (१६२५) २५, ४८
कान्होजी कमाजी घारे दोस–मुर्द्रेत (१६४६) ५१
कान्होजी ताकपीर ९३
काले मौ. (१६४६) ५१
कालोजी भोसला (१६४९) ६७
कावे मौजे (१६२३) १२
कासपे मौजे (१६२३) १२
कासी केशव कुलकर्णी (१६५०) ६९
कासीपंत नि॥ विंचूरकर ९५
कासीबाई दाभाडे (१६४३) ४४
कासी विश्वनाथ (१६६७) ८१
काळभोर देशमूख–औंध २३
काळोजी भोसले (१६३९) २८
किरकटवाडी मौजे (१६४०) २९
कुरली मौ० (१६४३) ४१
कुरुंदवाड १००
कुरोंडा घाट (१६३१) २०
कुंडे बु॥ व खुर्द (१६२३) १२
कुंवर बहादुर (१६४९) ६७
कुसाजी सिदोजी जाधव वाघोली (१६४०–४५) २९, ६३,६४
कुसो सावली १०२
कृष्णाजी दाभाडे (१६६३) १६, लेखाशिला ४०–४२–४८,५०, ७०
कृष्णराव महादेव सुभेदार–जुनर (१६४८) ५९
कृष्णाजी परशराम प्रतिनिधी (१६५०) ६८
कृष्णाजी पाटील पवार–सुपे (१६४६) ५४
कृष्णाजी सोमाजी दाभाडे पा॥ पौडखोरे (१६२८) १६,५०
कृष्णाजी भवानी १०५
कृष्णाजी हरी देशपांडे (१६२५) १५
केडगाव तर्फ (१६२५) १५
केदारजी बोत्रे सेनाबारासहस्री (१६२५) १४

करे मौजे (१६२३) १२
केशवजी पायगुडे (१६५०) ६९
कोढगाऊ ६०
कोतूल परगणा प्रांत हरिश्चंद्र (१६४१) ३४
कोथुर्णे पौनमावल (१६४५–४६) ४९, ५१
कोपरगांव ९८
कोरेगांव–वाई (१६४०) २९
कोल्हापूर पर.(१६२४-३६)१३,२२,७८
खर्ड्याची लढाई (१७२२) ८५
खरे दीक्षित १०५
खातगाऊ (१६२५) १५, (तर्फ१६४८) ६०
खानदेश (१६५१) ७०, ९८, १०१
खानवडी (कन्हेवाडी) १६
खुसरूशेठ मोदी (१७२६) ९६, १०४
खेड ता–जुन्नर प्रा (१६४०) ३१
खंडेराव रास्ते ९५, ९९, १०३
खंडोजी येसाजी दाभाडे (१६०८) ४, (१६१९) ९, (१६२०) १०, (१६२३) ११–अदिकारी १२,–देशमूख – कोल्हापूर (१६२४) १३ (१६२८) १६, (१६३०) १७, (१६३१) १८–२१, (१६३६) २२, २५, (१६४०–४२) २९, ३१, ३३, ३७, ३८, –देसाई ३९, – सेनाखासखेल (१६४१–४२) ३५, ३६, (१६४३) ४३, सेनापती (१६४५) ४७, (१६४६) ५२, पाटील ५३,५४, दाोख, तो पौनमावल (१६४६–४७) ५१, ५५, ५६, – सेनाखासखेल (१६४८) ५७, ५८, ५९, ६० (१६४६) ६४, (१६४७) ६५,६६, (१६४९) ६७, (१६५०) ६८, ६९, (१६५१) ७०, ७१, ७७,८६ ९१, ९३
खंडोजी (१६५०) ६९
खंडोपंत (१६४५) ६२
गणपतराव पानसे ९५, १०३
गणेश महादेव सुभेदार व नामजाद (१६४६) ६४
गदाधर भट (१६२५) १४
गहुजे मौजे (१६५०) ६९
गाताडे मौजे (१६२३) १२
गार मौ (१६४५) ४६
गिरजोजी बोडके (१६५०) ६९
गिरमाजी धुंगो देशपांडे वांई (१६४५)६४
गिरे ताम्हणखोरे–पौडखोरे (१६४२) ३९, (१६४५) ४७
गुलसई (१६२३) १२
गोपाळराव त्रिंबक (१७२२) ८५
गोपाळराव राज्याबहादर ९५
गोमतीबाई देशपांडे (१६२५) १५
गोमाई (१६४६) ५४
गोमाजी कदम (१६४६) ५३
गोरोजी नाईल लोहट (१६४०) ३०
गोविंदपंत मुजुमदार ९४.
गोविंदराऊ ढमाले दाोख – पौडखोरे (१६४०) २९, ३०
गोविंदराऊ खाजगीवाले ९५
गोविंदरा (व) मामा ८७
गगाजी जासूद ९७
गंगाजी पवार ८६
गंगाजी बाबा मवाळ महापुरुष २३
गंगातीर २३

गंगाबाई जाधव ( १६४० ) २९
गांडापूर ९८
गोंदजी सयाजी पाटील जाधव (१६४६) ५३
गोंदजी शिंदे ( १६४१-४२ ) ३५,३६
घारे तर्फ ( १६४६ ) ५१
घोडनदी ले. ९७
घोडनदी ९८
चाकण परगणा-प्रांत जुनर (१६०८) ४, (१६३१) १८,२३,(१६१८) ७,४१, (१६४०-४१) २९,३०,३३,४०(तर्फ १६४३-४४)४२,४५,(प्रांत१६४६) ५३,५९,(१६५१) ७१
चापाजी गाइकवाड-चोंगुला चांदखेड (१६४१) ३५,३६
चापाजी ढमाले नाईक २५, (१६४७)६६
चारवली (१६२३) १२
चास मौजे (१६४९) ६७
चिखली मौ (१५९५) २
चिमणाजी दामोदर पंडित मुख्य प्रधान-मुद्रा (१६५०) ६८
चिमणाजी भानजी नाईक (१६२५) १४
चोची खाडपे २३
चंदनगडची माच (१६४५) ६३
चंद्रसेन (१६४९) ६३
चांदखेड-पोनमावल (१६४१-४२) ३५,३६
चांदवड (१७२२) ८५
चिंचवड ( १६४० ) २९, (१६४२) ३९, (१६४५) ४७
चिंतामणराव मिरजवाले ९९
चिंतोपंत देशमुख १०३
चिदंबर स्वामी ९९
जनाजी वाघदरे (१६४५) ६२
जाणो-नो जी (१६४५-४६) ६३,६४
जिवबा नाईक भदे-कडूस(१६४३) ४०
जिजाबाई ८९
जीवनराव सुमंत ९५,१०३
जुन्नर (१६०८) ३,(१६४८-५१)५९, ७१, ७३
जुन्नरप्रांत (१६०८,-३८) ४,२४ प्रांत ३० (१६४८) ५९
जुन्नर सरकार(१६१८-२५) ७,१५, १७, (-३०) १८,१९,२०,(१६४०) २९
जैपुर १७२६ ९६
जांबली (१६२३) १२
जांमोल मौजे ता। नाणे मावल प्रा। मावल (१६४२) ६१
टिकाराम किराड (१७२२) ८५
डभई ८६
तलेगांव मौजे ( १६०८ ) ४, (१६१३) ५, ( १६१८ ) ७, २३, ( १६४०-४६ ) २९, ४०, ४५, ५३, ५७, ( १७१८ ) ८४ ( १७२६ ) ९६
ताईसाहेब ९९
तात्या मुजमदार ९५
तावजी जगथाप ( १६४८ ) ५७
ताहेराबाद किल्ला ( १६४६ ) ५४, ९८
तिमाजी रघुनाथ हणमंते प्रतिनिधी-मुद्रा ( १६१८ ) ८
तुळाजी बरगे पाटील-कोरेगांव (१६४०) २९
तुळाजी ( १६४५ ) ६३
तुळाजी कैंजळे पाटील ( १६४६ ) ६४
तेरखेड ( १६५३ ) ७२

ताभोल ( १६४९ ) ६७
तुंगारतन तर्फ प्रा कल्याण (१६२३)१२
त्रिचनापली (१६६५) ७७
त्रिंबक प्रांत–सर० दौलताबाद (१६४०) ३२
त्रिंबक चिंतामण कुलकर्णी (१६४६)६४
त्रिंबकजी–डेगले ९५, ९८
त्रिंबकजी देशमूख (१६४९) ६७
त्रिंबक रघुनाथ रेडे जोसी कुलकर्णी तळेगांव ( १६४६ ) ५३
त्रिंबकराव कुरुंदवाडकर ९९
त्र्यंबकराव ( १६५१–५३ ) ७०, ७१
त्र्यंबकराव दाभाडे सेनाखासखेल(१६३९–४०) २६, ३२, ३४, ८६, ९०
त्रिंबकराव पेठे ९४
त्रिंबक हरि देशपांडे ( १६२५ ) १५
थडी ( १६२५ ) १५
थडीवडजी–ताहुराबाद ६०
थालनेर ( १६४८ ) ५७, ९७
थुगाव–पौनमावळ ( १६४५–४६ ) ४९, ५१, ( १६४९ ) ६७
दकोजी बकोजी दाभाडे ५
दक्ष्णे–पौनमावळ ( १६४५ ) ४८
दमाजी गाइकवाड ( १६८९ ) ८३,९३
दमीण ( १६४६ ) ५३
दयाराम आत्माराम १०३
दाईबाई–गंगाजी मवाल–भगिनी २३
दाऊ हणमाजी मोढवे ( १६०८ ) ३
दादजी येसवंतजी घारे देशख, मूपतराव ( १६४६ ) ५१
दादाजी केशव ( १६५१ ) ७०
दादोपंत ( १६४२ ) ३७
दाभाडी ( १६४८ ) ५७
दाभाडे पृ. ३७, ले. ५,२२ इ. इ.
दामणखान ९७
दामाजी खंडेराऊ ( १६४३–४८ ) ४१, ५७
दामाजी नारायण–प्रां जुन्नर ( १६२३ ) ११
दारकाबाई ( १६४६ ) ५४
दावजी मुन्हे ( १६५० ) ६९
दिपाजीराव ( १६५० ) ६९
दिल्ली ( १६४५ ) ६२
दिपचंद मारवाडी ( १७२६ ) ९६
दुलभसेट १०३
देवगिरी ( १४३२ ) १
देवजी ( १६४० ) २९
देवजी पाटील मुन्हे ( १६५० ) ६९
देहु ( दु ) लोली ( १६२३ ) १२
देहु खुर्द ( १६२३ ) १२
दौलतराव शिंदे ( १७२६ ) ९५, ९७
दौलताबाद सरकार ( १६४० ) ३२
दौंड ( १६४५ ) ४६
द्वारकाई देशपांडे ( १६२५ ) १५
धाका महार ( १६२५ ) १५
धामणे–पुणे ( १६१८ ) ८, ५३
धान्या मांग ( १४३२ ) १
धावजी पाा वाघोली–दार उंबरे (१६४६) ५३
धोंडजी ( १६५० ) ६९
धोंडभट भागवत ९५
धोंडो नामदेऊ ( १६५० ) ६९
धोंडो बलाळ निजसुरे ( १७२२ ) ८५
नजी कदम–बायको ( १६४६ ) ५३
नबाब हैद्राबादवाले ९८
नरसु कामकरी ( १६४४ ) पृ. ३७

नरसोजी (१६४६) ६४
नरसो त्रिमल (१६४८) ५७
नवलगुंद ९९
नागोजीपंत (१६४५) ६२
नाणेमावल (१६३१) १९, घाट २०
नाना फडणीस ८७
नारबा (१६५१) ७०.
नारोजी देशमुख (१६४९) ६७
माहाळुंगे तर्फ नारोडी मौ. (१६४३) ४१
नारो दामोदर सुभेदार (१६१८) ७
नारोपंत चक्रदेव ९२, ९४
नारोचा आवटी ९५
नारो राम मंत्री (१६४४) ४५, (१६६०) ७४, ८८
नारो विठ्ठल खासनीस ८८
नारो शामजी ८९
नारो सामराज (१६६६) ७८, ७९
नाशीक २३, (१६४८) ५७
निघोज तर्फ (१६२५) १५, (१६४८) ५९
निजामनमुलुक (१६६५) ७७
निपाणकर ९८
निळो मोरेश्वर प्रधान (१६१६) ६
नीलकंठराव पुरंदरे ९५
नींबखेडे (१६२८) १६
नेरे ता। हवेली (१६४६) ५३
निबगाऊ मौा (१६४०) ३१
निंबगाव जाळी ९८
निंबाळकर ८८
पटथोर (१६२३) १२
किले पनाळा (१६५०) ६८
परदवडी–पौनमावल (१६४५–४६) ४९, ५१
परसराम पवार ९४
परशरामपंत (१६४५) ६३
पानशे ९५
पाचल (१६४६) ५४
पायेगुडे देशमुख (१७५०) ६९
पारनेर पा (१६२५–१७२२) १५, ५४, ५८, हवेली ६०, ७१, ७२, ८५
पार्वतीबाई दाभाडे (१६४४) ४४
पाषाण १०४
पिसाळ (१६४८) ५७
पुणें (१५९५–१७२६) २, ६, ८, २९, ८५, ९४, ९६, ९७, ९८, १०४
पुरुषोत्तम मुरलीधर १०३
पुरंदर गड (१६३१) १८
पैठण ९८
पोखरी (१६४६) ५४
पौडखोरे (१६२८–४५) १६, २९, ३९, ४७
पौनमावळ (१६१८–४६) ८, २०, २९, ३५, ३६, ४८, ४९, ५१
पंतप्रतिनिधी १०२, १०४, १०५
पंताजीपंत (१६४२–४७) ३६, ५१, ६६
पंताजी सिवदेव (१६४७) ५६, ६६
पांडवगड (१६४५) ६३
पांडुरंगपंत ढमढेरे ९५
पिंपलगाऊ (१६२५–४९) १५, ६७
प्रतापगड (१६२५) १४
प्रल्हाद निराजी प्रतिनिधी (१६१६) ६
फिकरोजी गाढवे ८७
फतेसिंग श. (१६६५) ७७
बकोजी दाभाडे ५
बज पाटील दाभाडे तळेगांव (१६४५) ५०
बयाजी नाईक जोधळे ९८
बलवंत बाबुराव (१७१८) ८४

बळवंतराव मिरजकर ९९
बसवंतराव अदिकारी १२
बहरजी (१६४५) ६३
बहीरजी सेलका (१६५०) ६९
बहिरो मोरेश्वर प्रधान (१६२३) ११,१२, (१६३१) १९, २०
बहिरो विठल कमाविसदार नामजाद, सरमोकदमी (१६४३) ४३
बहिसा सोमनाक सोनवणी (१६४६)५४
बागलाण (१६३९) २७, (१६४५) ४८,
बाजी दाभाडे (१६३६) २२
बाजीराय ८८
बाजीराव बलाल प्रधान (१६४८) ५८, ५९, (१६४२) ६१,७२,७३,८७
बाजी संभाजी दाभाडे (१६४२) ६१
बापजी सोरकर अदिकारी (१६२३) १२
बाप नाईक मल नाईक नगरे माहार मेहतर–रे (१६४६) ५४
बापाजीपंत विंचुरकर कारभारी १०१
बापू कवडीकर ९५
बापू चिटनीस ९४
बापूजी गणेश गोखले १०२
बापुजी दागट (१६५०) ६९
बाबाजी पाटील गराडे (१६४६) ५३
बाबाजी सुरवे ९२
बाबुराव कात्रे १०३
बाबूराव कोनेर श. १६६७ ले. ८०
बाबुराव सोमाजी दामाडे (१६३८–४५) २४,५०
बामणोली (१६२३) १२
बालशास्त्री टाकेकर ले. ९५
बाल सवाई दाभाडे (१६४५) ५०
बालाजी लक्ष्मण ९५, १०१
बाळाजी विश्वनाथ प्रधान (१६३८) २४
बलाजी बेकाजी श. १६६६ से. ७९
बाळाबाई ले. ९४
बळासाहेब मिरजकर ९९
बीड मौजे (१६२४)१३,९८, प्रांत १०
बुध–कठापूर (१६४६) ६४
बुधी (१६४५) ६३
बेतले–पौनमावल (१६४६) ५१
बेबडवाहाल–पौनमावल (१६४५–४७) ४९, ५१, ५६
बेहेज ता। कोन्हाली (१६३९,–४१,–४३,–४५) २७, ३४, ४१, ४८
बोलिवली (१६२३) १२
बंगश ९७
बदन्या मांग (१४३२) १
भगवंत यादव जोशी कुाणी–पारनेर (१६४६) ५४
भगवंत सामराज (१६४६) ६४
भडवली मौजे (१६४६) ५१
भानजी नाईक महाजन मवाल २३
भामेर पारगणे (१६३९) २८
भार्गवराव श. १६४७ लें. ६६
भारमलदादा ले. ९७
भास्करराऊ बाबाजी दोडे व कुाणी हिरडस मावल (१६४०) २९
भास्कर रंगो हवालदार – पौनमावल (१६३१) २१
भिवडी–कन्हेपठार (१६१६) ६
भीमातीर ९८
भोजराव भोसले मोकदम बेरोडे दामाडे – –वोझर (१४३२) १.
भोजापूर श. १६४९ ले. ६७

मलगोंडा चेनगोंडा इबन मलगोंडा पाटील (१६५०) ६८
मलगोडा सेटगौडा (१६५०) ६८
मलवंडी ५१, (१६४७) ५६
मलिकंबर–कारकीर्द (१६०८) ३
मलोजी पवार–वाघाले ता पाबल (१६२६, ३९) (१६४६) ५४
मल्हार कोनेर मजमदार (१६५३) ७२
मल्हारजी होळकर ८८
महीपतराव राजा ९४, ९८
महीपतराम ९७
महेश्वर ९७
मावकोजी कुमाजी (१६४७) ६६
माणकोजी लुखजी घारे दोख भूपतराव (१६४६) ५१
माधवराव बलाल प्रधान (१६८९) ८३
माधवराव रास्ते ९५, ९९
मानसिंग दाभाडे (१६६२) ७६, ९२
माणा–ना–जी (१६४५) ६३, ६४
मानाजी पायेगुडे (१६५०) ६९
मावल प्रांत (१६२८) १६, ३५, ३९
माहादुसेट वीरकर (१६७६) ८२
माहादाजी आपदेऊ (१६५०) ६९
माहादाजी सिवदेव (१६६२) ७६
माहालुंगे तर्फ (१६४३) ४१
मिरजवाले ९८
मुधोजीराव देशमूख वोक्षर (१४३२) १
मुधो शामजी देशपांडिये (१६४९) ६७
मुरारजी घोरपडे (१६६५) ७७
मोत्याजी करंजवणे (१६५०) ६९
मोदडे मौजे (१६२८) १६
मोरवे–पौनमावल (१६४५–४६) ४९, ५१
माराजी काले महाजन तलेगांव (१६४३) ४०
मोरो जिवाजी देशपांडे–वाई २५
मोरोपंत (१६४५) ६२
मोरो शंकर कुळर्णी मौजे अवसरी बुा (१६४३) ४०
मोरो सारंगधर कुलकर्णी (१६५०) ६९
मोसी मौ. (१५९५) २
मंगरूल पारगाव ९८
म्हलोजी (१६४९) ६०
म्हसणे (१६४६) ५४
यमाजी नेहरे पाटील (१६६०) ७५
यशवंतराव खंडेराव दाभाडे (१६५३–७४) ७३, ७४, ७६, ७८, ८०, ८४, ८६, ९६
यशवंतराव पानसे ९५
यशवंतराव होळकर (१७२६) ९६, ९७
यादव रामचंद्र (१६५०) ६९
यादवली (१६२३) १२
यीड ९२
येलबेली मौजे (१६२८) १६
येसजी बाजी–बजाजी दाभाडे ५, ७
येसनाक गाइकवाड–म्हसणे (१६४६) ५४
यसपाटील दाभाडे (१६४५) ५०, ५४, मृत्यु (१६९९) ८ टीप
येसपाटील पापल (१६३८) २४
येसाजी देशमुख (१६४९) ६७
येसी बटीक (१६४६) ५३
योवजी (१६२३) १२
रघुनाथ गोविंद कुळर्णी–किले ताहेराबाद (१६४६) ५४
रघोजीराव घारे देशमुख पौनमावल (१६४०–४२) २९, ३०, ३७, ३८
रघोजी जाधव (१६४६) ५३

रघोजी भोसले (१६६५) ७७
राघो बलाल, सुभेदार (१६०८) ३
राघो मल्हार १०३
राजमाची २३
राजाराम छत्रपती (१६०८), ४ (१६१३) ५, (१६१८) ८, (१६१९) ९ (१६२०) १०
रामा महार (१६२५) १५
राणोजी जाधव (१६६७) ८१
राणोजी पिलाजी पा जाधव (१६४६) ५३
राणोजी भोएटा (१६४९) ६७
राणोजी सालोखी ८७, ९०
रामचंद्र गोसावी ९५
रामचंद्र देशपांडे (१६४३) ४०
रामचंद्र नाईक पराजपे (१७२२) ८५
रामचंद्रपंत अमात्य (१६०८) ४, (१६१९) ९
रामचंद्र प्रल्हाद–राजदेशमूख १०
रामचंद्र महादेव (१६३८) २४, (१६४७) ६५, ६६
रामचंद्र यादव ढोाडे (१६५०) ६९
रामजी पाटील गायकवाड– भिवंडी (१६१६) ६
रामाजी महादाजी (१६३१) २०
रायगड (१६०८) ४, (१६१३) ५
रायाजी सोनजी घारे दोास–पौनमावल (१६४५, –४६) ४९, ५१, ५५
रास्ते शामराव ९८
रीस (१६२३) १२
रुस्तुमराव ९२, ९८
रुस्तुमराव आबाजी ८९
रुस्तुमराव अंबाजी (१६६७) ८०, ८१
रूपाबाई रास–महादजी शिंदे ९७
रांजणगांव तर्फ (१६४५) ४६
ललगूण (१६४६) ६४
लक्ष्मण भारती गोसावी (१६८९) ८३
लक्ष्मण मल्हार कुाार्णी–पोखरी (१६४६) ५४
लक्षुमणराव करवे (१७२२) ८५
लक्षुमणराव फडके ९४
लक्षुमण विश्वनाथ (१६४७) ६५
लक्षुमीबाई दाभाडे ९२
वडगांव (१६५०) ६८
वडवाथर (१६२८) १६
वर्धनगड १०२
वसोई (१६२३) १२
वरा–हाड (१६५१) ७०
वसुंदे–पारनेर (१६४८) १५, ५८
वाई कसबे (१६१९) ९, २९; प्रांत ६४
वागसेद (प) (१६२३) १२
वाघाळे पाचळ (१६४६) ५४
वाघोली मौ (१६४०) २९
वाडे तर्फ–सरकार जुन्नर (१६४०) ३०
वात (१६२३) १२
वालुंज मौ (१६४०) ३०
वाल्हाई–खंडोजी दाभाडे माता (१६१८) ८
वासुंदे तर्फ (१६२५) १५, ५८
वासेरे मौजे पा आकोले (१६४९) ६७
विठ्ठल आबाजी ९४
विठल गोसावी ९८
विठलपंत लघाटे ९४
विठलराव नरसिंग विंचूरकर ९५, ९९, १००
विठोजी ढमाले मोकदम–कडूस (१६४६) ५२
विठोजी राजजी घारे दोास–पौनमावल (१६४५, –४६) ४९, ५१, ५५

विठोजी घोडके (१६५०) ६९
विठोबा गंगाजी नाईक मवाळ २३
विसाजी गोविंद पा–करंदी (१६४६)५४
वीरगों –गाव मौजे (१६४९) ६७
वैजापूर ९८
वोहर–संगमनेर (१४३२) १, (१६४५) ६३
वेंकाजी भानजी नाईक (१६२५) १४
विंचुरकर ९७,९८
शहाजी खराडे (१६६७) ८०
शामजी नाईक पुंडे–सरदेशकुलकर्ण १०
शामजी पंत (१६४५) ६२
शामजी मुधाजी कुलकर्णी (१६४५) ६२
शामराव रास्ते ९५, ९८
शाहू छत्रपती १७–१९, २६–२८, ३१–३५, ३९, ४१, ४२, ४६, ४७, ४९, ५५, ६१, ६४, ७१–७३
शिव छत्रपती–ताराबाई पुत्र (१६२४) १३
शि–सीवजी पाटील ढमाले (१६६०)७५.
शिवाजी–राजारामपुत्र–जन्म ७
शंकराजी पंडित सचीव (१६१३) ५, १६
शं–सकराजी साबाजी (१६४७) ६६
संकराजी सालोखे ९२
शंभु छत्रपती–करवीर–(१६३६) २२, (१६६६–६७) ७८,–८१
शिंदे ९८
श्रीनिवास परशुराम प्रतिनिधी (१६४२) –५३) ६१, ६४ ७३
श्रीनिवास येसाजी मुजुमदार (१६४६) ६४
सखो रुद्र ९८
सगुणाबाई भ्र. बाबुराव दाभाडे (१६४५) ५०
सटवाजी दरेकर (१७२२) ८५
सदाशिव नाईक वानवले १०३
सदाशिव माणकेश्वर ९५, ९९, १००, १०१, १०२, माऊ १०५
सदासिवराव श्रीपत फडणीस(१७२२)८५
सयाजी देसमुख (१६४९) ६७
सयाजी बिन हरजी दाभाडे–चांदखेड (१६४१–४२) ३५, ३६
साई मौजे (१६४६) ५३
साकुर्डी ता. चाकण जुन्नर (१६८९)८३
साकूर ९८
सागराव ९७
सातारा (१६४१–४२)३५,३९,४९,६४
साबाजी पाटील गराडे (१६४६)५३
सामराजपंत (१६५१) ७०
सालउंबरे (१६४३) ४१,४२
सावला घाट (१६३१) २१
सावले (१६२३) १२
सासवड (१६१६) ६
सिदावा नाईक मवाळ २३
सिदोजी जाधव–वाघोली (१६४०) २९
सिदोजी देवकर (१६६७) ८०
सिवजी कोठवला (१६४४) ४४ पृ. ३७
सिवजी रघुनाथ (१६४३) ४०
सिसोदे (१४३२) १
सुभानजी करजवणे (१६५०) ६९
सुभानजी केदारी बालूज (१६४०) ३०
सुभानजी पा सितोळे–साई(१६४६)५३
सुरत १०४,
सुलतानजी पायगुडे (१६५०) ६९
सूर्याजी गोपाल (१६५०) ६९
सूर्याजी सावंत दोख–वाडे तर्फ (१६४०) ३०
सेटगौडा येसगौडा (१६५०) ६८

सोम नाईक बाद नाईक सोनवणी (१६४६) ५४
सोमवंसी सुभेदार (१६४५) ६२
सोमाजी पाटील दाभाडे (१६४५) ५०
सोळसी श. १६४५ ले. ६३
संगमनेर सरकार (१४३२) १
संताजी नाईक ८७
संभाजी करवीर छत्रपती जन्म ७
संभाजी जाधव–वाघोली (१६४०) २९
संभाजी नाईकवाडी–चाकण(१६४८)३०
संभाजी सिंदे (१६४६) ५३
सांडस (१६४८) ५७
हणमगौडा श.१६५० ले. ६८
हणमाजी सूर्याजी माढेवे (१६०८) ३
हदनाक नगरे महार (१६४६) ५४
हरीपंत भावे ९४
हरिभक्ति १०३
हरिश्चंद्र (१६४१) ३४, प्रांत ४८
हवेली संमत (१६१८) ८
हवेली प्रां. पुणें (१६४६) ५३
हिरडसमावल (१६४० ) २९
हिरोजी कदम (१६४५)६२,६४
विहरगो मौजे (१६४९) ६९
हैबतराव ९४
हैद्राबाज ९८
होऊजी चव्हाण (१६२५) १४
होलकर ९४,९८

## शिवचरित्र कार्यालयाचे शिवचरित्रविषयक ग्रंथ

ह्या तीनहि ग्रंथांत इंग्रजी, डच, पोर्तुगीज, फारसी तसेंच संस्कृत, कानडी, हिंदी ह्या भाषांतील श. १३४८ ते श. १६०४ (इ. १६८२ एप्रिल) अखेरपर्यंत पत्रांच्या राजकीयदृष्ट्या विस्तृतपणें मराठींत काढलेला सारांश दिला आहे. अर्थांतच मराठी पत्रें ह्यांत घेतलेलीं आहेत हें सांगणें नको. इ. १९३७ पर्यंत जेवढीं ह्या ७।८ भाषांमधून इतस्ततः पत्रें म्हणून प्रसिद्ध झालीं त्यांचा सारांश कालानुक्रमानें ह्या भागांतून प्रसिद्ध झाला आहे. पत्रें व तीं कालानुक्रमानें लावलेलीं असणें ह्याहून इतिहासअभ्यासकास दुसरी महत्त्वाची गोष्ट नाहीं अशीं पत्रें ह्या तिन्ही भागांत अंदाजें तीन सहस्र आलीं आहेत. शिवाय तिसऱ्या भागांत अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब ह्या बादशहांच्या कारकीर्दींचीं **जुलूस-वर्षें** म्हणजे त्यांच्या कारकीर्दींच्या प्रत्येक वर्षाचा प्रारंभकाल मुसलमानी व इंग्रजी वर्ष, महिना, तारीख असा दिला आहे. ह्या सर्वांपेक्षां **शिवकालीन शकावली**–शं. ना. जोशी पृष्ठें सुमारें १५० दिलीं आहेत. एकंदर पृष्ठें ९७०. किं. भाग १, २; प्रत्येकी रु. ३॥, भाग ३ रु. २॥.

**शिवचरित्र निबंधावली**—ह्या ग्रंथांत श्री. द. वि. आपटे, प्रो. पटवर्धन, प्रो. कुंभारे, प्रो. देशपांडे, प्रो. ओतुरकर, श्री. दि. वि. काळे, श्री. शं. ना. जोशी, श्री. वा. सि. बेंद्रे, रा. सा. गं. के. देशपांडे ह्यांचे मुख्यतः तत्कालीन पत्रांचे आधारें शिवचरित्रांतील प्रसंगावर लिहिलेले निबंध आले आहेत. पृ. ४१२, किं. रु. ३॥

**शिवाजी निबंधावली भाग १**— ह्या ग्रंथांत प्रो. काणे, प्रो. पेंडसे, श्री. रा. राजोपाध्ये, प्रो. सबनीस, श्री. य. खु. देशपांडे, श्री. बा. आ. देशमुख पेडणेकर, श्री. ज. स. करंदीकर, म. म. गौरीशंकर ओझा, प्रो. दांडेकर, चॅ. प्रो पुणतांबेकर, श्री. भट, श्री. शि. का. ओक–धार ह्यांचे शिवकालीन संस्कृति व धर्म गागाभट्ट शिवाजीची कौटुंबिक माहिती, राजनीति, संतांची कामगिरी, शिवजन्मदिननिर्णय, श्रीसमर्थ रामदास, शिव-कालीन विदर्भ, शिवाजींचे कुलोपाध्याय (शिवकालीन सिंहस्थ, निजामशाही व आदिल-शाही सुलतान परिशिष्ट) इत्यादि निबंध आले आहेत. पृ. ३००, किं. रु. ३॥.

**शिवाजी निबंधावली** भा. २ मध्यें प्रो. आगा हैदर हसन–अलीनामा, दा. वि. गोखले–शिवकालीन प्रवासी पिटर डेला व्हॅले, प्रो. कुलकर्णी–शिवकालीन भाषा, प्रो. देशपांडे–मोडी लिपी, श्री. चिं. वि. वैद्य–मराठ्यांच्या ९६ कुळींच्या याद्या, मराठे व रजपूत; श्री. ग. ह. खरे शिवकालीन राजपत्रलेखन, श्री. बेंद्रे जंजिरेकर शिद्दी, श्री. मा. ह. घोरपडे–शिवाजी व तत्कालीन मराठे प्रतिस्पर्धी, श्री. शि. ग. पवार–शिव-कालीन ज्योतिर्गणित; प्रो. भानू–प्रतापगड युद्ध, प्रो. माटे–शिवकालीन समाजस्थिति; प्रो. पोतदार–अणाजी दत्तो वंशावळ हे निवडक निबंध आले असून प्रो. भूयान (गोहत्ती)–'आसामी ऐ. साधन व शिवाजी महाराज,' प्रो. श्रीनिवासाचार्य (मद्रास)–शिवाजींची दाक्षिणेकडील स्वारीची भूमिका, रा. ब. डॉ. अयंगार (मद्रास)–दक्षिणेतील मराठी सत्तेचा उदय, प्रो. रामचंद्र दीक्षितार (मद्रास)–शिवाजीविषयीं कांहीं नवीन साधनें, प्रो. वर्मा– महंमदनामा हे लेख आले आहेत. पृ. ३९०; किं. रु ३.

५४ पुणें नगर संशोधन–वृत्त खंड १ रु. १
५४ (अ) ऐ. सं. सा. खं. ३ रु. ३
५५ शिवचरित्रसाहित्य खंड ८ १॥८
५५ (अ) शि. च. सा. खं. ५ रु. ३॥
५६ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ४ २
५७ ऐ.संकीर्ण वाङ्मय साहित्य खं.१, १॥८
५८ शिवकालीन दंडनीति वा. सि. बेंद्रे ४
५९ पुणें नगरसंशोधन वृत्त खं.२ १॥८
६० ऐ. संकीर्ण निबंध खंड १ ला १॥८
६१ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ५ वा १॥८
६२ शिवचरित्र साहित्य खंड ९ वा १॥८
६३ खरे ग. ह. हिंगणे दफ्तर, खंड १ पृ. १९२ रु. ३
६४ ऐ. सं. सा. खं. ६ पृ. १०१ रु.१॥८
६५ ऐ. सं. निबंध खंड ३ पृ. ७६ रु. २
६६ कर्वे, पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ पृ. ८५ रु. १॥८
६७ डॉ. दीक्षित महाराष्ट्रांतील ताम्रपट शिलालेख पृ. १३३ रु. ३
६८ ऐ. संकीर्ण साहित्य खं. ७ पृ. ९१ रु. २
६९ ऐ. संकीर्ण निबंध खंड२ पृ. ८९ रु. ३
७० खरे, हिंगणे दप्तर, खं. २ पृ. १२७ रु. ३
७१ आंग्रेकालीन पत्रव्यवहार पृ.९२ रु.३
७२ ऐ. सं. निबंध, खंड ४पृ. ८९ रु. २॥
७३ चितळे, पेठे दप्तर, भाग १ पृ. ८८ रु. ३
७४ Explorations at Karad Rs. 5
७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व शकावली श्री. शं. ना. जोशी पृ. १७५ रु. ३
७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इति. साधनें खंड ३ पृ. १३३ रु. ३
७७ ऐ. फार्सी साहित्य चौथा खंड रु. ३
७८ पेठे दप्तर भाग २ रा. रु. ३
७९ पेशवे कालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार रु. ३
८० इतिहासकर्ते मराठे रु. २

---

# शिवचरित्र साहित्य खंड

| | | | | | | किं. रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| खंड १ | स्वी. ग्रं. मा. क्र. | ३० | पुरंदरे व द. वि. आपटे | पृ. १५४ | (श. १८४८) | १॥ |
| २ | ,, ,, ,, | ३३ | मंडळ चिटणीस | पृ. ४२६ | (श. १८५१) | ४ |
| ३ | पुरस्कृत ग्रं. मा. क्र. | २४ | शं. ना. जोशी व ग.ह.खरे | पृ. २७८ | (श. १८५२) | |
| ४ | स्वीय ग्रं. मा. क्र. | ३८ | मंडळ चिटणीस | पृ. १२६ | (श. १८५६) | १॥ |
| ५ | ,, ,, | ५५ | शं. ना. जोशी | पृ. ३६३ | (श. १८६४) | ३॥ |
| ६ | ,, ,, | ४७ | ग. ह. खरे | पृ. १५० | (श. १८५९) | १॥ |
| ७ | ,, ,, | ५० | कृ.वा.पुरंदरे व द.वि.आपटे | पृ. १६४ | (श. १८६०) | १॥ |
| ८ | ,, ,, | ५५ | शं. ना. जोशी | पृ. १३२ | (श. १८६४) | १॥ |
| ९ | ,, ,, | ६२ | शं. वि. अवळसकर | पृ. ११८ | (श. १८६६) | १॥ |

सेनापती दाभाडे ह्यांचेसंबंधीं

## कांहीं साधनीभूत ग्रंथ

(१) शिवाजी व अष्टप्रधानांचा वि. गो. भिडे कृत इतिहास (इ. १८६६) पैकीं पृष्ठ २३२ ते २४२

(२) काव्ये. सं.— सेनापती दाभाडे व गायकवाड यांची हकीकत. [२०]. ही हकीकत इ. १८१९ पूर्वीं पांचसात वर्षांत तयार केलेली आहे. पृ. १–३६ प्रसिद्धीकाल इ. १८८७

(३) दाभाड्यांच्या घराण्याचा इतिहास— श्री. मा. रा. परांडेकर पृ. १९६ इ. १८८८

(४) राजवाडे खंड ३ ले. १६७ पृ. १७३–१७६. वंशावळ, सेनाखासखेल व सेनापती पदांचे कारकून (८ व ११); व शागीर्द (४) आणि चकनामा श. १६२५ (व श. १६५३) प्रसिद्धी काल इ. १९०१

Library IIAS, Shimla
MR 954.026 J 78.I S
00008991

(५) दाभाडे सेनापती— महाराष्ट्र ... पृष्ठें ६५, धनुर्धारीरचित इ. १९०८

(६) पेशवे आणि दाभाडे—पे. द. ... निवडक कागद, भाग १२ इ. १९३१

ह्याशिवाय छत्र. शाहू रोजनिशी, छ० संभाजी, राजाराम, शाहू बखर, इ. १८३५ इतिवृत्त भा. इ. सं. मं., सनदापत्रें, इ. सं. पे. द. स. मा.; भा. इ. सं. मं. त्रैवार्षिक वर्ष ८; पेशवे दप्तर भाग ३१, इ. इ. इ.